



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, सोमवार २८ सप्टेंबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०





## भारताने वेस्ट इंडिजला नमविले

**तिरु वनंतपुरम :** पहिल्या एकदिवसीय सामन्यात भारताने वेस्ट इंडिजला ८ गडी राखून पराभूत केले. तिरु वनंतपुरम येथील ग्रीनफील्ड स्टेडियमवर प्रथम फलंदाजी करताना वेस्ट इंडिजने ५० षटकांत ७ गडी गमावून २९५ धावा केल्या. प्रत्युत्तरात भारताने ४१.४ षटकांत ८ गडी गमावून ३०० धावा करत विजय मिळवला. या विजयासह भारताने तीन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली.भारताच्या विजयाचे नायक विराट कोहली आणि कर्णधार शुभमन गिल होते. विराट कोहलीने १३९ धावांची नाबाद खेळी केली. त्याने आपले ५५ वे एकदिवसीय शतक आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील ८६ वे शतक झळकावले. तो एकदिवसीय सामन्यांमध्ये सर्वात जलद १५,००० धावा करणारा फलंदाजही ठरला. त्याने ३०३ डावांमध्ये हा पराक्रम केला. कोहलीने सचिन तेंडुलकरचा विक्रम मोडला. सचिनने २००७ मध्ये दक्षिण आफ्रिकेविरु द्ध ३७७ डावांमध्ये १५,००० एकदिवसीय धावा पूर्ण केल्या होत्या.कर्णधार शुभमन गिलने आपले १० वे एकदिवसीय शतक झळकावले. त्याने ११० धावा केल्या. तत्पूर्वी, वेस्ट इंडिजने नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी केली. जस्टिन ग्रीव्ह्सने १०८ चेंडूंमध्ये १०१ धावा केल्या. ज?न कॅम्पबेलने ६२ धावा केल्या, तर आमिर जांगू ५८ धावांवर नाबाद राहिला. भारताकडून कुलदीप यादवने ४ बळी घेतले. प्रसिद्ध कृष्णाने २ बळी आणि नितीश रेड्डीने १ बळी घेतला.



## एसी, टीव्ही, वाशिंग मशीन 1 ऑक्टोबरपासून महागणार


**नवी दिल्ली / वृत्तसंस्था-**यंदा ऑक्टोबर महिन्यात दसरा तर नोव्हेंबर महिन्याच्या सुरु वातीला दिवाळीचा सण आहे. या दोन्ही सणांच्या वेळी भारतीय ग्राहक मोठ्या प्रमाणात एसी, टीव्ही, इतर घरगुती इलेक्ट्रिक उपकरणांची खरेदी करतात. मात्र, यंदा या सणांच्या अगोदरच ग्राहकांना महागाईचा फटका बसणार आहे. कारण १ ऑक्टोबरपासून एसी, टीव्ही यासह इतर इलेक्ट्रिक उपकरणांच्या दरात वाढ होउ शकते.इलेक्ट्रॉनिक्स कंपन्यांकडून विविध कारणांमुळे दरवाढ करण्याची तयारी करण्यात येत आहे. धातूंचे वाढलेले दर, डालरच्या तुलनेत रु पयांची घसरण, आखाती देशांमधील युद्धजन्य परिस्थिती यामुळे भारतीय ग्राहकांवर महागाईचे संकट ओढवणार आहे. इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांची निर्मिती करणा-या कंपन्यांकडून १ ऑक्टोबर २०२६ पासून दरवाढ करण्याचा निर्णय घेतला गेला आहे.इलेक्ट्रॉनिक्स कंपन्यांकडून १ ऑक्टोबरपासून करण्यात येणारी दरवाढ ही या वर्षातील तिसरी दरवाढ असेल. तांबे, ॲल्युमिनिअम, क्रू ड ऑईलपासून निर्माण होणारी उत्पादने, कच्चा मालाचा खर्च यात वेगाने वाढ झाल्याने आणि दळणवळणाचा खर्च वाढल्याने दरवाढ करण्यात येत असल्याची माहिती आहे. १ ऑक्टोबरपासून एसी, टीव्ही आणि इतर इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांच्या दरात ८ टक्क्यांची वाढ केली जाउ शकते. एसीच्या दरांत ५ ते ८ टक्क्यांची वाढ केली जाउ शकते. याशिवाय वाशिंग मशीन, फ्रीज आणि एलईडी टीव्हीच्या दरात ३ ते ४ टक्क्यांची वाढ केली जाउ शकते. ब्लू स्टार, गोदरेज अप्लायनसेस, हायर, डाइकिन, सुपर प्लास्ट्रोनिक्स यासारख्या प्रमुख इलेक्ट्रॉनिक्स कंपन्यांकडून ४ ते १० टक्के दरवाढ लागू केली आहे. एलजी आणि बाश होम कम्फर्टने एसीच्या दरात ५ टक्के वाढ केली आहे.



## माफ करा, अंदाज चुकला

**परभणी :** राज्यातल्या शेतक-यांनी ज्यांच्यावर हवामान तज्ज्ञ म्हणून भरोसा टाकला. त्यांनीच आता राज्यात दुष्काळ पडणार असल्याचे मान्य केले आहे. मराठवाड्यातल्या परभणी जिल्ह्यातील हवामानाचा अचूक अंदाज वर्तवण्यात प्रसिद्ध असणारे पंजाबराव डखांनी सोशल मीडियावरु न एका पोस्टच्या माध्यमातून यंदा राज्यात दुष्काळ पडणार असल्याचे सांगितले आहे. एवढच नाही तर त्यांनी आपण २०२६ मध्ये सांगितलेले सगळे अंदाज चुकल्याबद्दल माफीही मागितली आहे. माफ करा २०२६ मध्ये अंदाज चुकला, राज्यात दुष्काळ पडणार असे थेट म्हणाले आहेत. त्यामुळे शेतकरीवर्गालाही धक्का बसला आहे. यावरु न शेतक-यांनीही त्यांना सोशल मीडियावर घेरले आहे. दरम्यान, महाराष्ट्र सरकारने ७५ टक्के राज्यात दुष्काळ जाहीर केला आहे. त्यासाठी मोठी मदतप्रणाली कामाला लागली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून राज्यातून पावसाने दडी मारली होती. शेतक-यांनी पिक पेरणी करु न ठेवली होती. पाण्याअभावी पिके करपून जात होती. त्या पार्श्वभूमिवर राज्य सरकारने दुष्काळ जाहीर केला आहे. दरम्यान, राज्यात पावसाळा सुरु झाल्यापासून शेतक-यांसह इतरही नागरिक हवामान विभागाच्या आणि इतरही हवामान तज्ज्ञांच्या अंदाजांवर लक्ष ठेवून असतात. त्यांच्या भरवशावर राहून आपले शेतीचे नियोजन करण्यात येते. कधकधी तर स्वत: राज्य सरकारही याबाबत आवाहन करताना दिसून येते. पण यंदा शेतकरी राजावर खूपच वाईट वेळ येउन ठेपलेली पाहायला मिळाली. मुख्यमंत्री राज्यात दौरा करताना दिसून आले होते. त्यावेळी शेतक-यांना त्यांची अवस्था सांगताना अश्रू अनावर झालेले पाहायला मिळाले होते. पंजाबराव डख यांच्यावर सदरील पोस्टनंतर टीका होत आहे. साहेब तुमच्या भरवश्यावर राहून अखबा महाराष्ट्र आडवा झाला पावसाचा १ थेंब पडला नाही आणि तुम्ही तारखावर तारखा देत राहिले आता बास करा, असा जळजळीत प्रहार एका शेतक-याने त्यांच्यावर कमेंटमधून केला आहे.






# 3 दिवसांचे अधिवेशन बोलवा, सरसकट दुष्काळ जाहीर करा

### शरद पवार यांची मुख्यमंत्र्यांकडे पत्राद्वारे मागणी

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य सरकारने २६५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर केला आहे. पण, उर्वरीत तालुक्यांतही स्थिती बिकट आहे. त्यामुळे राज्यात सरसकट सर्वच तालुक्यांत दुष्काळ जाहीर करा. दुष्काळाच्या प्रश्नावर तीन दिवसांचे विशेष अधिवेशन बोलावून, अंमलबजावणीला गती द्या. दुष्काळी मदत दिवाळीपूर्वी वितरीत करा, अशी मागणी ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या राज्य कार्यकारिणीची बैठक आज, सोमवारी मुंबईत होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर पवार यांनी आपल्या निवासस्थानी खासदार, आमदार आणि वरिष्ठ पदाधिका-यांशी संवाद साधला. बैठकीनंतर मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून आपल्या मागण्या मांडल्या आहेत. सरकारने २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला आहे. या संदर्भात शासनाने विविध उपाययोजना जाहीर केल्या आहेत. तथापि, दुष्काळग्रस्त शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी तसेच ग्रामीण भागातील नागरिकांना अधिक प्रभावी आणि तातडीचा दिलासा मिळावा, यासाठी शासन निर्णयामध्ये आणखी काही बाबींचा समावेश होण्याची गरज आहे. उर्वरीत तालुके दुष्काळग्रस्त म्हणून घोषित करण्यात यावेत. संपूर्ण जमीन महसूल माफ करावा. कर्जमाफी झालेल्या तारखेनंतर आजतागायत ज्या शेतक-यांनी शेती व शेती व्यवसायाशी निगडित घेतलेले सहकारी बँका, राष्ट्रीयीकृत बँका, सहकारी अर्बन बँका आणि पतसंस्था तसेच सामाजिक न्याय, अल्पसंख्याक, आदिवासी विभागाचे वैयक्तिक कर्ज, तसेच फळबागांसाठी घेतलेले कर्ज आणि महिला बचत गटांनी घेतलेल्या कर्जाची रक्कम संपूर्णपणे माफ करण्यात यावी. शेतक-यांच्या कृषी पंपांची सर्व वीज बिले माफ करावे, अशी मागणी पवार यांनी केली आहे.



**स्थानिक पातळीवर रोजगार द्या-** रोजगार हमी योजनेअंतर्गत सध्याचे निकष शिथिल करू न, मागेल त्या ठिकाणी तीन किलोमीटरच्या परिसरात तातडीने रोजगाराची कामे सुरू करा. पिण्याच्या पाण्यासाठी तसेच जनावरांच्या पिण्याच्या पाण्यासाठी टँकर मंजूर करण्याचे अधिकार तहसीलदारांना द्या. टंचाईग्रस्त म्हणून जाहीर केलेल्या गावांतील शेतक-यांच्या कृषी पंपांची➪(पान २ वर)

## दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबातील लग्नात शिवसेना करणार खर्च

### एकनाथ शिंदे यांची घोषणा

**मुंबई/प्रतिनिधी :** दुष्काळग्रस्त भागासाठी सरकारने उपाययोजना घोषित करण्यास प्रारंभ केला असतानाच शनिवारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सरकारी तिजोरीवर पहिला हक्क सरकारचा असल्याचे जाहीर केले. ज्या शेतकरी कुटुंबात मुला-मुलींचे लग्न ठरलेली आहेत, त्यांच्या विवाहखर्चाला शिवसेना हातभार लावेल, अशी घोषणाही त्यांनी केली आहे. दुष्काळी जिल्ह्यातील ज्या शेतक-यांच्या मुला-मुलींची लग्न ठरली आहेत. त्यांनी शिवसेनेचे स्थानिक लोकप्रतिनिधी आणि पदाधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. त्यांना आवश्यक ती मदत शिवसेनेच्या माध्यमातून केली जाईल, असे शिंदे यांनी जाहीर केले आहे.दुष्काळी परिस्थितीत शेतकरी नाईलाजाने आत्महत्येचा मार्ग स्वीकारतात. विवाहात होणारा खर्च हा शेतक-यांमागचा मोठा ताप असतो, हे लक्षात घेत ही घोषणा करण्यात आली.



दुष्काळी भागातील शेतक-यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. यात मुला मुलींच्या लग्नाचा खर्च कसा करायचा याची विवंचना त्यांना कायम सतावत असते. दुष्काळ, नापिकी, कर्ज यामुळे मुलांच्या लग्नासाठी पैसे उभे करता येणे शक्य नसल्याने अनेक शेतकरी आत्महत्येचा मार्ग निवडतात. त्यांना त्या निर्णयापासून परावृत्त करून याबाबत चिंतामुक्त करण्यासाठी शिवसेनेने पुढाकार घेतला आहे, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निकटचे सहकारी म्हणाले.

## शेगावच्या संत गजानन महाराज संस्थांतर्फे दुष्काळग्रस्तासाठी 1 कोटी 11 लाखांची मदत

**बुलढाणा/प्रतिनिधी :**राज्यात यावर्षी अल निनोच्या प्रभावामुळे पावसाने मोठी ओढ दिली असून संपूर्ण महाराष्ट्रात भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. या नैसर्गिक संकटामुळे शेतकरी बांधव मोठ्या अडचणीत सापडला आहे. दुष्काळग्रस्त शेतक-यांना मदतीचा हात देण्यासाठी शेगांव येथील गजानन महाराज संस्थान नेहमीप्रमाणे पुढे आले आहे.संस्थानच्या वतीने मुख्यमंत्री सहायता निधीस १ कोटी ११ लाख रु पयांचा भरीव सहयोग निधी सुपूर्द करण्यात आला आहे.गजानन महाराज संस्थान, शेगांवच्या वतीने २७ सप्टेंबर २०२६ रोजी, हा १ कोटी ११ लाख रु पयांचा मदत निधी धनादेशाद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सुपूर्द करण्यात आला.



**जोपासली सामाजिक बांधिलकी-** गजानन महाराज संस्थान हे केवळ धार्मिक केंद्र नसून सामाजिक बांधिलकी जपणारी अग्रगण्य संस्था म्हणून ओळखली जाते. यापूर्वीही राज्यावर आलेल्या प्रत्येक नैसर्गिक आपत्तीत संस्थानने नेहमीच मदत केली आहे.याही वेळी राज्यातील दुष्काळग्रस्तांचे अश्रू पुसण्यासाठी आणि शासकीय पातळीवरील मदतकार्याला बळ देण्यासाठी श्री संस्थानने तात्काळ हा निर्णय घेतला.२०१९ व २०२५ मध्ये सुद्धा संस्थान कडून राज्यातील पुरपरिस्थिती निर्माण झाली होती त्यावेळीस सुद्धा मुख्यमंत्री सहायता निधीस सहयोग देण्यात आला होता.

## मतदानाची चोरी नाही; तर राहुल गांधींचा मेंदू चोरीला गेला, मुख्यमंत्र्यांचा घणाघात

**नागपूर/प्रतिनिधी :** लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहूल गांधी यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्यावर हल्लाबोल करीत राजीनाम्याची मागणी केली. निवडणुकांमधील गैरप्रकार, मतचोरी, कायद्याचे उल्लंघन, संस्थात्मक चोरी असे गंभीर आरोप त्यांनी केले आहे. सत्ताविरोधी लाटे चा भाजपवर परिणाम का होत नाही? असे सवाल राहुल गांधी यांनी उपस्थित केले आहेत. यावरू न मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राहूल गांधी यांच्यावर प्रतिहल्ला चढवित त्यांचा मेंदूच चोरीला गेल्याचा घणाघात केला.नागपुरात रामगिरी येथे रविवारी पत्रकारांशी संवाद साधताना मुख्यमंत्र्यांनी राहूल गांधी यांच्यावर चौफेर टीका केली. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राहूल गांधी हातात संविधान घेउन संवैधानिक संस्थांना बदनाम करण्याचे कारस्थान करीत आहेत. जनतेचा कांग्रेसवरील विश्वास उडाला असून तो मिळविण्यासाठी त्यांचा केविलपणा प्रयत्न आहे. सर्व संवैधानिक संस्थांचे महत्त्व अबाधित आहे. ते पराभूत झाले की ईव्हीएमला दोष देत होते. आता थेट निवडणूक आयुक्तांनाच घेरण्याची रणनिती त्यांनी केली आहे. मतदान चोरी नव्हे तर विरोधी पक्षनेत्याचा मेंदूच चोरीला गेला असून पंतप्रधानांना एखादी समिती गठीत करू न तो शोधावा, अशी मागणी करणार असल्याचा टोला फडणवीस यांनी लगावला. राहूल गांधी यांना काहीही सिद्ध करता ➪(पान २ वर)



## एआय मुळे कोट्यवधी लोकांचा जीव धोक्यात- बिल गेट्स

**वॉशिंग्टन / वृत्तसंस्था-**आर्टिफिशियल इंटेलिजन्स, म्हणजेच एआयच्या गैरवापराबाबतही जगभरात चिंता व्यक्त केली जात आहे. अशातच आता तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गज कंपनी मायक्रोसाफ्टचे संस्थापक बिल गेट्स यांनीही एआयच्या संभाव्य धोक्याबाबत गंभीर इशारा दिला आहे. एआयचा वापर चुकीच्या हेतूने झाल्यास अत्यंत मोठ्या प्रमाणावर जीवितहानी घडवून आणणा-या घटना घडू शकतात, असे गेट्स यांनी म्हटले आहे. गेट्स यांच्या मते, एआय इतके शक्तिशाली तंत्रज्ञान बनले आहे की, त्याच्या दुरु पयोगातून घडणा-या घटनांमध्ये १ अब्ज लोकांपर्यंत मृत्यू होण्याची शक्यता निर्माण होउ शकते. मात्र, गेट्स यांनी एआयमुळे निश्चितपणे १ अब्ज लोकांचा मृत्यू होईल, असा दावा केलेला नाही. त्यांनी अत्यंत प्रगत एआय साधने आणि त्यांचा गैरवापर करणा-या व्यक्ती किंवा गट यांच्या संयोगातून निर्माण होउ शकणा-या संभाव्य परिस्थितीचा इशारा दिला आहे. एका मुलाखतीत गेट्स यांना एआयच्या संभाव्य धोक्यांबाबत प्रश्न विचारण्यात आला. यावेळी त्यांनी एआय कंपन्यांनी स्वत:च तयार केलेले सुरक्षा नियम पुरेसे नसल्याचे मत व्यक्तकेले. एआयची क्षमता जसजशी वाढत जाईल, तसतशी त्याच्या विकास आणि वापरावर स्पष्ट कायदेशीर नियम, सुरक्षा उपाय आणि देखरेख आवश्यक ठरेल, असे त्यांनी सांगितले. एआयच्या नियमनासाठी कायदे करण्याची गरज असून सरकार, कायदा अंमलबजावणी यंत्रणा आणि राजकीय नेतृत्वाने या प्रक्रियेत सहभागी होणे आवश्यक असल्याचे गेट्स यांनी म्हटले.



**चुकीच्या हेतूचा संगम धोकादायक-**गेट्स यांच्या चिंतेचा मुख्य मुद्दा म्हणजे एआयचा गैरवापर. अत्याधुनिक एआय टूल्सचा वापर जर चुकीच्या हेतूने करणा-या व्यक्ती किंवा संघटनांच्या हाती गेला, तर मोठ्या प्रमाणावर नुकसान घडवून आणण्याची त्यांची क्षमता वाढू शकते, असा त्यांचा इशारा आहे. एआयचा गैरवापर सायबर हल्ले, फसवणूक, चुकीची माहिती, डीपफेक तसेच इतर हानिकारक कामांसाठी होण्याची शक्यता यापूर्वीही तज्ज्ञ आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील व्यक्तींनी व्यक्त केली आहे. गेट्स यांच्या मते, त्यामुळे एआयची सुरक्षा केवळ कंपन्यांच्या ➪(पान २ वर)

## दीक्षाभूमीवर साकारणार 'भीमसृष्टी'

### समाज कल्याण सचिव डॉ. हर्षदीप कांबळे

**नागपूर/प्रतिनिधी :**दीक्षाभूमीवर २० ऑक्टोबर रोजी साजरा होणारा धम्मचक्र प्रवर्तन दिन हा देशभरातील अनुयायांसाठी महत्त्वाचा सोहळा आहे. दीक्षाभूमी परिसरात निवासासाठी जर्मन हँगर तंत्रज्ञानावर आधारित निवारा कक्ष उभारण्यात येणार असून, त्यामध्ये पंखे, कुलर्स, प्रकाशयोजना तसेच अंथरूण-पांघरूणाची व्यवस्था करण्यात येणार आहे. या निवारा कक्षांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याशी संबंधित नावे देण्यात येणार आहेत. निवारा कक्षांच्या परिसरात संविधान साहित्याची भीमसृष्टी उभारण्यात येणार आहे. या सोहळ्यासाठी देशभरातून येणा-या लाखो अनुयायांना आवश्यक सोयी-सुविधा वेळेत आणि सुलभतेने उपलब्ध करू न देण्यासाठी सर्व शासकीय विभागांनी परस्पर समन्वयाने सूक्ष्म नियोजन करावे, असे निर्देश सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांनी दिले. विभागीय आयुक्त कार्यालयात त्यांनी कामाच्या नियोजनाचा आढावा घेतला. बैठकीला जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलीस उपायुक्त संदीप पखाले, ➪(पान २ वर)



**निवारा कक्षांच्या परिसरात संविधान साहित्याची 'भीमसृष्टी' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने ओळखले जाणार कक्ष**

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी मिडी बसेस एसटीच्या ताफ्यात दाखल होणार

**मुंबई / प्रतिनिधी-**राज्यातील दुर्गम, डोंगराळ आणि अरु ंद रस्त्यांवरील आदिवासी बांधव, ग्रामीण जनता तसेच विद्यार्थ्यांच्या प्रवासाला नवी दिशा देण्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताफ्यात १०० पुण्यश्लोक अहिल्यादेवी मिडी बसेस दाखल होणार आहेत, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. महाराष्ट्राच्या कानाकोप-यात, डोंगरद-यांच्या कुशीत, नागमोडी वाटांवर आणि दुर्गम वाड्या-वस्त्यांमध्ये राहणा-या सर्वसामान्यांच्या जीवनाशी अतूट नाते जोडलेली लालपरी आता आणखी दूरवर पोहोचणार आहे. ज्या वाडी-वस्तीतील आदिवासी बांधव आणि विद्यार्थी आजही शिक्षण, रोजगार, आरोग्य व दैनंदिन गरजांसाठी अनेक किलोमीटरची पायपीट करतात, त्यांच्या पावलांना आता लालपरीची साथ मिळणार आहे. दुर्गम भागातील पायवाटेवरू न एसटीची वाट निर्माण करणे, हेच या निर्णयामागचे उद्दिष्ट आहे, असे मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले.



**पायपीट थांबविण्यासाठी लालपरीची नवी वाट!-** मंत्री सरनाईक म्हणाले की, डोंगर-द-या, तीव्र चढ-उतार, अरुंद रस्ते आणि नागमोडी वळणांमुळे अनेक ठिकाणी मोठ्या बसेस पोहोचणे शक्य होत नाही. परिणामी, या भागातील ➪(पान २ वर)



# उघड्या विहिरीवर माजी सैनिकाने बसविली सव्वा दोन क्विंटलची लोखंडी जाळी

## वडिलांच्या स्मृतीत अनोखी भेट



**तिवसा/प्रतिनिधीः-** नागरी वस्तीत असलेल्या उघड्या विहिरीत कधी मोकाट जनावरे तर कधी लहान मुले पडण्याच्या घटना होत असतांना यातून कुठेतरी सुरक्षितता राहावी, नागरिकांच्या पोटात जाणाऱ्या पाण्याची स्वच्छता व शुद्धता कायम राहून नागरिकांचे आरोग्य जपल्या जावे, असा व्यापक दृष्टिकोन ठेवून तिवसा येथील विद्युत कॉलनीस्थित एका माजी सैनिकाने संत गजानन महाराज मंदिरालगत असलेल्या उघड्या विहिरीवर सव्वा दोन क्विंटलची लोखंडी जाळी बसवून समाजासमोर एक आदर्श निर्माण केला आहे.


मंगेश जगताप असे त्या सेवानिवृत्त माजी सैनिकाचे नाव आहे. ते वास्तव्यास असलेल्या विद्युत कॉलनीत संत गजानन महाराजांचे भव्य असे मंदिर उभे आहे. मंदिर परिसर हा पेविंग ब्लॉकने सुशोभणीय असल्याने येथे लहान मुले खेळतात तर वयोवृद्ध मंडळी, नागरिक सुद्धा येथील धार्मिक वातावरणाचा आनंद घेतात. अनेक धार्मिक कार्यक्रम येथे होत असतात. अश्यावेळी उघड्या विहिरींमुळे येथील नागरिक, लहान मुले व भक्तगणांना सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न भेडसावत होता. नगरपंचायत कडून उपाययोजना करण्यात अति विलंब होत असल्याने अखेर देशसेवेत १७ वर्षे सेवा देऊन निवृत्त झालेल्या माजी सैनिक मंगेश आनंदराव जगताप यांनी या सामाजिक कार्यासाठी स्वयंप्रेरणेने पुढाकार घेत वडील स्व.आनंदराव पुंडलिकराव जगताप यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सव्वा दोन क्विंटल वजनाची, अंदाजे ३० हजार रुपये किमतीचे लोखंडी जाळीचे झाकण 'अनंत चतुर्दशी'ला बसवून समाजासमोर एक आदर्श निर्माण केला आहे.

> उघड्या विहिरीत अनेकदा डुकरं पडल्याने पाणी अस्वच्छ झाले होते. त्याचबरोबर कुठलीही अनुचित घटना होऊ नये म्हणून स्थानिक नागरिकांनी नगरपंचायत प्रशासनाकडे विहीरीवर जाळीची मागणी देखील केली होती मात्र अद्यापही दखल घेण्यात न आल्याने व दोन दिवसांपूर्वी येथील परिसरात लहान मुले खेळत असतांना एका मुलाचा तोल विहिरीत जात असल्याचे दृश्य मी बघितले. त्यामुळे भविष्यात उघड्या विहीरीवर जाळी अभावी होणारी घटना टळावी, विहिरीतील पाण्याची स्वच्छता कायम राहावी, यासाठी मी स्वखर्चाने जाळी बसविली आहे.
>
> ■ **मंगेश आ. जगताप**
> माजी सैनिक, तिवसा.

# बालवीर गणेश मंडळाच्या विसर्जन मिरवणुकीत अश्वांचे नृत्य ठरले आकर्षण

## - वारकरी भजनाच्या गजरात आसेगावच्या राजाला निरोप

**आसेगाव पूर्णा/प्रतिनिधीः-** येथील हनुमान चौकातील बालवीर गणेशोत्सव मंडळाने यंदाही पारंपरिक पद्धतीने गणेश विसर्जन मिरवणूक काढत आदर्श निर्माण केला. डीजे, गुलाल तसेच ढोल-ताशांना फाटा देत वारकरी सांप्रदायिक भजन मंडळाच्या हरिनामाच्या गजरात 'आसेगावच्या राजा'ला भावपूर्ण निरोप देण्यात आला. मिरवणुकीतील दोन पांढऱ्या शुभ्र अश्वांचे नृत्य हे विशेष आकर्षण ठरले.





अश्वांच्या मनमोहक नृत्याने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. पारंपरिक पोशाखातील वारकरी, भजन मंडळाचा हरिनाम गजर आणि भक्तिमय वातावरणामुळे मिरवणुकीला धार्मिक व सांस्कृतिक स्वरूप प्राप्त झाले होते. मिरवणूक गावातील प्रमुख मार्गावरून काढण्यात आली. यावेळी महिला, ज्येष्ठ नागरिकांसह विविध समाजघटकांतील नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. अखेर पूर्णा नदीच्या तीरावर विधिवत गणेश विसर्जन करण्यात आले. बालवीर गणेशोत्सव मंडळाकडून मागील अनेक वर्षांपासून पारंपरिक पद्धतीने गणेशोत्सव साजरा केला जात असून, यंदाच्या विसर्जन मिरवणुकीतही त्याचीच प्रचिती आली. वारकरी भजन, हरिनामाचा गजर आणि अश्वांचे नृत्य यामुळे संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले होते. 'आसेगाव नगरीत जणू पंढरी अवतरली', असा अनुभव उपस्थितांना आला.

# राज्यस्तरीय महापरिषदेसाठी तिवसा तालुक्यात मंदिर विश्वस्तांची बैठक

**तिवसा/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र देवस्थान समिती अमरावती जिल्ह्याच्या वतीने ३ ऑक्टोबर रोजी होऊ घातलेल्या राज्यस्तरीय विश्वस्त महापरिषदेच्या तयारी व आयोजनाला घेऊन तिवसा तालुक्यातील मंदिर विश्वस्त व पदाधिकाऱ्यांची बैठक श्री समर्थ सोटागीर महाराज संस्थान, तिवसा येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.

मंदिर संस्कृतीचे रक्षण व संवर्धन, देवस्थानांच्या जमिनींचे संरक्षण, पारदर्शक व्यवस्थापन तसेच मंदिर विश्वस्तांचे संघटन अधिक सक्षम करण्याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीत तिवसा तालुक्यातील विविध मंदिरांचे विश्वस्त, पदाधिकारी, सेवेकरी व धर्मप्रेमी नागरिक सहभागी झाले. बदलत्या परिस्थितीत मंदिरांच्या मालमत्ता व देवस्थान इनाम जमिनींचे संरक्षण, महसूल नोंदींची जपणूक, मंदिर व्यवस्थापनातील पारदर्शकता, कायदेशीर बाबी तसेच धर्मादाय आयुक्त कार्यालयाशी प्रभावी समन्वय याबाबत उपस्थितांनी आपले अनुभव व सूचना मांडल्या.

यावेळी अमरावती येथील एकविरा मंगल कार्यालय, जनार्दन पेठ येथे ३ ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित राज्यस्तरीय विश्वस्त महापरिषदेची माहिती देऊन सर्व मंदिर विश्वस्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले. राज्यस्तरीय परिषदेमध्ये मंदिरांच्या विविध प्रश्नांवर चर्चा, मार्गदर्शन आणि संघटनात्मक विषयांवर विचारविनिमय होणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. तसेच तिवसा तालुक्यातील मंदिरांचे प्रश्न एकत्रितपणे मांडण्यासाठी, परस्पर समन्वय वाढविण्यासाठी आणि मंदिर संघटनेचे कार्य गावपातळीपासून जिल्हास्तरापर्यंत अधिक प्रभावी करण्यासाठी पुढील काळात सातत्याने प्रयत्न करण्याचे बैठकीत ठरविण्यात आले.



'एक मंदिर – एक संघटन – एक दिशा' या संकल्पनेतून मंदिरांचे संरक्षण, संवर्धन आणि सक्षम व्यवस्थापनासाठी सर्व विश्वस्तांनी एकत्रितपणे कार्य करण्याची गरज यावेळी व्यक्त करण्यात आली. बैठकीच्या माध्यमातून तिवसा तालुक्यातील मंदिर विश्वस्तांमध्ये परस्पर संवाद व समन्वयाला चालना मिळाली असून, मंदिरांच्या विविध समस्या संघटितपणे शासन व संबंधित प्रशासनासमोर मांडण्यासाठी पुढील काळात ठोस कृती करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

बैठकीसाठी अनिल काळमेघ, अनिल मापले, विजय करडे व मनोहर कसर यांनी विशेष सहकार्य केले. व्यासपीठावर महाराष्ट्र देवस्थान समितीचे आशिष मारूडकर, नागेश्वर महादेव संस्थान धामंत्री चे अध्यक्ष कैलाशकुमार पनपालिया, श्री समर्थ सोटागीर महाराज संस्थान तिवसा चे अध्यक्ष दादाराव मानमोडे, नरेंद्र देशमुख, महारुद्र मारुती संस्थान जहागीरपुर चे अध्यक्ष ओमप्रकाश परतानी, रघुनाथ महाराज संस्थान गंगापूरचे अध्यक्ष धनराज वेलणकर, चंद्रभागेश्वर महादेव संस्थान चांदुर रेल्वेचे अध्यक्ष कैलास गिरोळकर, रुक्मिणी विदर्भ पीठ चे विश्वस्त श्रीकृष्ण माहोरे, मारुती महाराज संस्थान सालबर्डी चे विश्वस्त अतुल उर्फ पप्पू देशमुख, मिलिंद देशमुख यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच विठ्ठलराव सावरकर, मंगेश जगताप, राजेश्वर रामेकर, प्रकाश भाकरे, निलेश निवल, प्रदीप आकोटकर, गजानन बुरघाटे, नरेंद्र देशमुख, प्रशांत डागा, वेदांत चौधरी, संदीप बेलसरे, देवरावजी होरुळकर, गजाननराव होणाडे, केशव हिमाने, रामेश्वर राठी, मनोज मारोडकर, रत्नाकर वानखडे, हेमंत भाकरे, भीमरावजी इंगोले, लक्ष्मण धडांगे, अशोक पवार, सदानंद भालेराव, अरुण कावरे, मनोहर टेकाडे, सुरेश भाकरे, अशोक राऊत, सुरेश भारती, हिम्मतराव टाकोने, अनिल मापले, अनिल काढणे, गोपाल कडू, संकेत चौधरी, पवन भोजने, राजेंद्र देशमुख, अनिल बाबुळकर, डॉ. प्रवीण बेलसरे, मोरेश्वर काळमेघ, मंगेश मोरे, भीमराव भारी, दीपकराव चौधरी, सुरेश राऊत, दत्तात्रय माळोदे यांच्यासह विविध मंदिर विश्वस्त व नागरिक उपस्थित होते.

पान १ व १० वरून

## 3 दिवसांचे अधिवेशन

वीज खंडित करू नका. दुष्काळग्रस्त भागात कोणत्याही प्रकारचे लोडशेडिंग करू नका. शेतीवर अवलंबून असणा-या शेतकरी व शेतमजूर कुटुंबांना प्रतिकुटुंब २५ किलो धान्य सरसकट मोफत द्या. दुष्काळी परिस्थितीमुळे अडचणीत आलेल्या शेतकरी व शेतमजुरांकडील पशुधनासाठी थेट त्यांच्या बँक खात्यामध्ये अनुदान जमा करा. जलसंधारणाची कामे सुरू करण्यासाठी सध्याचे निकष शिथिल करा. दुष्काळी परिस्थितीची तीव्रता लक्षात घेता, शेतक-यांना प्रतिहेक्टर एक लाख रुपये तसेच शेतमजुरांना २५ हजार रुपये अनुदान द्या, अशी मागणीही पवार यांनी केली आहे.

**विद्यार्थ्यांचे शुल्क माफ करा-** दुष्काळामुळे फळबागा, केळी, उस व धान यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याने शेतक-यांना तातडीने आर्थिक मदत द्या. ज्या शेतक-यांनी मोठ्या प्रमाणावर फळबागांची लागवड केलेली आहे, अशा शेतक-यांना शासनाद्वारे टँकरद्वारे पाणीपुरवठा करा. शेतकरी अथवा शेतमजूर यांच्या वैयक्तिक लाभाच्या योजनां अंतर्गत प्रलंबित असलेली थकीत देयके व त्यावरील अनुदान तातडीने वितरित करा. दुष्काळ निवारणासाठी आवश्यक असलेला संपूर्ण निधी विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्याकडे तातडीने वर्ग करा. दुष्काळग्रस्त भागातील शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची शैक्षणिक तसेच वसतिगृहांमध्ये राहणा-या विद्यार्थ्यांची वसतिगृह फी आणि खानावळ शुल्क संपूर्णपणे माफ करा, अशी मागणीही पवार यांनी केली आहे.

**लोकप्रतिनिधी एका महिन्याचा पगार देणार-** ग्रामीण भागांत दुष्काळी स्थिती गंभीर आहे. आतापासूनच पाणी टंचाई जाणवू लागली आहे. शहरी, ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्यासह शेती आणि जनावरांच्या चारा पाण्याचे ठोस नियोजन करण्याची गरज आहे. केवळ देउन चालणार नाही, तातडीने उपाययोजनांची गरज आहे. पक्षाचे आमदार, खासदार एका महिन्याचे वेतन दुष्काळ निवारणासाठी मुख्यमंत्री निधीत जमा करणार आहेत, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी दिली.

## मतदानाची चोरी नाही;

आले नाही. उलट त्यांनी सर्जिकल स्ट्राईकवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. चीनच्या सिमेवर तैनात जवान चीनकडून मार खात असल्याचे विधान करून जवानांचा अपमान केला. ते सतत खोटे बोलतात आणि नंतर न्यायालयात माफी मागतात. निवडणूक आयोगामध्ये तिन्ही आयुक्तांत कुठलाही वाद नाही. सर्व निर्णय एकमताने घेतल्याचे त्यांनी संयुक्तपणे सांगितले आहे. मुळात राहूल गांधी आपला मुद्दा जनतेला पटवून देउ शकत नाही, त्यामुळे ते जनतेला संभ्रमित करीत आहेत, असा आरोप मुख्यमंत्री फडणवीस यांनी केला. पश्चिम बंगालमध्ये ज्या क्षेत्रात एसआयआरच्या माध्यमातून मतदार कमी झाले, अशा १५ ठिकाणी तृणमूल काँग्रेस विजयी झाली. एसआयआरमध्ये प्रत्येक पक्षाला संधी आहे, असेही ते म्हणाले.

**देशात अराजकता निर्माण करण्याचे काम-** राहूल गांधी यांना संवैधानिक संस्थांना बदनाम करून त्यावरील विश्वासाला सुरुंग लावून अराजकता तयार करण्याते काम करीत आहे. अराजकता निर्माण करून डाव्या विचारसरणींना ते सत्तेत आणू पाहत आहे. परंतु त्यांचे मनसुबे कधीही पूर्ण होउ देणार नाही, असा इशारा फडणवीस यांनी दिला. सध्या इंडिया आघाडी राहीली नाही. लोकसभेनंतर सर्व वेगवेगळे झाले आहेत. मोदींना विरोध करणारे लोक, एवढीच त्यांची ओळख राहीली, अशी टिकाही त्यांनी केली.

## एआय मुळे कोट्यवधी लोकांचे

अंतर्गत धोरणांवर सोडणे योग्य ठरणार नाही. सुरक्षा आणि मानिटरिंगसाठी बंधनकारक नियम असणे आवश्यक आहे.

**एआयमुळे वेगवान विकासावरही चिंता-** एआयच्या वाढत्या क्षमतेबाबत चिंता व्यक्त करणारे गेट्स हे एकमेव तंत्रज्ञान क्षेत्रातील व्यक्ती नाहीत. ॲंट्रोपिकचे सीईओ डारियो अमोडेई यांनीही सप्टेंबर २०२६मध्ये एआय माडेल्सच्या क्षमतेत होणा-या वेगवान वाढीचा वेग काही प्रमाणात कमी करण्याचे आवाहन केले आहे. अमोडेई यांच्या मते, एआयची क्षमता ज्या वेगाने वाढत आहे, त्या तुलनेत सुरक्षा व्यवस्था आणि नियंत्रणाची साधने मागे पडू शकतात. त्यांनी तृतीय-पक्षाकडून एआय माडेल्सचे सुरक्षा मूल्यांकन, उद्योगातील समन्वय आणि सरकारांशी आंतरराष्ट्रीय सहकार्य यांसारख्या उपायांची मागणी केली आहे.

## दीक्षाभूमीवर साकारणार

आदित्य मिरखेलकर, सिंगा रेड्डी, समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे, प्रादेशिक उपायुक्त प्रसाद कुलकर्णी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार अनुयायांच्या सोयी-सुविधांवर विशेष लक्ष केंद्रित करून महोत्सवाचे नियोजन करावे, असे डॉ. कांबळे यांनी सांगितले. यावेळी समाज कल्याण विभागाच्या वतीने अनुयायांसाठी करण्यात येणा-या सुविधांचे सादरीकरण करण्यात आले. तसेच तक्रार निवारण केंद्र, महिलांसाठी हिरकणी कक्ष, बालकांसाठी खेळण्याची जागा आदी व्यवस्था करण्यात येणार आहे. अनुयायांच्या आरोग्याच्या दृष्टीने औषधसाठा, वैद्यकीय कक्ष, मोबाईल हॉस्पिटल आणि रुग्णवाहिकांची व्यवस्था करण्यात येणार आहे. महिला, बालके आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र कक्ष उपलब्ध करून देण्यात येतील. स्वच्छतेसाठी नियमित स्वच्छता, जंतुनाशक व डास प्रतिबंधक फवारणी, मोबाईल टायलेट्स आणि कचराकुंड्यांची पुरेशी व्यवस्था करण्याच्या सूचना देण्यात आल्या. अनुयायांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस बंदोबस्त, महिला सुरक्षा पथक, अग्निशमन दल आणि नियंत्रण कक्ष कार्यरत ठेवण्यात येणार आहे. तसेच अनुयायांना आवश्यक माहिती मिळावी यासाठी हेल्पलाइन क्रमांक, दिशादर्शक नकाशे आणि उद्घोषणा प्रणालीची व्यवस्था करण्यात येणार आहे. सर्व विभागांनी समन्वयाने काम करून धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा सोहळा सुरळीतपणे पार पाडावा, असे निर्देश यावेळी देण्यात आले.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी मिडी बसेस

आदिवासी नागरिक आणि विशेषतः शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी दररोज १० ते १५ किलोमीटरपर्यंतची पायपीट करावी लागते. या पायपिटीमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या वाटेत अडथळे निर्माण होउ नयेत आणि दुर्गम भागातील नागरिकांना सुरक्षित, विश्वासार्ह सार्वजनिक वाहतूक उपलब्ध व्हावी, यासाठी २८ आसनी मिडी बसेस दुर्गम मार्गांवर चालविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**सामाजिक बांधीलकी महत्त्वाची!-** सार्वजनिक वाहतूक ही केवळ नफा-तोट्याच्या ताळेबंदात मोजण्याची सेवा नाही; ती समाजाशी जोडलेली जबाबदारी आहे. एखाद्या विद्यार्थ्याला शाळेपर्यंत पोहोचण्यासाठी दररोजची पायपीट वाचत असेल, एखाद्या आदिवासी कुटुंबाला बाजारपेठ, रुग्णालय किंवा शहराशी जोडणारा प्रवास सहज होत असेल, तर त्या सेवेचे मूल्य केवळ आर्थिक गणिताने ठरविता येणार नाही.

**वाडी-वस्ती तिथे एसटीकडे!-** गाव तिथे एसटी ही एसटीची वर्षानुवर्षांची ओळख आहे. मात्र, स्वातंर्त्याला ८० वर्षे उलटूनही डोंगर-द-यांच्या कुशीत असलेल्या अनेक आदिवासी पाड्यांपर्यंत एसटीची सेवा अद्याप पोहोचलेली नाही. या पाड्यांना मिडी बसेसच्या माध्यमातून जोडणे म्हणजे केवळ वाहतूक सुविधा देणे नव्हे, तर त्यांना शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि विकासाच्या मुख्य प्रवाहाशी जोडण्याचे काम आहे, असे प्रतिपादन सरनाईक यांनी केले.

## वृक्षतोड प्रकरणी कंत्राटदाराला

`तरी केवळ कंत्राटदारावर कारवाई करून वृक्ष तोडीचे तोंडी आदेश देणाऱ्या नगरसेवकांना वाचवले जात असल्याची चर्चा शहरात सुरू आहे.

## वर्षभर रखडलेल्या ४२० कोटींच्या

नगराध्यक्ष अविनाश गायगोले, उपाध्यक्षा प्रियंका मालठाणे, बांधकाम सभापती नईम बेग हसन बेग यांच्यासह नगरपरिषदेच्या लोकप्रतिनिधींचे नागरिकांकडून कौतुक होत आहे. ही विकासकामे मुख्याधिकारी विजय लोहकरे यांच्या मार्गदर्शनाखाली, तर अभियंता करण अग्रवाल आणि अभियंता वैष्णवी काळे यांच्या देखरेखीखाली सुरू असून, वेळोवेळी कामांच्या गुणवत्तेची तपासणी करण्यात येत आहे. या विकासकामांमुळे नागरिकांना होणारा त्रास आता कमी होणार असून, नागरिकांत समाधानाचे वातावरण आहे. नगरपरिषदेच्या या निर्णयाचे शहरवासीयांकडून स्वागत करण्यात येत असून, उर्वरित कामेही लवकरात लवकर पूर्ण करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## शेतातील कुंपणातून आठ जनावरे

त्याने उडवाउडवीची उत्तरे दिल्याचे पोलिसांनी सांगितले. मात्र, सखोल चौकशीनंतर त्याने साथीदारांच्या मदतीने जनावरे चोरी केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. त्यानंतर पोलिसांनी त्याच्या साथीदारांचा शोध घेत मोर्शी तसेच राणीपूर, जिल्हा बैतूल (मध्य प्रदेश) येथून आणखी चार आरोपींना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनीही गुन्ह्यात सहभाग असल्याची कबुली दिल्याची माहिती पोलिसांनी दिली. चोरी केलेली जनावरे कुठे विकली, याबाबत पोलिसांनी चौकशी केली असता आरोपींनी जनावरे अर्जुन बलदेव पठारिया याच्या माध्यमातून मध्य प्रदेशातील भानपूर, जिल्हा भोपाळ येथील बैल बाजारात विनापावती विकल्याचे सांगितल्याचे पोलिसांनी नमूद केले. या जनावरांची सुमारे एक लाख रुपयांत विक्री करून मिळालेली रक्कम आरोपींनी आपसात वाटून घेतल्याचे तपासात समोर आल्याचे पोलिसांना सांगीतले. या कारवाईत पोलिसांनी आरोपींकडून ७५ हजार ३०० रुपये रोख, चार मोबाईल फोन तसेच जनावरे चोरी करण्यासाठी वापरलेले एमपी २१ जी १९७० क्रमांकाचे बोलेरो पिकअप वाहन जप्त केले. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत ६ लाख ९ हजार ३०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. अब्दुल आवेज अब्दुल अनिस (वय २५, रा. यास्मिन नगर, अमरावती), अब्दुल शाकीर अब्दुल साबीर (वय ३४, रा. पिंपळपुरा, मोर्शी), शेख नईम शेख रहीम (वय ४०, रा. सुलतानपुरा, मोर्शी), जमीर खान साबीर खान (वय ३४, रा. सुलतानपुरा, मोर्शी) आणि अर्जुन बलदेव पठारिया (वय २५, रा. देशवाडी, जि. बैतूल, मध्य प्रदेश) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. आरोपींना पुढील कायदेशीर कारवाईसाठी मोर्शी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक आकाश शिवणकर, पोलीस अंमलदार रूपेश गावंडे, विवेक घोरमाडे, शांताराम सोनोने, सायबरचे शिवा सिरसाट, रितेश गोस्वामी व चालक प्रज्वल राऊत यांच्या पथकाने केली.

## पीडित महिलेचे एसडीओ कार्यालयासमोर

प्रशासनाच्या भूमिकेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

**'महिलेला तात्काळ न्याय द्या' – मोहोड**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया तालुका अध्यक्ष किशोर मोहोड यांनी उपोषणस्थळी भेट देऊन पीडित महिलेची माहिती जाणून घेतली. 'सदर प्रकरणाची तात्काळ चौकशी करून पीडित महिलेला न्याय मिळवून द्यावा. तक्रारीत नमूद असलेल्या पाच जणांच्या भूमिकेचीही चौकशी करून कायद्यानुसार कारवाई करावी,' अशी मागणी मोहोड यांनी केली.

## भातकुली आश्रमशाळेत विद्यार्थिनीचे

परिस्थिती आणि मृत्यूचे नेमके कारण जाणून घेण्यासाठी चौकशी सुरू करण्यात आली आहे. प्रकल्प अधिकाऱ्यांकडून विद्यार्थिनीची प्रकृती, तिला देण्यात आलेले उपचार तसेच घटनेशी संबंधित अन्य बाबींची माहिती घेतली जाणार आहे. चौकशीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

## 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत

करणाऱ्या वाहनांच्या माध्यमातून ही कार्यवाही करण्यात आली. नागरिकांच्या घरांमध्ये अथवा घरांच्या परिसरात काही कारणास्तव साचून राहिलेला कचरा तातडीने उचलण्यावर या मोहिमेत विशेष भर देण्यात आला. या अभियानांतर्गत झोन क्रमांक १ मधील प्रभाग क्रमांक १, प्रभाग क्रमांक २, प्रभाग क्रमांक ३, प्रभाग क्रमांक ५ प्रभाग क्रमांक ६ या भागांमध्ये विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. मनपाच्या पथकांनी संबंधित भागात प्रत्यक्ष फिरून घराघरांतून कचरा संकलित केला. कचरा संकलनासाठी उपलब्ध असलेल्या वाहनांचा नियोजनबद्ध वापर करण्यात आला. अतिरिक्त वाहनांच्या उपलब्धतेमुळे मोठ्या प्रमाणात साचलेला कचरा वेळेत उचलण्यास मदत झाली. अमरावती महानगरपालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांनी नागरिकांना स्वच्छता मोहिमेत सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले आहे. घरातील कचरा रस्त्यावर अथवा सार्वजनिक ठिकाणी न टाकता तो नियमितपणे महानगरपालिकेच्या कचरा संकलन वाहनांकडे द्यावा. यावेळी अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त नरेंद्र वानखडे, उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त भाग्यश्री बोरेकर, सहायक आयुक्त नंदकिशोर तिखिले, भूषण पुसतकर, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ.अजय जाधव, ज्येष्ठ स्वास्थ निरीक्षक, स्वास्थ निरीक्षक, बिटप्यून, सफाई कामगार, मनपा कर्मचारी, कंत्राटदार उपस्थित होते.

## शोभायात्रेत शॉक लागून युवकाचा

आणले. गेल्या १० ते १२ दिवसांपासून जीवन-मरणाचा लढा देणाऱ्या या १८ वर्षांच्या उमद्या तरुणाने काल २७ सप्टेंबर रोजी उपचारादरम्यान अखेरचा श्वास घेतला.

सुरक्षेचा निष्काळजीपणा-

गणपती आगमन व विसर्जन मिरवणुकांमध्ये डिजे, ढोल-ताशांसोबतच भव्य लायटिंग लावण्याची चढाओढ दिसून येते. मात्र, या रोषणाईसाठी वापरण्यात येणाऱ्या विद्युत वायर्स, जनरेटर आणि वायरिंगच्या सुरक्षेकडे सर्रास दुर्लक्ष केले जाते. आयोजक व प्रशासनाने अशा गर्दीच्या प्रसंगी सुरक्षेच्या नियमांचे कडक पालन करणे अत्यंत गरजेचे आहे. एका निष्पाप १८ वर्षीय तरूण असा दुर्दैवी बळी गेल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. गणेश पवार याच्या अकाली निधनाने त्याच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, संपूर्ण परतवाडा व आसपासच्या परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## समता मार्केटमध्ये घाणीचे साम्राज्य

अस्वच्छता करणाऱ्यांवर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची मागणी दुकानदारांकडून होत आहे. प्रशासनाने केवळ स्वच्छतेच्या सूचना न देता प्रत्यक्ष पाहणी करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. समता मार्केटमधील अस्वच्छतेच्या प्रकारांवर नगरपरिषद प्रशासन दंडात्मक कारवाई करणार का? तसेच या परिसरातील स्वच्छतेकडे नियमित लक्ष दिले जाणार का? याकडे आता मार्केटमधील दुकानदारांचे लक्ष लागले आहे.

## अंजनगावत गणेशोत्सव शांततेत

किरकोळ वादांवरही तात्काळ तोडगा काढण्यात आल्याने मोठी घटना टळली. या पारदर्शक आणि कर्तव्यदक्ष कार्यपद्धतीमुळे सध्या सोशल मीडियावर ठाणेदार बोंडे यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. सर्व जाती-धर्मातील नागरिक, युवक, ज्येष्ठ नागरिक आणि मंडळाचे पदाधिकारी त्यांच्या कामाचे कौतुक करणाऱ्या पोस्ट व्हायरल करीत आहेत. आगामी काळातही अशीच दक्षता राहिल्यास शहराचे नाव राज्यात आदर्श म्हणून घेतले जाईल, अशी भावना नागरिक व्यक्त करीत आहेत.

## माजी नगराध्यक्ष हरिशंकर अग्रवाल

राणा, अचलपूर नगर परिषदेचे नगराध्यक्ष रुपाली अभय माथने, चांदुरबाजारचे नगराध्यक्ष मनिषा नागलिया ,बबलु शेखावत आदी प्रमुख राजकीय नेत्यांनी प्रत्यक्ष भेट देऊन अग्रवाल कुटुंबीयांप्रती शोकसंवेदना व्यक्त केल्या. याशिवाय जुळ्या शहरातील विविध व्यापारी संघटना, सामाजिक संस्था आणि विविध राजकीय पक्षांच्या आजी-माजी पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहून हरिशंकर अग्रवाल यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. अंतिम यात्रेत आणि स्मशानभूमीत अचलपूर व परतवाडा शहरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

माजी नगराध्यक्ष हरिशंकर अग्रवाल यांनी अचलपूर शहराच्या विकासात दिलेल्या प्रदीर्घ योगदानाचा गौरव आणि त्यांना आदरांजली वाहण्यासाठी आज सोमवार २८ सप्टेंबर रोजी दुपारी १२:०० वाजता अचलपूर नगर परिषदेत सामूहिक श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या शोकसभेत शहरातील सर्व नागरिक, लोकप्रतिनिधी व विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ सोमवार, २८ सप्टेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठ ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# साडेसात कोटींची पाणी योजना ; आठ वर्षांत फलश्रुती शून्य ?

## घुंगशी बॅरेज ते मूर्तिजापूर १९.३२ किलोमीटर पाइपलाइन ; २०१८ मध्ये पाणी सुरू करण्याचा शासनाचा आदेश, आता पुन्हा टंचाईचे संकट

■ जयप्रकाश रावत ■

**मूर्तिजापूर :** पाणीटंचाईच्या झळा बसू नयेत म्हणून शासनाने कोट्यवधी रुपये खर्च केले, १९.३२ किलोमीटरची पाइपलाइन टाकली, पंपिंग यंत्रणा उभारली आणि ३१ मार्च २०१८ पर्यंत मूर्तिजापूर शहराला पाणीपुरवठा सुरू करण्याचा आदेशही दिला. मात्र आठ वर्षांचा कालावधी उलटून गेला आणि आज पुन्हा शहरावर पाणीटंचाईचे संकट घोंघावत आहे. त्यामुळे साडेसात कोटींच्या या महत्त्वाकांक्षी पाणी योजनेतून आठ वर्षांत मूर्तिजापूरकरांच्या नळाला नेमके किती पाणी मिळाले? हा सवाल आता थेट प्रशासनाच्या दारात उभा ठाकला आहे. पाइपलाइन झाली, पैसा खर्च झाला; पण पाणी किती आले? याचे उत्तर आता केवळ कागदोपत्री पूर्ततेने चालणार नाही.

२०१७-१८ मध्ये मूर्तिजापूर शहरातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी घुंगशी बॅरेजमधून पाइपलाइनद्वारे पाणी आणण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला. सुरुवातीचा प्रस्ताव ७४८.४२ लाख रुपयांचा होता. स्थायी समितीच्या बैठकीनंतर काही बाबींमध्ये बदल करून ७२३.४४ लाख रुपयांच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. पुढे पीएमसी चार्जेससह योजनेचा खर्च सुमारे ७ कोटी ५० लाख रुपये झाला. इतका मोठा निधी खर्च करून उभारलेली योजना नेमकी किती क्षमतेने चालली? किती दिवस चालली? किती पाणी उचलले? शहराच्या पाणीपुरवठ्यात किती भर पडली? योजनेची सद्यस्थिती काय आहे? या प्रश्नांची उत्तरे आता नागरिकांना हवी आहेत.

### ६ कोटींची पाइपलाइन; मग पाण्याचा प्रवाह कुठे?

योजनेतील सर्वाधिक खर्च १९.३२ किलोमीटर लांबीच्या २५० मिमी व्यासाच्या एचडीपीई पाइपलाइनवर करण्यात आला. त्यासाठी तब्बल ६ कोटी १२ लाख ४९ हजार ८५० रुपये खर्चाची तरतूद होती. सबमर्सिबल पंपासाठी सुमारे ४९.२८ लाख, विद्युत जोडणीसाठी २३.६८ लाख, रेल्वे व रस्ता क्रॉसिंगसाठी १५ लाख रुपये, तर पीएमसी चार्जेससह एकूण खर्च ७ कोटी ५० लाख २६ हजार १५३ रुपये इतका झाला. म्हणजे पैसा मोठा, पाइपलाइन मोठी आणि योजना कागदावर महत्त्वाकांक्षी. पण शहराच्या पाणीपुरवठ्याच्या नळातून या योजनेची फलश्रुती किती वाहिली? हा प्रश्न आता टाळता येणार नाही.

### शासनाने डेडलाइन दिली होती; पाणी सुरू झाले का?

शासन निर्णयातील अटी अत्यंत स्पष्ट होत्या. ३१ जानेवारी २०१८ पर्यंत निविदा प्रक्रिया पूर्ण करून कार्यारंभ आदेश देणे आणि ३१ मार्च २०१८ पर्यंत योजना पूर्ण करून पाणीपुरवठा सुरू करणे बंधनकारक होते. निर्धारित मुदतीत पाणीपुरवठा सुरू न झाल्यास योजनेची मान्यता रद्द करण्याची अटही होती. उपलब्ध माहितीनुसार एप्रिल २०१८ मध्ये योजनेचे काम पूर्ण झाले. म्हणजे कागदावरील काम पूर्ण झाले; पण त्यानंतरचा सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे ; शहराच्या तहानेला किती दिलासा मिळाला? कारण पाइपलाइन पूर्ण होणे आणि त्या पाइपलाइनमधून नियमित, पुरेशा क्षमतेने नागरिकांना पाणी मिळणे यात जमीन-अस्मानाचा फरक आहे.

### पाणीटंचाईवर योजना की फक्त पाइपलाइन?

आज पुन्हा पाऊस लांबल्याने मूर्तिजापूरसमोर पाणीटंचाईचे संकट उभे राहण्याची शक्यता आहे. प्रशासन संभाव्य टंचाईवर उपाययोजना करण्याच्या तयारीत आहे. मात्र त्याआधी आठ वर्षांपूर्वी उभारलेल्या या योजनेचा पूर्ण लेखाजोखा तपासण्याची गरज आहे. जर योजना पूर्ण क्षमतेने कार्यरत असेल, तर तिचा पाणीटंचाईवर परिणाम किती झाला? जर योजना अपुऱ्या क्षमतेने चालत असेल, तर अडथळा कुठे आहे? जर योजना बंद असेल, तर ती बंद का आहे? आणि जर योजना अपेक्षेप्रमाणे कार्यरतच झाली नसेल, तर त्यासाठी जबाबदार कोण?

### ४० हजार ४५० लिटर प्रतितास क्षमता; प्रत्यक्ष पुरवठा किती?

योजनेत ताशी ४० हजार ४५० लिटर क्षमतेचे ४० अश्वशक्तीचे सबमर्सिबल पंप प्रस्तावित करण्यात आले होते. स्टँडबाय पंपाचीही तरतूद होती. मग या क्षमतेनुसार आजपर्यंत किती पाणी उचलण्यात आले? दररोज किती पाणी शहरात पोहोचले? किती दिवस यंत्रणा बंद होती? पाइपलाइनची सद्यस्थिती काय आहे? पंप कार्यरत आहेत का? वीजपुरवठा नियमित आहे का? या सर्व प्रश्नांची मोजमापासह उत्तरे सार्वजनिक झाली पाहिजेत.

### 'फलश्रुती'चा अहवाल जनतेसमोर कधी?

या योजनेचे काम नगर परिषदेमार्फत करण्यात आले, तर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून काम पाहिले. त्यामुळे नगर परिषद आणि मजीप्राने संयुक्तपणे या योजनेचा आठ वर्षांचा कामगिरी अहवाल जाहीर करणे गरजेचे आहे. योजनेवर किती निधी खर्च झाला, आतापर्यंत किती पाणीपुरवठा झाला, देखभाल-दुरुस्तीवर किती खर्च झाला, सध्या योजना कोणत्या क्षमतेने सुरू आहे आणि शहराच्या एकूण पाणीपुरवठ्यात तिचा वाटा किती आहे—हे सर्व आकडे जनतेसमोर आले पाहिजेत. कारण जनतेच्या पैशातून उभारलेली पाइपलाइन जमिनीखाली असली तरी तिचा हिशोब जमिनीखाली गाडला जाऊ शकत नाही! आठ वर्षांपूर्वी टंचाई दूर करण्यासाठी मंजूर झालेल्या साडेसात कोटींच्या योजनेची आज पुन्हा गरज भासत असेल, तर ही योजना नेमकी किती यशस्वी झाली, याचा शोध घेण्याची वेळ आली आहे. पाणीटंचाई पुन्हा दारात; मग साडेसात कोटींच्या योजनेचे पाणी गेले कुठे? हा प्रश्न आता मूर्तिजापूरकरांचा आहे.

# जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे पथनाट्य



■ प्रतिनिधी | वाशिम ■

महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरण च्या कॉमन मिनिमम प्रोग्राम किमान निर्धारित कार्यक्रमा अंतर्गत वाशिम जिल्हा विधी सेवा प्राधिकरण च्या वतीने गणेशोत्सव दरम्यान विविध गणेश मंडळांसमोर पोक्सो कायदा जनजागृती, बाल विवाह प्रतिबंधक कायद्यावर जनजागृती पर व येत्या काळात १२ डिसेंबर रोजी होणाऱ्या लोक अदालत संदर्भात वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळे पथनाट्य सादर करून वरील विषयांची जनजागृती होऊन कायद्याची योग्य अंमलबजावणी व्हावी या उद्देशाने सदर पथनाट्य सादर करण्यात येत आहे. या पथनाट्याची सुरुवात दिनांक १६ सप्टेंबर रोजी देवपेठ स्थित महाराष्ट्र गणेशोत्सव मंडळ, १७ सप्टेंबर रोजी मंत्री पार्क येथील मंत्री पार्क गणेशोत्सव मंडळ, १८ सप्टेंबर रोजी वाशिम तालुक्यातील राधाकृष्ण गणेशोत्सव मंडळ कोंडाळा झामरे व १९ सप्टेंबर रोजी आडोळी छत्रपती गणेशोत्सव मंडळ समोर सादर केले.

# शिवमहिमा सोहळ्यात भक्तीचा जागर २३ हजार भाविकांना महाप्रसाद

**वाशिम :** गणेश विसर्जन मिरवणुकीच्या मार्गावरील टेकडीवर हेडा परिवाराच्या वतीने गेल्या १६ वर्षांपासून सुरू असलेली महाप्रसादाची परंपरा यंदाही उत्साहात कायम राहिली. २५ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या शिवमहिमा सोहळ्यात शिवभक्ती आणि गणेशभक्तीचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला. हरिद्वार येथील २५ कलावंतांनी सलग १२ तास भगवान शिव व श्रीकृष्ण यांच्या जीवनावर आधारित नृत्य सादरीकरण करून भाविकांचे लक्ष वेधून घेतले.

गणेश विसर्जन मिरवणुकीत सहभागी होणाऱ्या भाविकांसाठी टेकडीवर आयोजित महाप्रसादाचा सुमारे २३ हजारांहून अधिक भाविकांनी लाभ घेतला. हेडा परिवाराच्या पुढाकाराने दरवर्षीप्रमाणे यंदाही मोठ्या प्रमाणात महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती. यात सुमारे



१९ क्विंटल गव्हाच्या पोळ्या, दोन क्विंटल बेसन, नऊ क्विंटल भात तसेच ७० किलो शुद्ध तुपापासून तयार करण्यात आलेल्या शिऱ्याचा समावेश होता. गणेशोत्सवाच्या विसर्जन मिरवणुकीला वाशिम शहरात प्रदीर्घ परंपरा असून, मिरवणुकीतील भाविकांसाठी टेकडीवरील हा महाप्रसाद श्रद्धा आणि सेवाभावाचे केंद्र ठरतो. यंदाही सकाळी ११ वाजेपासून रात्री ११ वाजेपर्यंत महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. या उपक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती लावली. खासदार संजय देशमुख, आमदार श्याम खोडे, नगराध्यक्ष अनिल केंदळे, भाजप जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे, जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, जिल्हा पोलिस अधीक्षक निकेश खाटमोडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान आदींनी उपस्थित राहून भाविकांना महाप्रसादाचे वितरण केले. या दोन्ही उपक्रमांसाठी माजी नगराध्यक्ष अशोक हेडा, व्यावसायिक दिलीप हेडा, रोहित हेडा, नगर परिषद सभापती कुणाल हेडा यांच्यासह हेडा परिवार आणि नागरिकांनी पुढाकार घेतला.

# लिंबूपाणी घेऊन उपोषणाची सांगता

**मानोरा :** बंजारा समाजाच्या मागण्यांसाठी श्रीक्षेत्र पोहरादेवी येथे सुरू असलेल्या आमरण उपोषणाने रविवारी नाट्यमय वळण घेतले. सकाळी रमेश पवार, सुरेश राठोड आणि सतीश पवार यांनी डॉ. रामरावबापू महाराज यांच्या मंदिरावर चढून टोकाचे पाऊल उचलण्याचा प्रयत्न केल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. धर्मगुरू आ. बाबुसिंग महाराज, शेखर महाराज आणि भक्तराज महाराज यांनी आंदोलकांना शांततेचे आवाहन केल्यानंतर तब्बल एका तासाने आंदोलक मंदिरावरून खाली उतरले. यानंतर शासनाच्या वतीने नायब तहसीलदार उमेश बनसोड यांनी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या पत्राचे वाचन केले. बंजारा समाजाच्या मागण्यांबाबत गठीत केलेल्या समितीला आता ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली.

# बांबर्डा (कानकिरड) येथे 'एक गाव, एक गणपती'ची परंपरा कायम

■ प्रतिनिधी | कारंजा ■

शिवबा ग्रुप गणेशोत्सव मंडळाच्या वतीने यंदाचा गणेशोत्सव मोठ्या उत्साहात, भक्तिमय वातावरणात आणि सामाजिक एकोप्याने साजरा करण्यात आला. गावातील श्री गजानन महाराज मंदिर येथे श्री गणेशाची विधिवत स्थापना करण्यात आली. विशेष म्हणजे, बांबर्डा (कानकिरड) येथे गेल्या २० वर्षांपासून 'एक गाव, एक गणपती' ही संकल्पना अखंडपणे सुरू असून, यंदाही गावातील नवयुवकांनी एकत्रित येत गणेशोत्सव साजरा केला.

'एक गाव, एक गणपती' या संकल्पनेमुळे गावातील नागरिकांमध्ये एकोपा, बंधुभाव आणि सामाजिक सलोखा निर्माण होण्यास हातभार लागत आहे. गणेशोत्सवाच्या निमित्ताने गावातील नवयुवक एकत्र येऊन उत्सवाचे



नियोजन करतात. त्यामुळे धार्मिक उत्सवासोबतच युवकांच्या एकजुटीचे आणि सामूहिक सहभागाचे दर्शन यंदाच्या गणेशोत्सवात घडले.

गणेशोत्सवाच्या कालावधीत श्री गणरायाच्या दर्शनासाठी ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती. मंडळाच्या कार्यकर्त्यांनी उत्सवाचे नियोजन आणि विविध व्यवस्था सुरळीतपणे पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले. ग्रामस्थांनीही मंडळाच्या उपक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.दि. २४ सप्टेंबर रोजी शिवबा ग्रुप गणेशोत्सव मंडळाच्या वतीने भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

# आझाद हिंद नवदुर्गा उत्सव मंडळाची बैठक उत्साहात संपन्न; ५९ व्या नवरात्रोत्सवाची उत्साहात तयारी



■ प्रतिनिधी | कारंजा ■

आझाद हिंद नवदुर्गा उत्सव मंडळाच्या ५९ व्या नवरात्र उत्सवाच्या नियोजनाची बैठक दि. २६ सप्टेंबर रोजी रात्री ९ वाजता मोठे राममंदिराच्या प्रांगणात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी दुर्गेश रॉय होते. प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून संजय पेटकर, प्रमोद श्रीराव, जाजडाजी, रवि राठोड, आशीष गावंडे व अमर रोडे यांची उपस्थिती होती. यावेळी आगामी नवरात्रोत्सवाच्या विविध कार्यक्रमांचे नियोजन, उत्सवाची रूपरेषा, भाविकांसाठी आवश्यक सुविधा तसेच उत्सव भक्तिभावाने, शिस्तबद्ध व उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीत नवरात्र उत्सव २०२६ च्या अध्यक्षपदी श्री. संजय खंडारे, तर उपाध्यक्षपदी श्री. संदीप कुऱ्हे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे उपस्थित सदस्यांनी अभिनंदन केले. विशेष म्हणजे, आझाद हिंद नवदुर्गा उत्सव मंडळाच्या वतीने मागील काही वर्षांपासून नवरात्रोत्सवाच्या माध्यमातून विविध समाजोपयोगी व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. त्यामुळे यंदाच्या ५९ व्या नवरात्रोत्सवानिमित्त मंडळातर्फे कोणता आगळावेगळा सामाजिक उपक्रम राबविला जाणार, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले असून नागरिक कुतूहलाने या उपक्रमाची वाट पाहत आहेत. नवयुवकांची बहुसंख्येने उपस्थिती होती. नवयुवकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे यंदाचा नवरात्रोत्सव अधिक उत्साहपूर्ण आणि भव्य स्वरूपात साजरा करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# तळप बुद्रुक येथील ग्रामपंचायत विकास कामात गैरव्यवहार; चौकशी करण्याची मागणी



■ प्रतिनिधी | मानोरा ■

तळप बुद्रुक येथील ग्रामपंचायत अंतर्गत झालेल्या विकास कामात गैर व्यवहार झाला असून या प्रकरणी चौकशी करण्यात यावी.

अशी मागणी तहसीलदार यांच्या कडे दिनांक २१ सप्टेंबर रोजी करण्यात आली. गट विकास अधिकारी, तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले की, सन २०२१- २२ मध्ये १५ व्या वित्त आयोगातून २.९९ हजार रुपये आर ओ प्लांट साठी मंजूर झाले.मात्र अद्याप आर ओ प्लांट बसविण्यात आले नाही,परंतु हा निधी खर्च केल्याचा आरोप करण्यात आला. तसेच क्रीडांगण साठी आलेला निधी खर्च करून काम निकृष्ट करण्यात आले, दिव्यंगासाठी पाच टक्के निधी खर्च करण्यात आला नाही, दलीत वस्ती मधील रस्ता काम निकृष्ट करण्यात आले.या सर्व कामाची चौकशी करण्यात यावी.

# मराठा समाज सेवा मंडळाचा गुणगौरव सोहळा उत्साहात

■ प्रतिनिधी | वाशिम ■

स्थानिक पवन मंगल कार्यालयामध्ये मराठा समाज सेवा मंडळाच्या वतीने रविवार २० सप्टेंबर रोजी आयोजित गुणगौरव सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी मराठा समाजातील सामाजिक, व्यावसायिक, शासकीय सेवेतील अधिकारी, कर्मचारी व शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गुणवंतांचा मान्यवरांच्या हस्ते शाल, ट्राफी, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठा समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.भाऊसाहेब काळे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून आमदार भावनाताई गवळी, माजी जिल्हा परिषद सदस्य पांडूरंग ठाकरे , वाशीम बाजार समितीचे सभापती महादेवराव



काकडे, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष चक्रधर गोटे, डॉ. नारायणराव गोटे, डॉ. गोविंद महाकाळ, माजी बांधकाम सभापती सुरेश मापारी, मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष नारायणराव काळबांडे, अकोला येथील मराठा समाज विकास मंडळाचे कार्याध्यक्ष सहदेवराव शिंदे, नारायणराव बारड, संतोष तांगडे, विठ्ठलराव आरू, घनशाम आरू, जीवन बोरकर, मराठा सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष तान्हाजी कव्हर, उपाध्यक्ष डॉ. दिपक शेळके यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर मराठा समाजातील विविध क्षेत्रात दिर्घकाळ व उत्कृष्ट सेवा दिल्याबद्दल ज्येष्ठ नागरिक तथा महिलांचा सत्कार करण्यात आला. तसेच शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे विद्यार्थी व शासनाच्या विविध विभागात महत्वाच्या पदावर निवड झालेल्या कर्मचाऱ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

# संत निरंकारी भवन येथे सेवादल प्रशिक्षण शिबीर उत्साहात



■ प्रतिनिधी | वाशिम ■

संत निरंकारी मिशनच्या वतीने वाशिमच्या निरंकारी भवनात सेवा दलाचे प्रशिक्षण शिबीर मोठ्या उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाले. या शिबीराच्या अध्यक्षस्थानी निरंकारी सेवा दलाचे क्षेत्रिय संचालक शिवाजीराव पाटील यांची विशेष उपस्थिती होती. तर यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन निरंकारी मिशनचे वाशिम जिल्हाप्रमुख संतोष खोडे, श्रीराम महाराज, नामदेव महाराज यांची उपस्थिती होती.

संत निरंकारी मिशनच्या. सेवादल प्रशिक्षणामध्ये निरंकारी मिशनच्या प्रमुख सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या मानवतेच्या शिकवणुकीचा अंगिकार करण्याचे आवाहन क्षेत्रिय संचालक शिवाजीराव पाटील यांनी सेवादल बंधु भगिनीना केले. याच प्रकारे या प्रशिक्षण शिबीरात राष्ट्रहिताबाबत माहिती देतांना त्यांनी मानव सेवा हीच ईश्वरसेवा असल्याचे सांगतांना निरंकारी सेवादल हे कोणतीही सेवा करतांना कधीच अहंकार मनामध्ये येऊ देत नाहीत. याच प्रकारे सद्गुरुच्या दिलेल्या वचनाचा ते अंगिकार करतात ही मोठी उपलब्धी असल्याचे त्यांनी सांगितले. सुनीता राठोड यांच्या कडे संचालिका ही जबाबदारी देण्यात आली.

# मुस्लिम बांधवांकडून चांदणी चौकात गणेश मंडळाचा सत्कार

## गणेशोत्सवातून सामाजिक एकोपा आणि हिंदू-मुस्लिम ऐक्याचा संदेश

■ प्रतिनिधी | रिसोड ■

रिसोड शहरातील चांदणी चौक येथे गणेशोत्सवानिमित्त मुस्लिम बांधवांच्या वतीने गणेश मंडळाच्या पदाधिकारी व सदस्यांचा सत्कार करून सामाजिक सलोखा आणि हिंदू-मुस्लिम ऐक्याचा संदेश देण्यात आला. या उपक्रमाचे उपस्थित मान्यवरांनी भरभरून कौतुक केले.

यावेळी ठाणेदार रामेश्वर चव्हाण, नगराध्यक्ष भगवानदादा क्षीरसागर, नगरसेवक कृष्णा महाराज आसनकर, सेवानिवृत्त पीएसआय वसंत तहकिक, भागवत गवळी, पाणीपुरवठा सभापती संजय बगडिया, आरोग्य सभापती संतोष चराटे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे शहराध्यक्ष संजय इरतकर, डॉ. विजय प्रसाद तिवारी, मंचकराव देशमुख, माजी नगरसेवक राजू



इरतकर, विकास झुंगरे, बबनराव मोरे, नगरपरिषद पाणीपुरवठा कर्मचारी विनोद बांगर, महादेव कोठुळे, अभिषेक सावळकर, बबन सुरशे यांच्यासह गणेश मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व

### मान्यवरांकडून उपक्रमाचे कौतुक

सदस्य उपस्थित होते.यावेळी गणेश मंडळाच्या पदाधिकारी व सदस्यांचा मुस्लिम बांधवांच्या वतीने पुष्पहार व सत्कार करून सन्मान करण्यात आला. उत्सवाच्या काळात परस्परांमध्ये बंधुभाव, शांतता आणि सामाजिक सलोखा कायम ठेवण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.कार्यक्रमाच्या आयोजनासाठी शाह फैसल खान तारेक खान, साजिद खान, डॉ. मुख्तार देशमुख, जामा मस्जीद ट्रस्टी गुलाम खान, रशिद शाह, एड.गुलाम कुरैशी, शेख नासेर, शेख शब्बीर व मित्र मंडळाने पुढाकार घेतला. या सामाजिक उपक्रमाचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक करत अशा कार्यक्रमांमुळे शहरातील सामाजिक ऐक्य अधिक दृढ होत असल्याचे मत व्यक्त केले.

# दुष्काळग्रस्त भागांत तातडीने पंचनामे करा

## मुख्यमंत्र्यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश

**मुंबई :** दुष्काळी परिस्थितीचा फटका बसलेल्या शेतकरी, शेतमजूर आणि कष्टकऱ्यांना तातडीने दिलासा मिळावा, यासाठी प्रशासनाने संवेदन शीलतेने आणि समन्वयाने काम करावे.

दुष्काळी भागातील पिकांचे तातडीने सर्वेक्षण करून पंचनामे सुरू करावेत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुष्काळ जाहीर झाल्यानंतर संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.

पावसाअभावी शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे दुष्काळी परिस्थिती असलेल्या भागांमध्ये महसूल, कृषी तसेच अन्य संबंधित विभागांनी क्षेत्रीय पातळीवर समन्वय ठेवून काम करावे. शेतकऱ्यांशी सातत्याने संपर्क ठेवून त्यांच्या अडचणी समजून घ्याव्यात आणि मदतकार्याला प्राधान्य द्यावे, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. पिकांच्या सर्वेक्षणादरम्यान प्रत्यक्ष परिस्थितीची अचूक नोंद घेण्यासाठी पिकांची छायाचित्रे आणि जीपीएस निर्देशांकाच्या आधारे अहवाल तयार केला जाणार आहे. त्यामुळे नुकसानीचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन करून पुढील मदत आणि उपाययोजना करण्यास प्रशासनाला मदत होणार आहे.



दुष्काळी परिस्थितीत राज्यातील शेतकरी, शेतमजूर आणि कष्टकरी आमच्या मदतीच्या केंद्रस्थानी आहेत. त्यांना दिलासा देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. आम्ही शेतकरी बांधवांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत. या आव्हानावर मात करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करूया, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले.

### शेतकऱ्यांना मदत करण्यास कटिबद्ध : सुनेत्रा पवार

संकटाच्या काळात शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले जाणार नाही. झालेल्या नुकसानाची योग्य ती दखल घेऊन, सर्वतोपरी मदत देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिली. 'हिंमत खचू देऊ नका,' संकटाच्या या काळात शासन तुमच्या पाठीशी आहे, असा धीर त्यांनी शेतकऱ्यांना दिला आहे. पावसाचा खंड पडल्यामुळे शेतीतील पिके करपून गेली असून, शेतकऱ्यांसमोर गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. शासनाने या परिस्थितीची गंभीर दखल घेतली आहे. प्रशासनाला प्रत्यक्ष शेतावर जाऊन पाहणी करून पंचनामे करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मदतीपासून एकही नुकसानग्रस्त शेतकरी वंचित राहणार नाही, याची दक्षता घेतली जाईल, अशी ग्वाहीही सुनेत्रा पवार यांनी दिली.

संकटाच्या प्रत्येक काळात महायुती सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले आहे. आताही दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांनाच आमचे संपूर्ण प्राधान्य राहील. आम्ही शेतकऱ्यांची दिवाळी काळी होऊ देणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे.

मुख्यमंत्र्यांसह मंत्रिमंडळातील सहकारी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या अडचणी समजून घेत आहोत. अधिकाऱ्यांकडून राज्यातील परिस्थितीचा सविस्तर आढावा घेतला. दुष्काळ जाहीर करून शेतकरी आणि सामान्य नागरिकांच्या अडचणी कमी करण्यासाठी तातडीच्या उपाययोजनांचे पॅकेजच प्रत्यक्षात आणल्याचे उपमुख्यमंत्री यांनी सांगितले.

# ज्ञानेश कुमार यांचे काही खरे नाही!

## राज-उद्धव ठाकरेंना मोठ्या नेत्याची साथ

**मुंबई -** मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार हे सध्या चांगलेच चर्चेत आहेत. त्यांच्या वर निवडणूक आयोगाने 'एसआयआर'च्या नावाखाली मतदारांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. त्यानंतर कॉकरोच जनता पार्टीने ज्ञानेश कुमार यांना अल्टिमेटम दिला. त्यापाठोपाठ ठाकरे बंधूही एकवटले आहेत. याविरोधात राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी ४ ऑक्टोबर रोजी महामोर्चा काढणार असल्याचे म्हटले आहे. आता देशातील सर्वात मोठ्या नेत्यांपैकी एक असलेला नेता देखील सहभागी होणार असल्याची माहिती समोर आली आहे.

४ ऑक्टोंबर २०२६ राज आणि उद्धव ठाकरे यांच्या



आंदोलनाला राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून ही उपस्थिती लावली जाणार असल्याची माहिती आमदार रोहित पवार यांची आजच्या प्रेस मधून दिली. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी ट्वीट करून ४ ऑक्टोंबर ला केंद्रीय निवडणूक आयुक्त यांच्याविरोधात मोर्चाची हाक दिली आहे. ठाकरे बंधू या मोर्चात नेतृत्व करत एकत्र आवाज उठविणार आहे. तसेच सर्वपक्षीयांना त्यांनी सामील होण्यासाठी हाक दिली आहे.

या मोर्चात जाणे योग्य आहे. पण आयुक्तांना विरोध करताना घोळ याबाबत ही आवाज उठवायला लागेल अशी भूमिका त्यांनी मांडली आहे. महाराष्ट्राचा ज्ञानेश कुमार कोण हे शोधावे लागणार असेही त्यांनी म्हटले.ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेतली होती. यावेळी दोन्ही नेत्यांमध्ये निवडणूक आयुक्तां विरोधात मोर्चा काढण्याची चर्चा झाली. त्यानंतर राज ठाकरे यांनी फेसबुकवर पोस्ट करून ही माहिती दिली. हा मोर्चा एका पक्षापुरता न राहता तर तमाम राजकीय व्यवस्थेचा आणि जनतेचा आवाज ठरेल यासाठी सर्व राजकीय पक्षांना या मोर्चामध्ये सहभागी व्हावे, असं आवाहन राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी केले.

# दिवाळी आणि छठ उत्सवासाठी ४१८ विशेष रेल्वेगाड्या

## यूटीएस प्रणालीद्वारे सामान्य शुल्कासह आरक्षण

**कोल्हापूर :** मध्य रेल्वेने आगामी दिवाळी आणि छठ उत्सवाच्या कालावधीत प्रवाशांच्या सोयीसाठी विविध ठिकाणांदरम्यान ४१८ विशेष गाड्या चालवण्याची घोषणा केली आहे. सामान्य शुल्कासह अनारक्षित डब्यांचे आरक्षण यूटीएस प्रणालीद्वारे करता येईल असून, रेलवन ॲपवरूनही तिकीट आरक्षण करता येणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस आणि हडपसरवरून गोरखपूरसाठी विशेष गाड्या धावणार असून, यामध्ये दादर, कल्याण, भुसावळ, इटारसी,



कानपूर, लखनौ इत्यादी स्थानकांवर थांबे आहेत. कोल्हापूर - चेन्नई आणि बंगळुरू येथील प्रवाशांच्या सोयीसाठी साताऱ्यात आणि कर्नाटकात जाणाऱ्या प्रवाशांसाठी विशेष एसी गाड्यांचे नियोजन करण्यात आले आहे.

कोल्हापूर, लोकमान्य टिळक टर्मिनस, नवीन अमरावती आणि हडपसर येथून उत्तर प्रदेश आणि बिहारच्या दिशेने जाणाऱ्या अनेक द्वि-साप्ताहिक गाड्या सुरू करण्यात आल्या आहेत. मुंबई-लातूर, मुंबई-नागपूर, मुंबई-कोल्हापूर, पुणे-अमरावती, नागपूर-हडपसर आणि कोल्हापूर-कलबुरगी या मार्गांवरही विशेष गाड्या धावणार आहेत. या विशेष गाड्यांचे तिकीट आरक्षण २७ आणि २८ सप्टेंबरपासून सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर तसेच संकेतस्थळावर सुरू होईल.

# पुण्यात गणेश विसर्जन मिरवणुकीची सांगता यंदा ३३ तास ३३ मिनिटांनंतर



**पुणे:** पुण्याच्या वैभवशाली गणेश विसर्जन मिरवणुकीची सांगता यंदा ३३ तास ३३ मिनिटांनंतर झाली. गेल्या वर्षीच्या तुलनेत ही मिरवणूक सुमारे सव्वातास लवकर संपली. सुरुवातीला मानाच्या पहिल्या पाच गणपतींच्या विसर्जनाला अर्धा तास उशीर झाल्याने मिरवणूक अधिक लांबण्याची शक्यता वर्तवली जात होती; मात्र शेवटच्या सार्वजनिक गणपतीचे विसर्जन दुसऱ्या दिवशी रात्री ७ वाजून ३३ मिनिटांनी पार पडल्याने मिरवणुकीला पूर्णविराम मिळाला.

'गणपती बाप्पा मोरया'चा जयघोष, ढोल-ताशांचा गजर, हलगीचा कडकडाट आणि रस्त्यांच्या दुतर्फा जमलेली भाविकांची अलोट गर्दी अशा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात मिरवणुकीलासुरुवात झाली होती. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्या हस्ते मानाच्या पहिल्या श्री कसबा गणपतीची आरती झाल्यानंतर सकाळी १० वाजता मिरवणूक मार्गस्थ झाली. मंडईतील लोकमान्य टिळक पुतळा परिसरापासून निघालेल्या कसबा गणपतीला बेलबाग चौक गाठण्यासाठी सुमारे अर्धा तास लागला.

मिरवणुकीत पारंपरिक पोशाख आणि भगवे फेटे परिधान केलेल्या तरुण-तरुणींचा सहभाग लक्षणीय होता.

# 'सर्जिकल स्ट्राईकला १० वर्ष', पीएम मोदींनी 'मन की बात'मध्ये पाकिस्तानला सुनावले

**नवी दिल्ली -** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी आपल्या 'मन की बात' या रेडिओ कार्यक्रमादरम्यान भारतीय सैन्याने पाकिस्तान आणि त्यांच्या हद्दीतील दहशतवादी ठिकाणांवर केलेल्या ऐतिहासिक 'सर्जिकल स्ट्राईक'च्या आठवणींना उजाळा दिला. सर्जिकल स्ट्राईकला १० वर्षे पूर्ण होण्याच्या अगदी आदल्या दिवशी बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, भारत आता दहशतवाद अजिबात खपवून घेणार नाही आणि शत्रूने डोळा वर करून पाहिल्यास त्याला चोख प्रत्युत्तर दिले जाईल.

कार्यक्रम सुरू करताना पंतप्रधान मोदी म्हणाले, 'मी देशवासीयांचे स्वागत करतो. 'मन की बात'मध्ये आपण देशातील सकारात्मक प्रयत्नांना व्यासपीठ देतो आणि उपलब्धींची चर्चा करतो. भारताच्या अशाच एका मोठ्या आणि ऐतिहासिक



कामगिरीला एका दिवसानंतर १० वर्षे पूर्ण होत आहेत. ही कामगिरी म्हणजे 'सर्जिकल स्ट्राईक'!'

२८ आणि २९ सप्टेंबर २०१६ च्या त्या ऐतिहासिक रात्रीची आठवण सांगताना ते म्हणाले, 'दहा वर्षांपूर्वी २८-२९ सप्टेंबर २०१६ च्या रात्री भारतीय सैन्याने पाकिस्तानमध्ये घुसून दहशतवादी ठिकाणांवर सर्जिकल स्ट्राईक केला होता. नियंत्रण रेषेच्या पार जाऊन आपल्या वीर जवानांनी ज्या पद्धतीने दहशतवादाविरोधात कारवाई केली, ते पाहून संपूर्ण जग थक्क झाले होते. या कारवाईने डंके की चोटवर जगासमोर भारताच्या दहशतवादविरोधी धोरणाचे एक नवीन आणि मजबूत उदाहरण ठेवले.'

पंतप्रधानांनी पुढे सांगितले की, दहशतवादी हल्ल्यांमुळे भारताने दीर्घकाळ ज्या वेदना आणि त्रास सहन केला होता, सर्जिकल स्ट्राइक हा त्या त्रासाविरोधात घेतलेला एक निर्णायक आणि कठोर निर्णय होता. गेल्या दशकात भारताच्या बदललेल्या रणनीतीचा उल्लेख करताना त्यांनी स्पष्ट केले की, बालाकोट एअर स्ट्राईकपासून ते 'ऑपरेशन सिंदूर'पर्यंत भारताने जगाला आणि शत्रूला वारंवार एकच संदेश दिला आहे - 'जर दहशतवाद्यांनी भारतावर वाईट नजर टाकली, तर त्यांना त्यांच्याच भाषेत कडक उत्तर दिले जाईल.'

पूर्वीच्या काळाची आठवण करून देताना पंतप्रधान म्हणाले, 'एक वेळ अशी होती जेव्हा भारतात मालिका बॉम्बस्फोट होणे ही खूप सामान्य बाब झाली होती. सप्टेंबर महिन्यातच म्हणजेच १३ सप्टेंबर २००८ रोजी दिल्लीत झालेल्या मालिका बॉम्बस्फोटात अनेक निष्पाप नागरिक मारले गेले होते. त्यानंतर काही आठवड्यांतच मुंबईत २६/११ चा एवढा मोठा दहशतवादी हल्ला झाला होता.'

पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले की, 'पूर्वी प्रत्येक दहशतवादी हल्ल्यानंतर फक्त पाकिस्ताना विरोधात कारवाई करण्याची मागणी व्हायची, पण त्यावर गंभीरतेने लक्ष दिले जात नव्हते .

## संक्षिप्त

### दोन दिवसांपासून बेपत्ता, सोबत सरकारी पिस्तूल

**पिंपरी-चिंचवड :** गेल्या दोन दिवसांपासून बेपत्ता असलेल्या पिंपरी-चिंचवड पोलीस दलातील कर्मचारी विजय कोळी यांचा मृतदेह अखेर निगडी ट्रान्सपोर्ट नगर येथील बस डेपो परिसरात आढळून आला आहे. प्राथमिक माहितीनुसार, विजय कोळी यांनी सरकारी पिस्तुलातून स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केली आहे. या घटनेमुळे पोलीस दलात एकच खळबळ उडाली आहे. विजय कोळी हे पिंपरी-चिंचवड पोलीस दलात कार्यरत होते. ते वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे आरटीपीसी म्हणून नियुक्तीला होते. दोन दिवसांपूर्वी कौटुंबिक कारणातून झालेल्या वादानंतर ते घरातून निघून गेले होते. घरातून जाताना त्यांनी सरकारी पिस्तूल सोबत नेल्याचं समोर आल्यानं पोलीस दलाकडून त्यांचा शोध सुरू करण्यात आला होता.



### नामांकित आयटी कंपनीतील वैष्णवीचा धक्कादायक मृत्यू

**पुणे :** ज्या पुण्यात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू करून स्त्री शिक्षणाची आणि तिच्या स्वातंत्र्याची मुहूर्तमेढ रोवली, त्याच पुरोगामी पुण्यात २१ व्या शतकातही हुंड्यापायी उच्चशिक्षित तरुणींचा बळी जात आहे. शिक्षणाने माणसाची विचारसरणी बदलायला हवी होती, मात्र पैशांची हाव आणि सासरची विकृती आजही निष्पाप मुलींचे आयुष्य उद्ध्वस्त करत असून असाच एक संतापजनक प्रकार पुण्यातील उंड्री भागात उघडकीस आला आहे.बंगळुरूच्या एका नामांकित आयटी कंपनीत कार्यरत असलेल्या २३ वर्षीय वैष्णवी जरांडे या नवविवाहितेचा सासरच्या छळाला कंटाळून संशयास्पद मृत्यू झाला आहे. अवघ्या चार महिन्यांपूर्वी, ९ मे २०२६ रोजी वैष्णवीचा विवाह ओंकार संजय घिसरे याच्याशी थाटामाटात पार पडला होता. मुलीच्या सुखी संसाराचे स्वप्न उराशी बाळगून तिच्या आई-वडिलांनी लग्नात तब्बल ४५ लाख रुपये खर्च केले आणि १० तोळे सोनेही दिले. मात्र, सासरच्यांची भूक एवढ्यावर भागली नाही. वैष्णवी पुण्याहून वर्क फ्रॉम होम करत असतानाच, नवीन कार खरेदी करण्यासाठी माहेरहून आणखी ५ लाख रुपये आणावेत, यासाठी तिचा सातत्याने मानसिक आणि शारीरिक छळ सुरू झाला.



### शौचालयातल्या उग्र वासामुळे दोन तरुणांचा मृत्यू

**मुंबई-** गोरेगाव पूर्व भागातील राम मंदिर परिसरातील एका सार्वजनिक शौचालयात एक धक्कादायक घटना घडली आहे. ज्यामुळे दोघांना स्वतःचे प्राण गमवावे लागले आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, शौचालयात गेलेल्या केमिकलच्या उग्र वासामुळे दोन तरुणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. ही भयानक घटना पारसी पंचायत गेट समोर, मृणालताई ब्रिजजवळ घडली आहे.समोर आलेल्या माहितीनुसार, २७ सप्टेंबर सकाळी साडेआठ वाजता सार्वजनिक शौचालयात केमिकलच्या वासाने दोघांना श्वास गुदमरल्याची माहिती मिळाली होती. घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहोचले. अशात दोघांनी तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले. दोघांना बेशुद्ध अवस्थेत ट्रॉमा केअर रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.



### नऊ लाखाच्या बदल्यात २६ लाख घेऊन २५ लाखांची मागणी

**कोल्हापूर -** खासगी सावकाराकडून ९ लाख रुपये घेतल्यानंतर बदल्यात २६ लाख परत करूनही पुन्हा नव्याने २५ लाखांची मागणी केल्याने त्रासाला कंटाळून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली. कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुक्यातील सोनगेमधील घटनेनंतर एकच खळबळ उडाली आहे. श्रीधर दत्तात्रय डावरे (वय ४८ वर्षे, रा. सोनगे, ता. कागल, जि. कोल्हापूर) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. पत्नी सविता श्रीधर डाबरे यांनी आरोपी निवास आप्पासो पाटील (रा. बामणे, ता. कागल, जि. कोल्हापूर) याच्याविरोधात मुरगूड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार आरोपी निवास पाटील हा खासगी सावकारी करतो. श्रीधर डावरे यांनी आरोपीकडून व्याजाने ?९ लाख रुपये घेतले होते. या रकमेपोटी मयत श्रीधर डावरे यांनी आरोपीला आतापर्यंत ?२६ लाख रुपये परत केले होते. तरीही आरोपी मयताकडे आणखी ?२५ लाख रुपयांची मागणी करत होता व त्यावरून त्यांना मारहाण व धमक्या देत होता. या त्रासाला व मानसिक तणावाला कंटाळून बुधवारी (२३ सप्टेंबर) श्रीधर डावरे पत्नीला अत्यंत भावनिक मेसेज पाठवला. 'सविता तू माझ्या साठी भरपूर केलस पण मी काही करु शकलो नाही मला माफ कर मी माझ्या समू जवळ जातो.

# रेस्टॉरंट, हॉटेल बस्स झाले, त्या ऐवजी तुकाराम मुंढेंना आता..संजय राऊतांची विचार करायला...

**मुंबई -** आयएसएस तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासनाच्या कार्यालयाचा कारभार हाती घेतला, त्या दिवसांपासून कारवाईचा धडाका लावला आहे. तुकाराम मुंढे यांनी नियमांचं उल्लंघन करणाऱ्या अनेक आस्थापना, रेस्टॉरंट, हॉटेलवर कारवाई केली आहे. देशभरात त्यांच्या कारवाईची चर्चा होत आहे. परंतु आता रेस्टॉरंट आणि हॉटेल बस झालं. लोकांना खाऊ द्या. खरंतर दुष्काळ, पुनर्वसन, महसूल , नगरविकास यात सगळ्यात मोठा भ्रष्टाचार होत आहे. त्यासाठी या खात्याची कामे द्या. तुकाराम मुंढे यांना मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयाचे मुख्य बनवावे, अशी मागणी खासदार संजय राऊतांनी



केली.

संजय राऊत यांनी मुंबईत माध्यमांशी संवाद साधला. यावेळी आयएएस तुकाराम मुंढे यांच्यावर भाष्य करण्यासहित विविध राजकीय घडामोडींवर भाष्य केलं. निवडणूक आयोगावर संजय राऊत म्हणाले, 'मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना एक्स्पोज केल आहे. ते भाजपाला लाभ होईल, असं काम करत आहेत. ही स्वातंत्र्याची गळचेपी आहे. महाराष्ट्रामध्ये २ कोटी नावे वगळलेली आहे. ही भूमिका घातक आहे. मुख्य आंदोलनाची सुरुवात मुंबईमधून होत आहे.

दिपके यांनी जरी हाक दिली असली, तरी राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांच्यात चर्चा झाली, ते ४ तारखेला स्वतंत्र मोर्चा काढणार आहे.. २ तारखेला अभिजीत दिपके यांचा जो मोर्चा असेल, त्यांना शिवसेनेचा पाठिंबा आहे. कोक्रोज जनता पार्टी राजकीय पक्ष नाही. ज्या राजकीय पक्षांना त्रास झाला आहे. त्या सगळ्या पक्षांनी एकत्रित येऊन आंदोलन केले. ४ ला होणारा मोर्चा मोठा मोर्चा असेल..

एसआयआर प्रक्रियेवर संजय राऊत म्हणाले, 'राहुल गांधी यांनी देखील या मुद्द्यावर चर्चा केली आहे. या सगळ्या संस्था, मोदी आणि अमित शहा यांच्या घरचे घरगडी आहे. हे दबावाखाली, प्रलोभनाच्या खाली आहेत. मोदी आणि शहा यांना जे हवंय, ते करण्यासाठी लोकशाहीची हत्या करत आहे. यातील मुख्य आरोपी ज्ञानेश कुमार आहेत. आम्ही कोर्टात गेलो, याचिका केली आहे, यातील निर्णय कोर्टाला घ्यावा लागेल.

# विशेष अधिवेशन बोलवा दुष्काळावर चर्चा व्हावी-अंबादास दानवे

**मुंबई :** राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर चर्चा करून शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्यासाठी सरकारने विधिमंडळाचे विशेष अधिवेशन बोलवावे,' अशी मागणी शिवसेना उबाठाचे नेते अंबादास दानवे यांनी केली आहे. याबाबत त्यांनी राज्यपाल आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठविले आहे. राज्यातील परिस्थिती १९७२च्या दुष्काळापेक्षाही गंभीर असल्याचा दावा दानवे यांनी केला.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दुष्काळी भागातील पाहणी दौऱ्यावरही त्यांनी टीका केली. दौऱ्यादरम्यान कडेकोट पोलिस बंदोबस्त आणि बॅरिकेडिंग




करण्यात आल्याचा उल्लेख करत, मुख्यमंत्र्यांना सामान्य शेतकऱ्यांशी संवाद साधण्या साठी एवढ्या सुरक्षेची गरज का भासते, असा प्रश्न त्यांनी केला.

सरकारने दुष्काळाबाबत जाहीर केलेल्या 'ट्रिगर-१' शासन निर्णयावर काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनीही टीका केली. राज्यात दुष्काळी परिस्थिती असताना सरकारने जुन्याच तरतुदींची पुनरावृत्ती केली असून, हा निर्णय दुष्काळग्रस्तांच्या जखमेवर मीठ चोळणारा असल्याचा आरोप त्यांनी केला.मुख्यमंत्री आणि मंत्र्यांनी दुष्काळी भागाचा दौरा केला असला, तरी ग्रामीण भागाच्या आतील भागात जाऊन शेतकऱ्यांच्या परिस्थितीची पाहणी केली नसल्याचे वडेट्टीवार यांनी म्हटले. पंचनाम्यांसाठी पाच ऑक्टोबरची प्रतीक्षा न करता बाधित शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये मदत द्यावी, अशी मागणी त्यांनी केली. 'ट्रिगर-१' आदेशाचीही वडेट्टीवार यांनी खिल्ली उडवली. शासन निर्णयासोबत तालुकानिहाय पावसाच्या तुटीची अधिकृत आकडेवारी आणि कृषी आयुक्तांचा संपूर्ण अहवाल पारदर्शकपणे उपलब्ध करून देण्यात आलेला नसल्याचा दावा त्यांनी केला.

जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ३०१ ■ सोमवार २८ सप्टेबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु

# दुष्काळी परिस्थितीच्या पाहणीसाठी महसूल मंत्री बावनकुळे शेतकऱ्यांच्या बांधावर

## महसूलमंत्री व पालकमंत्र्यांनी केली पिक परिस्थितीची पाहणी पंचनामे, ग्रीस्टॅक नोंदणी व ई-पिक पाहणी करण्याचे निर्देश



**वर्धा जनमाध्यम :** एलनिनोच्या प्रभावामुळे पर्जन्यमान कमी झाल्याने जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्याअनुषंगाने पिक परिस्थितीची पाहणी करून शेतकऱ्यांचे दुःख जाणून घेण्यासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे व पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी आज प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन भेट दिली. पिक पाहणी सोबतच शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी समजून घेतल्या.

यावेळी आ. राजेश बकाने, आ. सुमित वानखेडे, माजी खासदार रामदास तडस, अतिरिक्त जिल्हाधिकारी संजय तेली, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी अरविंद उपरीकर, पशुसंवर्धनचे उपायुक्त डॉ. जगदीश बुकतरे, कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख तथा वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. जीवन कतोरे यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. देवळी तालुक्यातील रत्नापूर येथील महिला शेतकरी सुमित्रा रवि नाडे यांच्या सोयाबिन पिकाची महसूल मंत्री व पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी पाहणी केली. श्रीमती नाडे यांच्यासह शेतकऱ्यांशी पिक परिस्थितीबाबत संवाद साधला व माहिती घेतली. पावसाचा खंड आणि पुरेसे पर्जन्यमान झाले नसल्याने सोयाबिन पिकाचे दाणे भरलेले नाहीत. त्यामुळे सरासरी उत्पन्न अत्यंत कमी राहणार असल्याचे शेतकऱ्यांनी यावेळी सांगितले.

शासनाने दुष्काळी तालुक्यांची यादी जाहीर केली आहे. वर्धा जिल्ह्यातील सात तालुक्यांचा यात समावेश आहे. शेतकऱ्यांना दुष्काळी मदत व नुकसान भरपाई मिळण्यासाठी ?ग्रीस्टॅक नोंदणी, ई पिक पाहणी महत्त्वाची आहे. त्यामुळे पिक पाहणी ऑनलाईनसह ऑफलाईन करण्याची सुविधा शासनाने उपलब्ध करून दिली आहे. प्रत्येक शेतकऱ्यांची पिक पाहणी तातडीने पूर्ण करा, अशा सूचना महसूलमंत्र्यांनी केल्या.

दुष्काळी तालुक्यांमध्ये करावयाच्या उपाययोजना शासनाने जाहीर केल्या आहेत. प्रत्येक नुकसानग्रस्त शेतकऱ्यास याचा फायदा होण्यासाठी पंचनामे अचूक आणि तातडीने पूर्ण करा. पंचनामे संयुक्त आणि शेतकऱ्यांच्या उपस्थितीत करा. ग्रामसभेसमोर पंचनामे ठेवा, संबंधित शेतकऱ्यांना दाखवा, नंतर शेतकऱ्यांच्या तक्रारी येणार नाहीत, याची दक्षता घेण्याची सूचना महसूलमंत्र्यांनी केली.

**कारंजा तालुक्याचा समावेश करणार-** राज्य शासनाने जाहीर केलेल्या दुष्काळी तालुक्यांच्या ट्रिगर एकमध्ये जिल्ह्यातील सात तालुक्यांचा समावेश असून त्यात कारंजा तालुक्याचा समावेश नाही. कारंजा पाणी टंचाई तालुका म्हणून ओळखला जातो.

मागील वर्षी झालेल्या पावसाचा निकष लावू नये. यावर्षी मागील वर्षापेक्षा कमी पाऊस झाला आहे. त्यामुळे तत्काळ तालुका दुष्काळी घोषित करावा, अशी मागणी तालुक्यातील शेतकऱ्यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना भेटून केली. त्यावेळी शेतकऱ्यांशी बोलताना कारंजाचा समावेश करण्यात येईल, असे श्री. बावनकुळे यांनी सांगितले.

# डीजेचा दणदणाट थांबला; भक्तीचा सूर घुमला

## सेलूत बारभाई गणेश मंडळाचा आदर्श ; ध्वनिप्रदूषणाला फाटा देत पारंपरिक पद्धतीने गणरायाला निरोप



**सेलू जनमाध्यम :** गणेश विसर्जन मिरवणूक म्हणजे डीजेचा कर्णकर्कश आवाज, बेंजोचा दणदणाट आणि ध्वनिक्षेपकांचा गोंगाट, असे चित्र गेल्या काही वर्षांत रूढ झाले होते. मात्र सेलू शहरातील बारभाई गणेश मंडळाने यंदा या मानसिकतेला छेद देत शांतता आणि भक्तीचा संदेश दिला. ना डीजे, ना बेंजोचा गोंगाट. पारंपरिक वाद्य, भजन आणि गणरायाच्या जयघोषात बाप्पाला निरोप देण्यात आला.

गणेशोत्सवापूर्वी पोलिस विभागाने गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधून ध्वनिप्रदूषण टाळण्याचे आवाहन केले होते. त्याला मंडळांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. परिणामी विसर्जन मिरवणुकीत कर्णकर्कश आवाजाला मोठ्या प्रमाणात आळा बसला. वृद्ध, लहान मुले, विद्यार्थी तसेच आजारी नागरिकांना यामुळे दिलासा मिळाला.

उत्सवाचा आनंद मोठ्या आवाजात नसून भक्तीत असतो, हे सेलूतील गणेश मंडळाने कृतीतून दाखवून दिले. उत्सव मोठा असावा, मात्र त्याचा आवाज मोठा असण्याची गरज नाही, असा संदेश यंदाच्या विसर्जनातून शहराला मिळाला.

गणेशोत्सवातील या सकारात्मक बदलामागे पोलिस विभागाची जनजागृती, मंडळांशी साधलेला संवाद आणि कार्यकर्त्यांचा संयम महत्त्वाचा ठरला. आगामी भाकरी गणपती आणि नवरात्रोत्सवातही हीच शिस्त कायम राहावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

गणेशोत्सवापूर्वी मंडळांशी संवाद साधून ध्वनिप्रदूषण आणि कायदा सुव्यवस्थेबाबत जनजागृती करण्यात आली. मंडळांनीही सहकार्य केल्याने यंदा सकारात्मक बदल दिसून आला, अशी माहिती सेलूचे ठाणेदार पंकज वाघोडे यांनी दिली. पोलिस, गृहरक्षक दल आणि गणेश मंडळांच्या समन्वयाचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

# गौण खनिज माफियांना दणका

## ५२ प्रकरणांत तब्बल १७.९९ कोटींचा दंड; ३१ गुन्हे दाखल, २० आरोपी गजाआड

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यात गौण खनिजांच्या अवैध उत्खनन आणि वाहतुकीचा धंदा सुरूच असल्याचे महसूल प्रशासनाच्या कारवाईतून उघड झाले आहे. १ एप्रिल ते ३१ ऑगस्ट २०२६ या पाच महिन्यांच्या कालावधीत अवैध उत्खनन आणि वाहतुकीची तब्बल ५२ प्रकरणे समोर आली. या प्रकरणांत प्रशासनाने तब्बल १७ कोटी ९९ लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. मात्र प्रत्यक्षात केवळ ६७ लाख ९१ हजार रुपयांची वसुली झाल्याने उर्वरित कोट्यवधींच्या दंडवसुलीचे आव्हान कायम आहे. या कारवाईत ३१ प्रकरणांत गुन्हे दाखल करण्यात आले असून २० आरोपींना अटक करण्यात आली. अवैध खानिज वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली ४९ वाहने जप्त करण्यात आली आहेत. महसूल प्रशासनाच्या धडक कारवाईमुळे अवैध उत्खनन करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

### रेती उत्खननाचा सर्वाधिक धुमाकूळ



एकूण ५२ प्रकरणांपैकी तब्बल ४० प्रकरणे रेतीच्या अवैध उत्खनन आणि वाहतुकीची आहेत. मुरूमच्या अवैध उत्खनन आणि वाहतुकीची ११ प्रकरणे तर दगडाच्या अवैध उत्खननाचे एक प्रकरण आढळले. विशेष म्हणजे मुरूमच्या प्रकरणांतच सर्वाधिक दंडाची रक्कम निश्चित करण्यात आली आहे.

**मुरूमवर १७.३६ कोटींचा दंड**

अवैध उत्खनन आणि वाहतुकीच्या प्रकरणांत रेतीसाठी ६२ लाख १० हजार ९१० रुपये, मुरूमसाठी तब्बल १७ कोटी ३६ लाख २३ हजार ३६७ रुपये, तर दगडासाठी ७० हजार ४०० रुपये दंड ठोठावण्यात आला आहे. दंडाची कोट्यवधींची रक्कम कागदावर निश्चित झाली असली तरी प्रत्यक्ष वसुली अत्यल्प असल्याने प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे ठाकले आहे.

**कारवाईचा धडाका**

- ५२ अवैध उत्खनन व वाहतूक प्रकरणे
- १७.९९ कोटी रुपयांचा दंड
- ६७.९१ लाख रुपयांची प्रत्यक्ष वसुली
- ३१ गुन्हे दाखल
- २० आरोपींना अटक
- ४९ वाहने जप्त

# दुष्काळाच्या कळा असह्य; ७३ वर्षीय शेतकऱ्याची विहिरीत उडी



**आष्टी शहीद जनमाध्यम :** कर्जाचा वाढता बोजा, सातत्याची नापिकी, यंदा पावसाने दिलेली दडी आणि पिकांवर वन्यप्राण्यांचा वाढता धोका अशा संकटांनी घेरलेल्या ७३ वर्षीय शेतकऱ्याने विहिरीत उडी घेऊन जीवन संपविल्याची हृदयद्रावक घटना धाडी येथील शेतशिवारात घडली. रामराव भुराजी बोटरे असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. रामराव बोटरे हे नेहमीप्रमाणे शेतात गेले होते. त्यांच्या शेतात कपाशीचे पीक उभे आहे. मात्र, पावसाने पाठ फिरवल्याने पिकांच्या उत्पादनाबाबत चिंता वाढली होती. त्यातच कर्जबाजारीपणा, नापिकी आणि वन्यप्राण्यांपासून पिकांना असलेला धोका यामुळे शेतीचे भवितव्य अडचणीत आले होते. २६ रोजी रात्री उशिरापर्यंत बोटरे घरी परतले नाहीत. त्यामुळे कुटुंबीय आणि ग्रामस्थांनी त्यांचा शोध सुरू केला. शेतशिवारासह परिसरात शोध घेतल्यानंतर त्यांच्या स्वतःच्या शेतातील विहिरीत त्यांचा मृतदेह आढळून आला. या घटनेची माहिती मिळताच आष्टी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठविण्यात आला. तपासणीनंतर मृतदेह नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आला. रामराव बोटरे यांच्या पश्चात पत्नी, एकुलता एक मुलगा आणि विवाहित मुलगी असा परिवार आहे. कुटुंबाचा आधार असलेल्या व्यक्तीच्या अचानक मृत्यूने बोटरे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून धाडी गावातही हळहळ व्यक्त होत आहे.रामराव बोटरे यांच्या मृत्युमुळे कुटुंबावर आर्थिक संकट ओढवले आहे. शासनाने या घटनेची दखल घेऊन नियमानुसार आर्थिक मदत आणि पात्र शासकीय योजनांचा लाभ द्यावा, अशी मागणी होत आहे. संकटाच्या काळात सामाजिक संस्था, दानशूर व्यक्ती आणि लोकप्रतिनिधींनीही कुटुंबाला शक्य ती मदत करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# देवळीत शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आज धरणे आंदोलन

## हमीभाव, कर्जमाफी आणि प्रलंबित नुकसान भरपाईसाठी प्रभाताई राव विचारमंच आक्रमक

**देवळी जनमाध्यम :** शेतकऱ्यांच्या विविध न्याय मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी प्रभाताई राव विचारमंचच्या वतीने आज सोमवार २८ सप्टेंबर रोजी धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. देवळी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ सकाळी ११ वाजता हे आंदोलन होणार आहे. शेतमालाला मिळणारा अपुरा हमीभाव, संपूर्ण कर्जमाफी, वाढता उत्पादन खर्च आणि नैसर्गिक आपत्तींमुळे होणारे नुकसान या प्रश्नांवर आंदोलनातून आवाज उठविण्यात येणार आहे. तसेच शेतकऱ्यांची प्रलंबित नुकसान भरपाई तातडीने देण्यात यावी आणि शासनाकडून अद्याप प्रलंबित असलेल्या शेतांच्या पंचनाम्यांची प्रक्रिया पूर्ण करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे शासनाने गांभीर्याने पाहून ठोस निर्णय घ्यावा, यासाठी आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन संस्थापक अध्यक्ष चारुलता राव टोकस यांनी केले आहे.

# हातचलाखीने सोन्याचे दागिने लंपास करणारी महिला जेरबंद

## शहरातील दोन सराफा दुकानांतील चोरीचा छडा -५९ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त



**वर्धा जनमाध्यम :** सराफा दुकानांमध्ये हातचलाखी करून सोन्याचे दागिने लंपास करणाऱ्या सराईत महिलेला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने हिंगणघाट येथून ताब्यात घेतले. तिच्याकडून चोरीतील ५९ हजार ६०० रुपये किमतीचे सोन्याचे टॉप्स जप्त करण्यात आले असून वर्धा शहरातील चोरीचे दोन गुन्हे उघडकीस आले आहेत. वर्धा शहरातील दोन वेगवेगळ्या सराफा दुकानांत १२ आणि २० सप्टेंबर रोजी हातचलाखीने सोन्याचे दागिने चोरीला गेले होते. याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक १५८५ आणि १५८९ नुसार कलम ३०३ (२) बीएनएस अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले होते. या गुन्ह्यांचा स्थानिक गुन्हे शाखेकडून समांतर तपास सुरू होता. दुकानांमधील सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक माहितीच्या आधारे संशयित महिलेचा माग काढण्यात आला. ती हिंगणघाट येथे असल्याची माहिती मिळताच पथकाने संत तुकडोजी वॉर्डातील तिच्या घरातून शेख रूमाना ऊर्फ शबाना ऊर्फ मुस्कान शेख आरिफ वय २९ हिला ताब्यात घेतले.चौकशीत तिने वर्ध्यातील दोन सराफा दुकानांतून दागिने चोरल्याची माहिती दिली. चोरीचे दागिने हिंगणघाटमधील सराफा दुकानांत मुलगी आजारी असून उपचारासाठी पैशांची गरज असल्याचे सांगून गहाण ठेवल्याचे समोर आले. पोलिसांनी संबंधित दुकानांतून १.६३० ग्रॅम वजनाचे २२ हजार ९०० रुपये किमतीचे टॉप्स आणि २.६२० ग्रॅम वजनाचे ३६ हजार ८०० रुपये किमतीचे टॉप्स असा एकूण ५९ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक विनोद चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पुढील तपास वर्धा शहर पोलिस करीत आहेत.

# हक्कासाठी सेवानिवृत्त न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा एल्गार

## १७ ऑक्टोबरच्या साखळी उपोषणात सहभागी होण्याचा निर्धार; ९५ कर्मचाऱ्यांच्या निवेदनावर स्वाक्षऱ्या



**वर्धा जनमाध्यम :** समान काम समान वेतनाच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला बळ देण्यासाठी वर्धा येथे सेवानिवृत्त न्यायालयीन कर्मचाऱ्यांची चिंतन बैठक घेण्यात आली. बैठकीला शेकडो सेवानिवृत्त कर्मचारी उपस्थित होते. चर्चेनंतर १७ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या साखळी उपोषणात सहभागी होण्याचा निर्धार करण्यात आला. भविष्यात या मागणीसाठी होणाऱ्या प्रत्येक आंदोलनात उत्स्फूर्तपणे सहभागी होण्याचाही निर्णय घेण्यात आला.

आंदोलन यशस्वी करण्यासाठी बैठकीत आंदोलन संचालन समिती गठीत करण्यात आली. तसेच समान काम समान वेतनासंदर्भातील शासनाकडे प्रलंबित प्रस्ताव तातडीने मंजूर करण्याची मागणी करण्यात आली. यासाठी उच्च न्यायालय, मुख्यमंत्री आणि जिल्हाधिकारी यांच्या नावे तयार करण्यात आलेल्या निवेदनावर स्वाक्षरी अभियान राबविण्यात आले. या अभियानात सुमारे ९५ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी स्वाक्षऱ्या केल्या.

किशोर लसणे, विश्वनाथ बमणोटे, गणेश नारखेडे आणि अशोक खराबे हे कामानिमित्त बाहेर असल्याने भ्रमणध्वनीद्वारे आंदोलनाला पूर्ण पाठिंबा जाहीर केला.

हक्क आणि न्यायासाठी सर्वांनी एकजुटीने लढा देण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. वर्धा जिल्हा न्यायालय कर्मचारी संघटनेने उपस्थित सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

# रथोत्सवाने रामनगर दुमदुमले



**वर्धा जनमाध्यम :** भक्तीचा सागर उसळला... जयघोषाने रामनगर दुमदुमले... आणि श्रींच्या रथाला खांदा देताना जैन बांधवांच्या चेहऱ्यावर श्रद्धेचे भाव उमटले. महावीर दिगंबर जैन मंदिरात १६ ते २७ सप्टेंबरदरम्यान उत्साहात पार पडलेल्या दशलाक्षणिक महापर्वाची रविवारी पारंपरिक रथोत्सवाने मंगलमय सांगता झाली.

सकाळी ९ वाजता मंदिरातून श्रींच्या रथाची मिरवणूक निघाली. रामनगरातील विविध मार्गांवरून रथ जात असताना ठिकठिकाणी जैन बांधवांनी भक्तिभावाने स्वागत केले. पूजा आणि दर्शनासाठी भाविकांची गर्दी झाली होती. 'श्रीजी'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

रथ मंदिरात परतल्यानंतर श्रींचा पंचामृत अभिषेक करण्यात आला. त्यानंतर समारोपीय धार्मिक कार्यक्रम पार पडला. महापर्वाच्या काळात बाहुबली अभिषेक, जिनेंद्र पंचामृत अभिषेक, दशलक्षण, सोलहकारण आणि आलोचना पाठ आदी धार्मिक कार्यक्रम झाले. संयम, त्याग, अहिंसा आणि आत्मशुद्धीचा संदेश देणाऱ्या या पर्वाने समाजात आध्यात्मिक वातावरण निर्माण केले.

मंदिर देवस्थानचे अध्यक्ष सुनील मांडवगडे, उपाध्यक्ष नितीन भागवतकर, सचिव अजय कहाते, कोषाध्यक्ष प्रशांत चवडे, सहसचिव सचिन गडेकर, विश्वस्त सुरेशचंद्र गडेकर, दिलीप भागवतकर, राजकुमार चवडे, दिलीप भुसारी यांच्यासह समाजबांधवांनी रथोत्सवाच्या आयोजनासाठी परिश्रम घेतले. महिला मंडळे आणि विविध धार्मिक संस्थांच्या सहकार्याने महापर्वाची सांगता भक्तिमय वातावरणात झाली.

# शुभम भगत यांचे निधन



**वर्धा :** रिपब्लिकन पक्षाचे ज्येष्ठ नेते वसंतराव भगत यांचे धाकटे सुपुत्र शुभम भगत वय ३२ रा. शिवनगर वर्धा यांचे रविवारी २७ सप्टेंबर रोजी निधन झाले. त्यांच्यावर डेंग्यूच्या आजारासाठी उपचार सुरू होते. उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. शुभम भगत हे उच्चशिक्षित होते. त्यांच्या पश्चात वडील वसंतराव भगत तसेच परिवारातील सदस्य असा आप्तपरिवार आहे. त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले

# प्रजासत्ताक दिन परेडसाठी वैष्णवी व स्नेहा यांची निवड





**देवळी जनमाध्यम :** दिल्ली येथे २६ जानेवारी २०२७ रोजी होणाऱ्या प्रजासत्ताक दिन परेडसाठी महाराष्ट्र राज्यातील एनसीसी छात्र सैनिकांची निवड प्रक्रिया सुरू आहे. या निवड प्रक्रियेत नागपूर विभागीय एनसीसीच्या पहिल्या तीन शिबिरांमधून नागपूर ग्रुप हेडक्वार्टरचा संघ राज्यस्तरीय निवड शिबिरासाठी पुणे येथे दाखल झाला आहे.

या संघात २१ महाराष्ट्र बटालियन एनसीसीअंतर्गत स्थानिक एस. एस. एन. जे. महाविद्यालयातील एनसीसी सीनियर अंडर ऑफिसर वैष्णवी कन्नाके आणि ज्युनियर अंडर ऑफिसर स्नेहा मडकाम यांची निवड झाली आहे.

पुणे येथे महाराष्ट्रातील सातही ग्रुप हेडक्वार्टरमधून निवडक छात्र सैनिकांचे संघ दाखल झाले आहेत. या शिबिरातून दिल्ली येथे प्रजासत्ताक दिन परेडमध्ये सहभागी होणाऱ्या छात्र सैनिकांची अंतिम निवड करण्यात येणार आहे.

वैष्णवी कन्नाके आणि स्नेहा मडकाम या दोघी बी.ए. अंतिम वर्षात शिक्षण घेत असून एनसीसी अधिकारी कॅप्टन मोहन गुजरकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेत आहेत. त्यांच्या निवडीबद्दल महाविद्यालय परिसरातून अभिनंदन होत आहे.

या यशाचे श्रेय वैष्णवी आणि स्नेहा यांनी ग्रुप कमांडर ग्रुप कॅप्टन खुशाल व्यास, एनसीसी कमान अधिकारी कर्नल जिसांतो, प्रशासकीय अधिकारी लेफ्टनंट कर्नल आर. के. सामनंदा तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुनिता सोनारे यांना दिले.

# संपादकीय

**प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे**

## लोकशाहीचे धिंडवडे

**भारताच्या महान लोकशाहीचे धिंडवडे निवडणूक आयोग कशा पद्धतीने काढत आहे याचा सविस्तर खुलासा 'इंडियन एक्स्प्रेस 'ने केला आहे. सध्या सुरू असलेली 'एसआयआर' प्रक्रिया म्हणजे एक घोटाळा आहे. लोकशाहीच्या गळ्याभोवतीचा फास आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार हे एखाद्या माफियाप्रमाणे मनमानी करून भाजपला हव्या त्या पद्धतीने कोट्यवधी मतदारांची नावे वगळत आहेत किंवा जोडत आहेत याचा खुलासा इतर दोन निवडणूक आयुक्त सुखबीर संधू आणि विवेक जोशी यांनी केला. निवडणूक आयोग हा तिघांचा असतो, पण बहुमताने निर्णय होत नाहीत. ज्ञानेश कुमार यांच्या माफिया पद्धतीविरुद्ध दोन्ही निवडणूक आयुक्तांनी मागच्या दहा महिन्यांत चौदावेळा आक्षेप नोंदवून उपयोग झाला नाही तेव्हा या दोघांनी थेट कॅबिनेट सेक्रेटरीकडेच तक्रार केली. याचा अर्थ पंतप्रधान कार्यालयात हा गंभीर विषय पोहोचला व त्याच कार्यालयातून ज्ञानेश कुमार यांच्या मनमानीविरुद्ध स्फोट घडवला गेला. मोदी सरकारमध्ये बरेच काही बिनसले आहे याचा हा नमुना आहे. भारताचा निवडणूक आयोग गृह मंत्रालयाच्या 'अधीन' आहे. त्यामुळे अमित शहा यांच्या आदेशाशिवाय ज्ञानेश कुमार मनमानी करणार नाहीत हे ज्यांना समजते त्यांनी हे पक्के ध्यानात ठेवले पाहिजे. देशाच्या लोकशाहीशी बेइमानी करणारे पहिले आरोपी गृहमंत्री अमित शहा व सहआरोपी ज्ञानेश कुमार आहेत. पंतप्रधान कार्यालयातून बाहेर आलेली माहिती या दोघांच्याही खुर्चीला सुरुंग लावणारी आहे. भारताचा निवडणूक आयोग म्हणजे आहे. स्वतंत्र आणि निष्पक्ष निवडणुका घेऊन लोकशाहीचे रक्षण करणे ही निवडणूक आयोगाची जबाबदारी आहे, पण विवेकशून्य पद्धतीने वर्तन करून आपल्या अधिकारांचा वापर गल्लीतल्या गुंडासारखा करणाऱ्या ज्ञानेश कुमार यांच्या हाती लोकशाहीची सूत्रे गेली आहेत. ज्ञानेश कुमार यांच्या घटनात्मक गुंडगिरीविरुद्ध इतर दोन निवडणूक आयुक्तांनी चौदा वेळा असहमती दर्शवली, पण ज्ञानेश कुमार यांनी या असहमतीला केराची टोपली दाखवून लोकशाहीच्या पाठीत खंजीर खुपसण्याचे काम चालू ठेवले. 'फॉर्म ६'च्या बाबतीत संधू व जोशी यांनी आक्षेप घेतला. ज्ञानेश कुमार यांनी तो मान्य केला नाही. एसआयआर प्रक्रियेच्या नावाखाली भारतातून १३ कोटी मतदारांना वगळले. त्यात अनेक प्रतिष्ठित, नामवंत लोक आहेत. महाराष्ट्रातून दोन कोटी मतदार वगळले. प. बंगाल आणि बिहार विधानसभा निवडणुकांत लाखो नावे वगळून अमित शहा यांनी निवडणुका जिंकल्या व त्या गुन्ह्यात ज्ञानेश कुमार यांचा उघड सहभाग होता. महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांत ४२ लाख मते अचानक वाढवून भाजप व त्यांच्या गँगला विजयाचा मार्ग निवडणूक आयोगानेच दाखवला. पक्षफुटीत, पक्ष व चिन्हांचे स्वामित्व ठरविण्यात राजीव कुमार व ज्ञानेश कुमार या दोन घटनात्मक माफियांनी केलेले कृत्य लोकशाहीला सुळावर चढवणारे आहे. लोकशाहीचे हे दोन जल्लाद असतील तर गृहमंत्री अमित शहा हे त्या जल्लादांचे खरे बाप आहेत. 'इंडियन एक्स्प्रेस'ने हे सर्व प्रकरण समोर आणले. निवडणूक आयुक्त संधू व विवेक जोशी यांनी पुकारलेले हे बंड आहे. त्याबद्दल देश त्यांचा सदैव ऋणी राहील. राहुल गांधी, ममता बॅनर्जी, उद्धव ठाकरे, तेजस्वी यादव असे विरोधी नेते निवडणूक आयोगाच्या माफियागिरीबद्दल सतत बोलत होते. ज्ञानेश कुमार यांनी तर राहुल गांधी यांनाच आरोपी बनवले व ''प्रतिज्ञापत्र देऊन बोला'' असे सांगितले. देशाच्या निवडणूक आयोगातील बाहेर आलेले सर्व प्रकरण गंभीर आहे. अमित शहा, ज्ञानेश कुमार यांच्या घोटाळ्यांचे पुरावे आहेत. इतके होऊनही भाजप ज्ञानेश कुमार व अमित शहांचा बचाव करणार असेल तर देशभक्तीची गीते गाण्याचा अधिकार त्याला नाही. राजीव कुमार व ज्ञानेश कुमार यांच्या काळात निवडणूक आयोग हा अमित शहांच्या घरातला 'घरगडी' बनला. आपण कितीही मनमानी केली तरी आपले कोण काय वाकडे करणार या धुंदीत तो वावरला. सुप्रीम कोर्ट, निवडणूक आयोगासारख्या घटनात्मक संस्था व एकंदरीत यंत्रणेवरून लोकांचा विश्वास उडाला आहे. ज्या दोन-पाच टक्के लोकांचा विश्वास उरला होता, तोही संपला आहे. अमित शहा, ज्ञानेश कुमार यांच्यासारख्या व्यक्ती जोपर्यंत पदावर आहेत तोपर्यंत भारताच्या संविधानाला अर्थ राहणार नाही. पंतप्रधानांनी त्यांना लगेच हाकलून दिले पाहिजे, तरच देश वाचेल व मोदी वाचतील. अमित शहा, ज्ञानेश कुमार हे राजीनामा देणार नाहीत. त्यामुळे त्यांना हटवणे हाच पर्याय मोदींसमोर आहे. देश वाचवायची शेवटची संधी मोदींसमोर आहे. ५६ इंचाची छाती आहे हे दाखवण्याची ही संधी मोदींनी सोडू नये!**

# नवा दुष्काळ, जुनीच व्यवस्था

**यंदा देशातील पावसाची १५ टक्के तूट ही फक्त सुरुवात आहे. जवळपास निम्म्या जिल्ह्यांवर दुष्काळाचे सावट आहे. पीक आणि पाण्याची कमतरता असेल शेतकऱ्यांच्या आणि पर्यायाने ग्रामीण जनतेच्या उत्पन्नावर ताण असेल, येणारे काही महिने अधिक उष्ण आणि कोरडे राहू शकतात, असा इशारा शास्त्रज्ञांनी दिला आहे. पण या बदलत्या हवामानाच्या काळात आपण दुष्काळ मोजतो कसा आणि शेतकऱ्याला मदत देतो तरी कशी?**

**(पूवार्ध)**

गेल्या वर्षी (२०२५) दक्षिण-पश्चिम व मध्य महाराष्ट्रात अभूतपूर्व पाऊस आणि पुराच्या तडाख्यात हजारो हेक्टरवरील पिके उद्ध्वस्त झाली, घर जमीनदोस्त झाली, पशुधन वाहून गेले आणि हजारो कुटुंबे उद्ध्वस्त झाली. एका वर्षानंतर याच भागांत पूर्णपणे वेगळे चित्र आहे.

धाराशिवचेच उदाहरण घ्या जून आणि जुलैमध्ये जिल्ह्यातील पाऊस सरासरीइतकाच होता. त्यानंतर पाऊस थांबला. ऑगस्टमध्ये सरासरीच्या केवळ २७.९ टक्के पाऊस झाला आणि १४ सप्टेंबरपर्यंत सप्टेंबरच्या सरासरी पावसाच्या केवळ ३.७ टक्के पाऊस झाला होता. जिल्ह्यातील अनेक भागांत सोयाबीनला फुले आणि शेगा लागत असतानाच पावसाने दडी मारली. सप्टेंबरच्या मध्यापर्यंत जिल्यात केवळ ३१०.७ मिमी पाऊस झाला होता. सरासरी ६०३.१ मिमीच्या तुलनेत ही जवळपास ५० टक्क्यांची तूट आहे. या जिल्ह्यातील अनेक गावांत पावसाचा खंड सुमारे ८० दिवसांचा आहे.

याचे आर्थिक आणि पर्यावरणीय परिणाम अर्थातच गंभीर आहेत. भूजलपातळी पाच वर्षाच्या सरासरीपेक्षा सात मीटरहून अधिक खाली गेली आहे. महसूल अधिका-याच्या अंदाजानुसार पिकांचे ८० ते ८५ टक्के नुकसान झाले आहे. हताश झालेले शेतकरी बाजून गेलेली सोयाबीनची झाडे कापून जनावरांना चारा म्हणून घालत आहेत.

धाराशिव एक उदाहरण म्हणून इथे मांडले. महाराष्ट्रातच नव्हे तर निम्या देशात अशीच वाईट परिस्थिती आहे. नैऋत्य मोसमी पाऊस आता माघारी फिरण्याच्या तयारीत आहे. देशपातळीवर पावसाची तूट सुमारे १५ टक्के आहे. पण या राष्ट्रीय सरासरीच्या आकड्यामागे त्याहून व्यापक संकट दडलेले आहे. भारतीय हवामान विभागाच्या १ जून ते २० सप्टेंबर या कालावधीतील जिल्हानिहाय आकडेवारीनुसार, ज्या ७३४ जिल्ह्यांची आकडेवारी उपलब्ध आहे, त्यापैकी ३४२ जिल्ह्यांना म्हणजे ४६.६ टक्के जिल्ह्यांत तुटीचा अथवा मोठ्या तुटीचा पाऊस झाला. त्यापैकी ३०३ जिल्हे 'डेफिशिएंट' तर आणखी ३९ जिल्हे 'लार्ज डेफिशिएंट' (५०-१० टक्के तूट) श्रेणीत आहेत. केवळ ३०५ जिल्ह्यांमध्ये पाऊस सरासरीच्या (-१९ ते +१९ टक्के) आसपास आहे.

म्हणजेच, देशाचा निम्मा भाग यंदा दुष्काळात असेल. देशाची एकूण पावसाची तूट तुलनेने मर्यादित दिसत असली, तरी पाऊस कुठे पडला आणि कुठे पडला नाही, हे राष्ट्रीय सरासरीपेक्षा अधिक महत्वाचे आहे.

**पावसातील जीवघेणी तूट**

४ भारतीय हवामान विभागाने (आयएमडी) हंगामाच्या सुरुवातीच्या अंदाजातच यंदा देशात सरासरीपेक्षा कमी पावसाचा इशारा दिला होता. सुधारित अंदाजानुसार हंगामातील पाऊस दीर्घकालीन सरासरीच्या सुमारे ९० टक्के राहण्याची शक्यता



व्यक्त करण्यात आली होती. जूनमध्ये पाऊस सरासरीपेक्षा ३५ टक्के कमी झाला. जुलैमध्ये मात्र अनपेक्षितपणे सुधारणा झाली आणि देशपातळीवर पाऊस सरासरीपेक्षा सुमारे १ टक्का अधिक झाला. तरीही ऑगस्टच्या सुरुवातीलाच ४७ टक्के जिल्हे कमी किवा अत्यल्प पावसाच्या श्रेणीत होते. अनेक राज्यांमध्ये सप्टेंबरमध्येही पावसाने पुरेशी भरपाई केली नाही. या दोन महिन्यांत पीक वाढीच्या अवस्थेत असते आणि विशेषतः कोरडवाहू शेतीसाठी पाऊस महत्त्वाचा ठरतो.

मेघालयात हंगामी पावसाची तूट सुमारे ५९ टक्के आहे. मणिपूरमध्ये ४३ टक्के, आसाममध्ये २५ टक्के, बिहारमध्ये ३५ टक्के, आंध्र प्रदेशात ४२ टक्के, कर्नाटकात ३० टक्के, केरळमध्ये २८ टक्के, तमिळनाडूत २३ टक्के आणि तेलंगणात २० टक्के तूट आहे. पंजाबमध्येही पाऊस जवळपास ४० टक्क्यांनी कमी आहे.

महाराष्ट्रातील एकूण पावसाची तूट सुमारे १७ टक्के आहे. मात्र राज्यातील ३६ पैकी २० जिल्ह्यांमध्ये पावसाची मोठी तूट आहे. मराठवाडयातील आठही जिल्ह्यांत सरासरीपेक्षा ३० ते ५० टक्के कमी पाऊस झाला आहे. हा असा प्रदेश आहे जिथे वार्षिक सरासरी पाऊसच सुमारे ५५०-६०० मिमी असतो.

पश्चिम विदर्भातील कापूस पट्ट्यातही पावसाची मोठी तूट आहे. तिथे सरासरीपेक्षा ३० ते ४० टक्के कमी पाऊस झालाय. ऑगस्टमधील तूट तर ५० ते ८५ टक्क्यांपर्यंत होती.

राज्य किंवा देशाची सरासरी आणि जिल्ह्यांमधील प्रत्यक्ष परिस्थिती यातील फरक त्यामुळे स्पष्ट होतो. एखाद्या राज्याची एकूण पावसाची तूट फार मोठी नसली, तरी त्यातील काही प्रदेश तीव्र ताणाला सामोरे जाऊ शकतात, किंबहुना जातातच.

**साखळी परिणामांची मालिका**

या तुटीचा भारताच्या कृषी अर्थव्यवस्थेवर आणि ग्रामीण उत्पन्नावर साखळी परिणाम होणार आहे. त्याची चिन्हे शेतात आधीच दिसत आहेत.

महाराष्ट्रात सोयाबीन, कापूस आणि मका या पिकांवर पावसातील दीर्घ खंडाचा परिणाम झाल्याचे वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांनी सांगितले, राज्य मंत्रिमंडळानेही तूर, उडीद, मूग, सोयाबीन आणि कापूस या पिकांना फटका बसल्याचे नमूद केले आहे.

अपुऱ्या पावसाचा पहिला आर्थिक परिणाम होईल तो म्हणजे रोख पैशांचा तुटवडा.

पावसावर अवलंबून असलेल्या शेतक-यासाठी पावसाची तूट म्हणजे उत्पादनात घट, संरक्षित सिंचनावर आणि निविष्ठांवर वाढलेला खर्च, शेतमालाच्या विक्रीतून मिळणाऱ्या उत्पन्नात घट आणि हंगामाच्या सुरुवातीला घेतलेल्या पीककर्जाची परतफेड करण्यातील अडचण.

पीक हातचे गेले तर कुटुंबाकडे जुने कर्ज फेडण्यासाठी कमी पैसा उरतो आणि पुढच्या हंगामासाठी भांडवल उभे करण्याची क्षमताही घटते. पीक उत्पादन घटले तर शेतमजुरांची मागणीही कमी होते. म्हणजे दुष्काळ हा फक्त शेतकऱ्याचा प्रश्न राहत नाही; तो ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या संपूर्ण साखळीचा प्रश्न बनतो.

मोठी शहरे वगळता संबंध महाराष्ट्रात यंदा सगळ्याच गोष्टींची वानवा असेल. गेली काही वर्षे ग्रामीण भागात मंदीच आहे. यंदा त्याचे चटके जास्त जाणवतील. या सर्वांचा आवाज होईल. राजकीय नेते ओरडतील, मागण्या करतील, सरकारही आम्ही किती दानशूर आहोत, हे दाखवेल, पण लोकांचे हाल होतील. मागील अनुभव हेच सांगतो.

या पार्श्वभूमीवर भाताचे पीक देशासाठी आणखी एक इशारा देत आहे. २०२६ मधील भारताचे तांदूळ उत्पादन सुमारे १० दशलक्ष टनांनी घटू शकते, असा रॉयटर्स वृत्तसंस्थेचा अंदाज आहे. पावसाची कमतरता आणि उन्हाळ्यात घेतल्या जाणाऱ्या भाताच्या क्षेत्रातील घट त्यामागे कारणीभूत आहेत. उत्पादन घटले तर अन्नधान्याच्या किमतीवर दवाव येईल हे निर्विवाद.

**पाण्याची स्थिती चिंताजनक**

पाण्याची स्थितीही वेगळी नाही. १७ सप्टेंबरपर्यंत केंद्रीय जल आयोगाच्या देखरेखीखालील १७८ प्रमुख जलाशयांमध्ये १३१.१७ अब्ज घनमीटर पाणीसाठा होता. गेल्या वर्षी याच काळाच्या तुलनेत तो २१ टक्क्यांनी कमी आणि दहा वर्षाच्या सरासरींपेक्षा जवळपास ९ टक्क्यांनी कमी राहिला.

गांधीनगर आयआयटीमधील 'इंडिया डाउट मॉनिटर'ने पावसाबरोबर इतर जल-हवामानविषयक निर्देशकांचा वापर करून केलेल्या मूल्यांकनानुसार यंदा भारताच्या ५३.२ टक्के भूभागावर काही ना काही स्वरूपाचा दुष्काळ आहे. ३३.४ टक्के भूभाग मध्यम किंवा त्याहून अधिक दुष्काळाच्या स्थितीत, १५.४ टक्के तीव्र किंवा त्याहून अधिक आणि ३.८ टक्के अत्यंत तीव्र दुष्काळाच्या स्थितीत आहेत.

**सावध, ऐका पुढल्या हाका**

याचा अर्थ एकच भारताने अत्यंत विषम असा पावसाळा यंदा अनुभवला. त्यातून पिकांवरचा ताण, जलाशयांवरील ताण आणि भूजलावरील ताण यांचे एक गुंतागुंतीचे जाळे तयार झाले आहे. पण कृषीच्या घडयाळयापलीकडे आणखी एक घड्याल वेगाने पुढे सरकत आहे.

देशभरातील १८८ पर्यावरणशास्त्रज्ञ आणि संवर्धन शास्त्रज्ञांनी १६ सप्टेंबर रोजी २०२६-२७ मध्ये येऊ घातलेल्या 'सुपर' एल निनोसाठी तयारी करण्याचे आवाहन केले. त्यांच्या मते त्याचे परिणाम भारतातील उष्णता आणि कोरडेपणापासून ते समुद्रातील उष्णतेच्या लाटा, जंगले, गवताळ प्रदेश, गोडया पाण्याच्या आणि किनारी परिसंस्थांपर्यंत जाणवू शकतात. 'सुपर एल निनों' ही आयएमडीची अधिकृत वर्गवारी नाही. पण या शास्त्रज्ञांचा मूलभूत आग्रह महत्वाचा आहे. तो म्हणजे परिणाम दिसण्याची वाट न पाहता त्यांचे मोजमाप आतापासून सुरू करा. हाच २०२६च्या पावसाळ्याचा सर्वांत महत्त्वाचा धडा ठरेल.

**जयदीप हर्डीकर**

# प्रशासनाला अधिक पारदर्शी करणारा माहितीचा अधिकार अधिनियम २००५

२८ सप्टेंबर हा दिवस जगभरात 'माहितीचा सार्वत्रिक प्रवेश दिन' म्हणून पाळला जातो. माहिती मिळणे हा केवळ प्रशासकीय सोयीचा विषय नसून लोकशाहीतील नागरिकांच्या सहभागाचा, शासनाच्या उत्तरदायित्वाचा आणि पारदर्शकतेचा महत्त्वपूर्ण आधार आहे. याच जाणिवेचा विस्तार भारतात 'माहितीचा अधिकार अधिनियम, २००५'च्या माध्यमातून झाला. आता हा कायदा आपल्या २१व्या वर्षात पदार्पण करत आहे. प्रशासनात पारदर्शकता ठेवणे व अभिलेखे उत्तम प्रकारे जतन करणे याची शिस्त या कायद्याने लावली आहे. सोबतच या देशाच्या सामान्य नागरिकांना आम्ही जबाबदार आहोत, याची जाणीव प्रशासनाच्या प्रत्येक स्तराला करून देण्यात या कायद्याला यश आले आहे.

माहितीच्या सार्वत्रिक प्रवेशाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी युनेस्कोच्या सर्वसाधारण परिषदेने २०१५ मध्ये २८ सप्टेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन (International Day for Universal Access to Information) म्हणून घोषित केला. त्यानंतर ऑक्टोबर २०१९ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या ७४व्या महासभेनेही या दिवसाला आंतरराष्ट्रीय मान्यता दिली. माहितीपर्यंत समान आणि सार्वत्रिक प्रवेश हा सुजाण निर्णयप्रक्रिया,लोकशाही, समावेशकता आणि उत्तरदायी संस्था यांच्यासाठी आवश्यक असल्याचे युनेस्को नमूद करते.

**माहितीच्या अधिकाराची जागतिक वाटचाल**

माहितीच्या अधिकाराची संकल्पना आधुनिक काळात सर्वप्रथम कायद्याच्या स्वरूपात स्वीडनमध्ये २ डिसेंबर १७६६ रोजी अस्तित्वात आली. स्वीडिश फ्रीडम ऑफ द प्रेस ऑर्डिनन्स (Freedom of the Press Ordinance) हा सार्वजनिक माहितीपर्यंत प्रवेशाची हमी देणारा जगातील पहिला कायदा मानला जातो.भारतामध्ये मात्र या अधिकारामागची वाटचाल सामाजिक चळवळी, लोकशाही मूल्ये आणि प्रशासनातील पारदर्शकतेच्या मागणीशी जोडलेली आहे.

**'हमारा पैसा, हमारा हिसाब' ते माहितीचा अधिकार**

राजस्थानातील 'मजदूर किसान शक्ती संघटने'च्या आंदोलनाने भारतातील माहिती अधिकार चळवळीला व्यापक लोकाधार मिळवून दिला. अरुणा रॉय, निखिल डे आणि शंकर सिंह यांच्यासह कार्यकर्त्यांनी गावकऱ्यांच्या विकासकामांवरील खर्चाची नोंद, मजुरीची माहिती आणि सरकारी अभिलेख लोकांसमोर आणण्याची मागणी केली. 'आमचा पैसा, आमचा हिशेब' ही भूमिका या चळवळीच्या केंद्रस्थानी होती. सरकारी कामात आपले श्रम आणि पैसा वापरला जात असेल तर त्या कामाचा हिशेब जाणून घेण्याचा नागरिकांना अधिकार असावा, या साध्या प्रश्नातून ही चळवळ उभी राहिली.

या चळवळीच्या अनुभवातून राष्ट्रीय पातळीवर नॅशनल कॅम्पेन फॉर पीपल्स राईट टू इन्फॉर्मेशन (National Campaign for People's Right to Information (NCPRI) ची स्थापना १९९६ मध्ये झाली. अरुणा रॉय आणि निखिल डे यांच्यासह अनेक सामाजिक कार्यकर्ते, कायदेतज्ज्ञ, पत्रकार आणि नागरी समाजातील व्यक्तींनी माहितीच्या अधिकारासाठी राष्ट्रीय पातळीवर सातत्याने पाठपुरावा केला.

महाराष्ट्रातही माहितीच्या अधिकाराच्या मागणीला सामाजिक चळवळींचा आधार मिळाला. अण्णा हजारे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात पारदर्शक प्रशासनासाठी झालेल्या आंदोलनांनी माहितीच्या अधिकाराच्या मागणीला जनमानसात स्थान मिळवून दिले. महाराष्ट्राने २००२ मध्ये स्वतंत्र माहिती अधिकार कायद्याच्या माध्यमातून एक महत्त्वाचे पाऊल उचलले. १० ऑगस्ट २००२ रोजी त्याला राष्ट्रपतींची मंजुरी मिळाली होती.

**२००५ : देशव्यापी कायद्याचा निर्णायक टप्पा**

केंद्र सरकारने यापूर्वी फ्रीडम ऑफ इन्फॉर्मेशन ॲक्ट (Freedom of Information Act, २००२) केला होता. मात्र अधिक प्रभावी, सहभागी आणि अर्थपूर्ण माहिती अधिकाराची गरज लक्षात घेऊन तो कायदा बाजूला ठेवून नवा कायदा करण्याची प्रक्रिया सुरू झाली. माहितीचा अधिकार विधेयक २३ डिसेंबर २००४ रोजी लोकसभेत मांडण्यात आले. दोन्ही सभागृहांनी मे २००५ मध्ये ते मंजूर केले. राष्ट्रपतींची संमती १५ जून २००५ रोजी मिळाली, अधिनियमाचे राजपत्रात प्रकाशन २१ जून २००५ रोजी झाले आणि १२ ऑक्टोबर २००५ रोजी हा कायदा पूर्णपणे लागू झाला.

त्यामुळे सप्टेंबर २०२६ मध्ये देशव्यापी माहिती अधिकार कायद्याला २० वर्षे पूर्ण होऊन २१व्या वर्षात प्रवेश झाला आहे. महाराष्ट्रात केंद्रीय अधिनियमाची अंमलबजावणीही १२ ऑक्टोबर २००५ पासूनच झाली. त्याआधी राज्याचा स्वतंत्र २००२ चा कायदा अस्तित्वात होता.

**नागरिकांच्या हातातील प्रभावी साधन**

माहितीचा अधिकार अधिनियमामुळे नागरिकांना सार्वजनिक प्राधिकरणांकडील अभिलेख, दस्तऐवज, आदेश, अहवाल, करार, नोंदी आदींबाबत माहिती मागण्याचा कायदेशीर अधिकार मिळाला. अर्जदाराला माहिती का हवी आहे, याचे कारण देणे कायद्याने आवश्यक नाही. साधारणपणे माहिती देण्यासाठी ३० दिवसांची मुदत आहे; जीवन किंवा स्वातंत्र्याशी संबंधित माहिती ४८ तासांत देण्याची तरतूद आहे. माहिती न मिळाल्यास प्रथम अपील आणि त्यानंतर द्वितीय अपील किंवा तक्रारीची व्यवस्था आहे. माहिती देण्यात कायद्यातील अटींचे उल्लंघन झाल्यास संबंधित जन माहिती अधिकाऱ्यावर दररोज २५० रुपये, कमाल २५ हजार रुपयांपर्यंत दंडाची तरतूद आहे. यामुळे नागरिकाला 'शासन काय करते?' हा प्रश्न विचारण्याबरोबरच 'शासनाने कोणत्या नोंदीच्या आधारे निर्णय घेतला?' हे जाणून घेण्याची कायदेशीर संधी मिळाली.

**प्रशासनात झालेला बदल**

माहिती अधिकारामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर दोन प्रकारे परिणाम झाला. पहिला म्हणजे उत्तरदायित्व निर्णय, आदेश आणि अभिलेख व्यवस्थित ठेवण्याची गरज वाढली. दुसरा म्हणजे स्वयंप्रेरित माहिती प्रकटीकरण. कायद्याच्या कलम ४ अंतर्गत सार्वजनिक प्राधिकरणांनी अनेक बाबी स्वतःहून प्रसिद्ध करणे अपेक्षित आहे. महाराष्ट्र राज्य माहिती आयोगानेही कलम ४ ची प्रभावी अंमलबजावणी, संकेतस्थळांवर माहिती अद्ययावत ठेवणे आणि अभिलेखांचे संगणकीकरण यावर सातत्याने भर दिला आहे.

आज ई-गव्हर्नन्स, ऑनलाइन अर्ज, डिजिटल अभिलेख, संकेतस्थळांवरील १७ बाबींचे प्रकटीकरण आणि ऑनलाइन अपील यामुळे माहिती मिळविण्याची प्रक्रिया अधिक सुलभ झाली आहे. महाराष्ट्र शासनाचे ऑनलाइन RTI पोर्टल नागरिकांना अर्ज व प्रथम अपील ऑनलाइन दाखल करण्याची सुविधा देते.

**कायद्यातील काही महत्वाचे बदल**

केंद्रीय पातळीवर RTI Rules, २०१२ लागू झाले. त्यानंतर २०१९ मध्ये अधिनियमात महत्त्वाची सुधारणा करून केंद्रीय व राज्य माहिती आयुक्तांच्या पदावरील कार्यकाळ, वेतन, भत्ते आणि सेवा अटी केंद्र शासनाने नियमांद्वारे निश्चित करण्याची तरतूद करण्यात आली. महाराष्ट्राने आता आणखी एक अद्ययावत पाऊल टाकले असून 'महाराष्ट्र माहिती अधिकार नियम, २०२६' ७ जुलै २०२६ रोजी प्रसिद्ध झाले आहेत. ऑनलाइन RTI प्रणालीवर त्याची अधिकृत नोंद उपलब्ध आहे.

**महाराष्ट्रातील माहिती आयोगाची व्यवस्था**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोगाची स्थापना १२ ऑक्टोबर २००५ रोजी झाली. आयोगात मुख्य माहिती आयुक्त आणि राज्य माहिती आयुक्तांची व्यवस्था आहे. सध्या राहुल भालचंद्र पांडे हे मुख्य माहिती आयुक्त आहेत. विभागीय पातळीवर बृहन्मुंबई येथे डॉ. प्रदीप व्यास, पुणे व छत्रपती संभाजीनगर येथे मकरंद मधुसूदन रानडे, नाशिक व कोकण येथे प्रकाश इंदलकर यांच्याकडे आहे. अमरावती येथे रविंद्र ठाकरे आणि नागपूर येथे गजानन निमदेव कार्यरत आहेत. राज्य शासनाने अनुभवी आणि कर्तव्यदक्ष व्यक्तींची या पदावर नेमणूक केल्यामुळे आयोगाची प्रलंबितता मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. अशा प्रकारे मुंबई मुख्यालयासह सात विभागीय कार्यक्षेत्रांत आयोगाची सुनावणी व्यवस्था उपलब्ध आहे. आयोगाच्या संकेतस्थळावर मासिक निकाली प्रकरणांचे अहवाल, निर्णय आणि सुनावणी तक्तेही प्रसिद्ध केले जातात.

**वापर आणि गैरवापराची चर्चा**

घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी घटना समिती समोर भाषण करताना एक बाब अधोरेखित केली होती. ते म्हणाले होते, 'ही घटना भारतीय लोकशाहीसाठी अत्यंत उपयुक्त करू शकते मात्र,याचा वापर कोण करते आणि देशहितासाठी किती आपुलकीने करते यावर आपल्या देशाचे भविष्य राहील ' हा कायदा ही अशाच प्रकारे पारदर्शी लोकप्रशासनासाठी अधिक सक्रियतेने वापरणे गरजेचे आहे. माहितीचा अधिकार हा लोकशाहीतील प्रभावी नागरिक-साधन आहे; मात्र त्याचा वापर कायद्याच्या उद्देशाशी सुसंगत असणेही तितकेच आवश्यक आहे. वैयक्तिक स्वरूपाची, व्यापक जनहिताशी संबंध नसलेली माहिती किंवा सार्वजनिक प्राधिकरणाकडे अस्तित्वात नसलेली नवी माहिती निर्माण करून देण्याची अपेक्षा कायद्याच्या चौकटीत येत नाही. त्यामुळे अधिकाराचा वापर करताना तथ्याधारित, नेमकी आणि सार्वजनिक कामकाजाशी संबंधित माहिती मागणे ही नागरिकांचीही जबाबदारी आहे. प्रशासनानेही कायद्यातील अपवादांचा अवाजवी विस्तार न करता पात्र माहिती वेळेत उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे.

**यंदाचा विशेष उपक्रम**

२०२६ मध्ये महाराष्ट्रात माहिती अधिकार दिन अधिक व्यापक जनजागृतीच्या माध्यमातून साजरा करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे आणि इतर शैक्षणिक संस्थांमध्ये माहितीच्या अधिकारावर आधारित प्रश्नमंजुषा, चित्रकला, निबंध आणि वक्तृत्व स्पर्धा, तसेच चर्चासत्रे आणि व्याख्यानमाला आयोजित करण्याचा उपक्रम राबविला जात आहे. या उपक्रमातून माहितीचा अधिकार हा केवळ अर्ज करण्यापुरता कायदा नसून लोकशाही मूल्यांची जाणीव करून देणारे नागरिक शिक्षण आहे, हा संदेश तरुण पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न आहे.

**प्रवीण टाके**
उपसंचालक विभागीय माहिती कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर- ९७०२८५८७७७

# ब्लास्टिंग ट्रॅक्टरचा स्फोटात मृतांची संख्या चार,दहा जखमी..!

## विनापरवाना स्फोटके बाळगल्याचा आरोप, मालक,चालकासह तिघांवर गुन्हा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २७ :** उमरखेड-ढाणकी मार्गावरील जाकीर हुसेन वॉर्ड परिसरातील किसान वेल्डिंग वर्कशॉपसमोर ब्लास्टिंगच्या ट्रॅक्टरला वेल्डिंग करताना झालेल्या भीषण स्फोटात चौघांचा मृत्यू, तर दहा जण जखमी झाल्याचे पोलिस तपासात स्पष्ट झाले आहे. या प्रकरणाने ब्लास्टिंगसाठी वापरल्या जाणाऱ्या स्फोटकांच्या साठवणूक, वाहतूक आणि हाताळणीच्या सुरक्षिततेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. प्रकरणी ट्रॅक्टर मालक, चालक आणि स्फोटके पुरविणाऱ्या व्यक्तीसह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.





ही घटना २६ सप्टेंबर रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास घडली. बाळदी येथील अप्पाराव माधवराव बोक्से यांच्या मालकीचा एमएच-२९ व्ही-२५२८ क्रमांकाचा ट्रॅक्टर वेल्डिंगसाठी वर्कशॉपसमोर आणण्यात आला होता. वेल्डिंग सुरू असतानाच ट्रॅक्टरमध्ये ठेवलेल्या स्फोटकांचा भीषण स्फोट झाला. स्फोटामुळे ट्रॅक्टरचे मोठे नुकसान झाले, तर परिसरातील मारुती ईको आणि बोलेरो मॅक्स पिकअपचेही नुकसान झाले. घटनास्थळी पोलिसांना 'Super Power ९० (Emulsion Explosives) SOLAR' असे नमूद असलेल्या अंदाजे ४० ते ५० अर्धवट फुटलेल्या ट्यूब तसेच लाल रंगाच्या कॉर्डेक्स वायरचे बंडल आढळल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या दुर्घटनेत अविनाश केशव बेले (३५), वैभव अप्पाराव बोक्से (२०), शेख जावेद शेख जमीर (२३) आणि सैयद शाहजेब सैयद अनिस (१५) यांचा मृत्यू झाला. ट्रॅक्टर मालक अप्पाराव बोक्से आणि वेल्डिंग करणारे बाशीद खान रशीद खान यांच्यासह दहा जण जखमी झाले असून काहींवर उमरखेड, तर गंभीर जखमींवर नांदेड येथे उपचार सुरू आहेत. पोलिसांच्या माहितीनुसार, नांदेड येथील रुग्णालयात जखमी अप्पाराव बोक्से यांची चौकशी करण्यात आली. त्यांच्या कथनानुसार, ट्रॅक्टरमधील स्फोटकांचा वेल्डिंगदरम्यान स्फोट झाला आणि ही स्फोटके ढाणकी येथील बळीराम नरवाडे यांच्याकडून आणण्यात आल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. स्फोटकांचा आवश्यक परवाना नसताना साठा करून निष्काळजीपणे हाताळल्याचा आरोप ट्रॅक्टर मालक व चालकावर, तर परवानगी नसलेल्या व्यक्तींना स्फोटके पुरवल्याचा आरोप नरवाडे यांच्यावर आहे. उमरखेड पोलिसांनी अपराध क्रमांक ९२४/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम १०५, २८८ तसेच संबंधित स्फोटक कायद्यांतील कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे.

**नरवाडेच्या स्फोटक व्यवहाराची व्याप्ती किती?**

**ढाणकी येथील बळीराम नरवाडे यांच्यावर यापूर्वी अन्य जिल्ह्यांत गुन्हे दाखल आहेत का, तसेच त्यांच्याकडून आणखी किती विनापरवाना स्फोटकांचा वापर करणाऱ्या ट्रॅक्टरमालकांना साहित्य पुरविले जात होते, याची सखोल चौकशी करण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे. उमरखेड स्फोटप्रकरणातील स्फोटकांचा पुरवठा नेमका कोणत्या माध्यमातून झाला, त्यासाठी आवश्यक परवाने होते का आणि या व्यवहारात आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा तपास होणे गरजेचे आहे. संबंधित व्यक्तींकडून यापूर्वी अशाच प्रकारे स्फोटक पदार्थांची विक्री अथवा पुरवठा झाला असल्यास त्याचीही नोंद तपासात समोर यावी, अशी चर्चा शहरात सुरू आहे.**

# आरोग्य यंत्रणा झाली जागी मृतक सिझ्झा फातेमा कुटुंबाची अधिकाऱ्यांकडून भेट

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**महागाव, दि. २७ :** डोंगरगाव येथील सिझ्झा फातेमा यांच्या निधनाच्या पार्श्वभूमीवर महागाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी तुळशीराम चव्हाण यांनी कुटुंबीयांची भेट घेऊन घटनेची माहिती जाणून घेतली. गावातील आरोग्यस्थिती, स्वच्छता तसेच प्रतिबंधात्मक उपाययोजनांचाही त्यांनी आढावा घेतला. यावेळी आरोग्य विस्तार अधिकारी दिगंबर शेळके व आरोग्य विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

दरम्यान, पोफाळी पोलीस ठाण्याचे ठाणेदार निलेश शेंबळे यांनीही फातेमा यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन घटनेची माहिती घेतली. या भेटीदरम्यान डोंगरगावातील नागरिकांनी आरोग्य उपकेंद्राचा अभाव आणि दूषित पाण्याचा प्रश्न अधिकाऱ्यांसमोर मांडला. नागरिक सय्यद मोहसिन यांनी गावातच आरोग्य उपकेंद्र सुरू करण्यासोबत पिण्याच्या पाण्यासाठी फिल्टरची सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली. त्यावर गटविकास अधिकारी चव्हाण यांनी आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. यावेळी ग्रामपंचायत अधिकारी सागर सावंत, आरोग्य कर्मचारी अमोल बंदुके, विनोद घिसेवाड तसेच पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

## थोडक्यात



### पुनर्वसन प्रक्रियेवर ग्रामस्थांचा आक्षेप..! फुबगावसह तीन गावांचा आंदोलनाचा इशारा

**फुबगाव पुनर्वसन तातडीने थांबवून कायद्यानुसार नव्याने प्रक्रिया राबविण्याची मागणी**

**दारव्हा :** टाकळी डोल्हारी प्रकल्पांतर्गत फुबगाव गावठाणाच्या पुनर्वसनाचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित असताना सध्या सुरू असलेली पुनर्वसन प्रक्रिया तातडीने थांबवून कायद्यानुसार नव्याने प्रक्रिया राबवावी, अशी मागणी फुबगाव, उदापूर व घनापूर येथील ग्रामस्थांनी केली आहे. याबाबत उपविभागीय तथा भूसंपादन अधिकारी, दारव्हा यांना निवेदन देण्यात आले. २४ सप्टेंबर रोजी यवतमाळ येथे नियोजित पुनर्वसन आढावा सभा निवडणूक आचारसंहितेमुळे रद्द झाली. मात्र, पुनर्वसनाबाबत प्रशासनाने ग्रामस्थांना अद्याप स्पष्ट माहिती दिलेली नसल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला. फुबगाव पुनर्वसनाचे प्रकरण २०२१ मध्ये व्यपगत झाले असल्यास त्यानंतर नव्याने भूसंपादन व पुनर्वसन कायद्यानुसार प्रक्रिया राबविण्यात आली का, ग्रामसभेने सुचविलेली पुनर्वसनाची जागा मंजूर झाली आहे का आणि सध्याची जागा कोणत्या ठरावाच्या आधारे निश्चित करण्यात आली, याची माहिती प्रशासनाने जाहीर करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. बैरागी बुवा मठ परिसरातील सुरू असलेली कार्यवाही थांबवून पारदर्शक प्रक्रिया राबवावी. भविष्यातील बैठकीची किमान सात दिवस आधी लेखी सूचना देऊन दवंडी व नोटीसद्वारे प्रसिद्धी करावी, अशीही मागणी आहे. मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास आंदोलन व उपोषणाचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

### युरियाच्या नावाखाली शेतकऱ्यांची लूट?

**जादा दराने विक्रीचा आरोप सल्फर खरेदीची सक्ती असल्याच्या तक्रारीनी खळबळ**

✦ अरविंद तेलंगे

**राळेगाव:** शहरातील काही कृषी केंद्रांवर युरिया खताची विक्री शासननिर्धारित दरापेक्षा जादा दराने होत असल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांकडून करण्यात आल्याने खळबळ उडाली आहे. युरिया घेण्यासाठी सल्फर खताची बॅग घेण्याची सक्ती केली जात असल्याचा आरोपही शेतकऱ्यांनी केला आहे.

शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, ४५ किलोच्या युरिया बॅगसाठी काही ठिकाणी ३५० ते ४०० रुपये आकारले जात आहेत. युरियासोबत सल्फरची बॅग घेण्यास सांगितले जात असून, त्यासाठी अतिरिक्त ७५० ते ८०० रुपयांचा खर्च करावा लागत असल्याचा आरोप आहे. काही विक्रेत्यांकडून 'युरियाचा तुटवडा आहे, घ्यायचा असेल तर घ्या' अशा स्वरूपाचे उत्तर मिळत असल्याची तक्रारही करण्यात आली आहे.

आधीच वाढत्या उत्पादन खर्चाने त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांना खत खरेदीतही अतिरिक्त आर्थिक भुर्दंड बसत असल्याचा आरोप आहे. त्यामुळे कृषी विभागाच्या कारभारावर ही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

**अचानक तपासणी करून सत्य बाहेर आणा**

कृषी विभागाने राळेगावातील कृषी केंद्रांची अचानक तपासणी करून युरियाचा साठा, विक्रीदर, बिले, स्टॉक रजिस्टर आणि इतर खतांच्या सक्तीची पडताळणी करावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. तक्रारी खऱ्या आढळल्यास संबंधित विक्रेत्यांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

### उबुंटूमध्ये कृषी व मोबाईल फोटोग्राफी प्रदर्शन,पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**यवतमाळ :** शिक्षण केवळ पाठ्यपुस्तकापुरते मर्यादित न ठेवता प्रत्यक्ष अनुभवातून विद्यार्थ्यांच्या कौशल्यांना आकार देण्याचा उपक्रम उबुंटू इंग्लिश स्कूलमध्ये राबविण्यात आला. मागील दोन महिन्यांपासून विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या कृषी व मोबाईल फोटोग्राफी प्रशिक्षणाचा अनुभव शनिवार, दि. २६ सप्टेंबर रोजी आयोजित प्रदर्शनातून पालकांसमोर सादर करण्यात आला. शिक्षिका सपना भेंडारकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी मातीचे प्रकार, वनस्पती, शेती प्रक्रिया यांसह विविध कृषीविषयक संकल्पनांचा प्रत्यक्ष अभ्यास करून प्रोजेक्ट तयार केले. तर केऊर उघडे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी मोबाईल फोटोग्राफीचे तंत्र आत्मसात केले. निसर्गचित्रण, स्टिल व सिनेमॅटिक फोटोग्राफीसोबत विविध प्रॉप्स आणि पर्स्पेक्टिव्हचा वापर करून त्यांनी छायाचित्रे साकारली. विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांनी केवळ छायाचित्रे प्रदर्शित न करता कॅमेरा फंक्शन्स, लेन्स, प्रकाशयोजना आणि छायाचित्रामागील संकल्पना यांची माहिती पालकांना आत्मविश्वासाने दिली. त्यामुळे प्रदर्शन हे केवळ प्रोजेक्टचे सादरीकरण न राहता विद्यार्थ्यांच्या निरीक्षणशक्ती, सर्जनशीलता, तांत्रिक ज्ञान आणि संवादकौशल्याचे व्यासपीठ ठरले. पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास पाहून पालकांनी समाधान व्यक्त केले. यावेळी अध्यक्ष पांडुरंग खांदवे, उपाध्यक्ष संभाजी राणे, सचिव प्रवीण खांदवे, संचालक हिंमत खांदवे, संचालिका सुरेखा खांदवे, कार्यकारी संचालक अनुप यादव, मुख्याध्यापिका शुभांगी बोरखडे, केंद्रप्रमुख दत्तात्रेय गावंडे, पराग पांडे व को-ऑर्डिनेटर निखील आडे उपस्थित होते.

# आरटीआय अर्जाची पोहच नाकारली..!

## पंचायत समितीतील अधिकाऱ्यावर कारवाईची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पांढरकवडा, दि. २७ :** माहितीचा अधिकार कायद्यांतर्गत अर्ज स्वीकारण्यास नकार देत शासकीय प्रक्रियेलाच हरताळ फासल्याचा आरोप करत पंचायत समिती पांढरकवडा येथील सहाय्यक प्रशासन अधिकारी सुनील गुणवंत वनकर यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. याबाबत मुख्यमंत्री सचिवालय, ग्रामविकास विभाग व विभागीय आयुक्तांकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे. तक्रारदार आकाश अनंतराव सामलवार यांनी २३ सप्टेंबर रोजी गटविकास अधिकाऱ्यांच्या नावे आरटीआय अर्ज आवक-जावक विभागात सादर करण्याचा प्रयत्न केला. मात्र, वनकर यांनी संबंधित कर्मचाऱ्यांना अर्ज स्वीकारू नका, असे सांगितल्याचा आरोप आहे. अर्जावर "ग्रामपंचायत ताडउमरी येथे स्वतंत्र ज.मा.अ. आहेत" असा शेरा देत पोहोच देण्यासही नकार दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकाराची विभागीय चौकशी करून महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियमांनुसार कारवाई करावी, तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांचे पाठबळ आहे का, याचीही चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# भरधाव स्विफ्टचा दुचाकीला धक्का..

## निवृत्त शिक्षकाचा जागीच मृत्यू, अपघाताने वणी हादरले.

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**वणी, दि. २७ :** घुगूस मार्गावरील जन्नत हॉटेलसमोर भरधाव स्विफ्ट कारने दुचाकीला मागून जोरदार धडक दिल्याने निवृत्त शिक्षकाचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

रविवारी (२७ सप्टेंबर) सायंकाळी चार वाजताच्या सुमारास हा भीषण अपघात घडला.



बाळासाहेब अंकुजी टोंगे (६७, रा. प्रगतिनगर, वणी) असे मृतकाचे नाव आहे. टोंगे हे जनता विद्यालयातून शिक्षक म्हणून निवृत्त झाले होते. रविवारी ते आपल्या मूळ गावी पुरड येथे दुचाकीने गेले होते. गावाहून वणीकडे परतत असताना जन्नत हॉटेलसमोर मागून आलेल्या एमएच २९ एडी ७७७१ क्रमांकाच्या स्विफ्ट कारने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेनंतर त्यांना काही अंतर फरफटत नेण्यात आल्याचे सांगण्यात येते. गंभीर दुखापतीमुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली. घटनेमुळे प्रगतिनगर परिसरात हळहळ व्यक्त होत असून, पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे.

# NSS स्थापना दिनानिमित्त राजीव महाविद्यालयात भाषण स्पर्धा..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**झरी-जामणी, दि. २७ :** राष्ट्रीय सेवा योजना (NSS) स्थापना दिनानिमित्त राजीव विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, झरी-जामणी येथे २४ सप्टेंबर रोजी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांसाठी 'Not Me But You' या विषयावर भाषण स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेत विद्यार्थ्यांनी समाजसेवा, स्वयंसेवा, सामाजिक जबाबदारी



आणि राष्ट्रनिर्मितीतील युवकांची भूमिका यावर परखड विचार मांडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. आर. एन. देशमुख होत्या. IQAC समन्वयक प्रा. भोयर, NSS कार्यक्रम अधिकारी डॉ. जाधव व महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. केशट्टी यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. जाधव यांनी NSS ची उद्दिष्टे व समाजसेवेतील योगदान स्पष्ट केले. प्राचार्या देशमुख यांनी विद्यार्थ्यांनी सामाजिक जबाबदारी स्वीकारून समाजहितासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. यावेळी 'विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग' उपक्रमासाठी विद्यार्थ्यांचे नोंदणीकरणही करण्यात आले. कार्यक्रमाला विद्यार्थी व NSS स्वयंसेवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# १४.५० टक्के लाभांशाने शिक्षक पतसंस्थेचा नफ्यातील ठसा..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. २७ :** उमरखेड पंचायत समिती प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेची ४३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी (२७ सप्टेंबर) आर्य वैश्य भवन येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

संस्थेने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये तब्बल २ कोटी २० लाख रुपयांचा नफा कमावल्याची माहिती सभेत देण्यात आली. या नफ्यातून सभासदांना १४.५० टक्के लाभांश देण्याची घोषणा करण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या उपाध्यक्षा मिराताई हनुमंतराव कदम होत्या. प्रारंभी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सचिव अमरदीप दवणे यांनी वार्षिक अहवालाचे वाचन केले, तर पुष्पजित राणे यांनी सभेचे संचालन केले. सभेत आर्थिक अहवाल, ताळेबंद, नफा-तोटा पत्रक व अंदाजपत्रक सादर करण्यात आले. सभासदांनी लेखी प्रश्न व विविध शंका उपस्थित केल्या. त्यावर सचिवांनी स्पष्टीकरण देत समाधान केले. संस्थेचे ५३७ सभासद असून सुरुवातीपासून संस्था नफ्यात आहे. संस्थेला सातत्याने 'अ' वर्ग मिळत असल्याचेही सांगण्यात आले. मासिक ठेवींवर १० टक्के व्याज देण्यास तसेच सभासदांना भेटवस्तू देण्याच्या प्रस्तावास आमसभेने मंजुरी दिली. गुणवंत पाल्य आणि सेवानिवृत्त सभासदांचा सत्कार करण्यात आला. संभाजी पुंडे, अरुण बुरकुले, विजय मुंगे, संतोष खुपसे, आनंद कुंबरवार, विनय चव्हाण, अमोल पाईकराव, राजेश्वरी दराडे, रामदास केंद्रे, रमेश राठोड, व्यवस्थापक सुनील दगडफोडे, महेश भोकरे आदी उपस्थित होते.

# कॅन्सरग्रस्त निराधार रुग्णाला 'थोडंसं जगणं समाजासाठी' चा मदतीचा हात

## ११,११६ रुपये रोख आणि महिनाभराचे अन्नधान्य केले सुपूर्द

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**वणी, दि. २७ :** तालुक्यातील निंबाळा रोड येथील रहिवासी मयूर बोरीकर हा युवक गेल्या अनेक महिन्यांपासून कर्करोगासारख्या दुर्धर आजाराशी झुंज देत आहे. घरातील एकमेव कर्ता व्यक्तीच गंभीर आजाराने त्रस्त झाल्याने कुटुंबावर उपचारासाठी कर्जबाजारी होण्याची वेळ आली आहे. वृद्ध आईला आजारी मुलाची देखभाल करताना मोठ्या आर्थिक व मानसिक संकटाला सामोरे जावे लागत आहे.

या कुटुंबाची परिस्थिती 'थोडंसं जगणं समाजासाठी' या उपक्रमाच्या माध्यमातून सामाजिक कार्यकर्ते गुणवंत पचारे यांना समजली.त्यांनी तत्काळ पुढाकार घेत बोरीकर यांच्या घरी जाऊन रुग्णाच्या आईच्या हाती ११ हजार ११६ रुपये रोख मदत सुपूर्द केली. तसेच मयूरच्या उपचारादरम्यान कुटुंबाला आधार मिळावा यासाठी महिनाभराचा सकस किराणा व अन्नधान्य देण्यात आले. या मदतीमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या बोरीकर कुटुंबाला काहीसा दिलासा मिळाला आहे.गरजू व निराधार रुग्णांना सामाजिक बांधिलकीतून मदतीचा हात देण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले. याप्रसंगी सेवामंडळाचे मारोतराव ठेंगणे,ज्ञानेश्वर कडुकर,पुंडलिक धोबे, सुनीता ढेंगळे,वनमाला पेंदोर, अनिता इखारे,मनोज ढेंगळे, किरणताई कुत्तरमारे,अरविंद महातळे तसेच निंबाळा येथील ग्रामस्थ उपस्थित होते.

# दुष्काळाची झळ, यवतमाळचे सर्व १६ तालुके 'ट्रिगर-१'मध्ये

## जमीन महसुलापासून पीक कर्ज पुनर्गठनापर्यंत सवलती,पीक नुकसानीची मदत स्वतंत्र निर्णयाने

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २७ :** कोरड्या दुष्काळसदृश परिस्थितीची तीव्रता लक्षात घेता यवतमाळ जिल्ह्यातील सर्व १६ तालुक्यांचा 'ट्रिगर-१' (प्रथम कळ) मध्ये समावेश करण्यात आला आहे. पालकमंत्री ना. संजय राठोड यांच्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी विकास मीना, जिल्हाधिकारी कार्यालय आणि कृषी विभागाने शासनाकडे सादर केलेल्या अहवालाच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे पावसाअभावी अडचणीत सापडलेल्या



शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण भागाला विविध सवलतींचा आधार मिळणार आहे. राज्याच्या मदत व पुनर्वसन विभागाने २५ सप्टेंबर २०२६ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार राज्यातील २६५ 'ट्रिगर-१' तालुक्यांसाठी विशेष उपाययोजना लागू करण्यात आल्या आहेत. यामध्ये यवतमाळ, बाभूळगाव, कळंब, दारव्हा, दिग्रस, आर्णी, नेर, पुसद, उमरखेड, महागाव, वणी, मारेगाव, झरी-जामणी, केळापूर, घाटंजी आणि राळेगाव या सर्व तालुक्यांचा समावेश आहे. या निर्णयामुळे जमीन महसुलात सूट, पीक कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी संबंधित कर्जवसुलीस स्थगिती आणि कृषी पंपांच्या चालू वीजबिलात सवलत मिळणार आहे. तसेच शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी, रोजगार हमीची अधिकाधिक कामे सुरू करणे, गरजेनुसार पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची व्यवस्था, कृषी पंपांची वीज जोडणी खंडित न करणे, अन्नधान्याचा पुरवठा, जनावरांसाठी चारा, जलसंधारणाची कामे तसेच पिण्याचे आणि पशुधनासाठी पाण्याचे नियोजन करण्याच्या उपाययोजना लागू करण्यात आल्या आहेत. मात्र पीक नुकसानीची आर्थिक मदत अद्याप स्वतंत्र शासन निर्णयाच्या प्रतीक्षेत आहे. त्यामुळे ट्रिगर-१मुळे सवलतींचा मार्ग मोकळा झाला असला, तरी प्रत्यक्ष पीक नुकसानीच्या भरपाईसाठी शेतकऱ्यांना आणखी निर्णयाची प्रतीक्षा करावी लागणार आहे. दुष्काळाची झळ वाढत असताना शासनाच्या या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी होणे आता तितकेच महत्त्वाचे ठरणार आहे.

# पालक-शिक्षक संवादातून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्याचा संकल्प

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**झरी, दि. २७ :** गुरुकुल कॉन्व्हेंट विद्यालयात पालक सभा उत्साहात मुकूटबन येथील गुरुकुल कॉन्व्हेंट विद्यालयात शनिवारी पालक सभेचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन



करण्यात आले. विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, कलागुण, आत्मविश्वास, शिस्त व सामाजिक जाणीव विकसित करण्यासाठी शाळेत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती पालकांना देण्यात आली. पालकांनी शिक्षकांशी विद्यार्थ्यांच्या प्रगतीबाबत संवाद साधत विविध सूचना मांडल्या. पालक व शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या विकासाचे महत्त्वाचे आधारस्तंभ असून, त्यांच्या समन्वयातून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्याची पायाभरणी होते, असा संदेश यावेळी देण्यात आला. सभेनंतर पालकांनी वर्गशिक्षकांकडून विद्यार्थ्यांचे प्रगतीपत्रक पाहिले. पालकांचा उत्स्फूर्त सहभाग आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे सभा अर्थपूर्ण व प्रेरणादायी ठरली.

# 'निष्काम सेवा हीच राष्ट्रनिर्मितीची खरी ताकद'

## विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी आणि सेवाभाव जोपासावा - प्रा. गजानन जाधव

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. २७ :** विद्यार्थ्यांच्या विचारांना सेवाभावी कृतीची जोड मिळाली, तरच सक्षम राष्ट्राची उभारणी शक्य आहे. निस्वार्थ भावनेने केलेली सेवा हीच राष्ट्रनिर्मितीचा भक्कम पाया असल्याचे प्रतिपादन श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय, पुसद येथील अर्थशास्त्राचे प्राध्यापक तथा राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा. गजानन जाधव यांनी केले.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत आसरपेंड येथील अनुसूचित जाती मुलींच्या शासकीय निवासी शाळेत २६ सप्टेंबर रोजी 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत 'राष्ट्रविकासात विद्यार्थ्यांची भूमिका' या विषयावर



वैचारिक प्रबोधन कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. जाधव बोलत होते. विद्यार्थी जीवनात विचार आणि कृतीचा संगम घडणे आवश्यक आहे. जिद्द, चिकाटी, आत्मविश्वास आणि निष्ठेने अभ्यास केल्यास ध्येय निश्चित गाठता येते. तसेच संगतही व्यक्तिमत्त्व आणि यशावर परिणाम करणारी महत्त्वाची बाब आहे. देशाला तुमची गरज आहे, त्यामुळे स्वतःमधील सामर्थ्य ओळखा आणि सेवाभावी वृत्ती जोपासा, असे आवाहन त्यांनी विद्यार्थिनींना केले. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक सविता घरजारे (ठाकरे) होत्या. प्रारंभी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविक चव्हाण यांनी केले. सूत्रसंचालन श्रेया गडदे व श्रद्धा धबाले यांनी, तर आभार विशाखा वाघमारे हिने मानले. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# दिग्रस-आर्णी सिमेंट रस्त्याच्या कामातील जुन्या मटेरियलवर सवाल..

## मुरूम, डांबरमिश्रित गिट्टीची कथित परस्पर विल्हेवाट अधिकृत हिशोब जाहीर करण्याची नागरिकांची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**दिग्रस , दि. २७ :** दिग्रस शहरातील मानोरा चौक, शिवाजी चौक ते लाटीवाला पेट्रोल पंप या मुख्य मार्गावर सुरू असलेल्या सिमेंट कॉंक्रिटीकरणाच्या कामातून निघणाऱ्या जुन्या रस्त्याच्या मटेरियलच्या विल्हेवाटी वरून प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



जुने डांबरीकरण खोदून काढल्यानंतर निघणारा मुरूम व डांबर मिश्रित गिट्टी मोठ्या प्रमाणात परस्पर विक्री अथवा विल्हेवाट लावली जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. हा प्रकार गेल्या सहा महिन्यांपासून सुरू असल्याचा दावा स्थानिक नागरिकांनी केला असून, रस्त्याच्या कामातून निघालेल्या साहित्याचा नियमानुसार अधिकृत हिशोब ठेवणे आवश्यक असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. जेसीबी व टिप्परच्या माध्यमातून हे साहित्य रात्री-अपरात्री विविध ठिकाणी नेले जात असल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे. या हालचाली सीसीटीव्ही कॅमेऱ्यांत कैद झाल्याचा दावा करण्यात आला आहे. या प्रकरणाची चौकशी करून जुन्या मटेरियलचे प्रमाण, त्याची विल्हेवाट, वाहतूक आणि विक्रीचा अधिकृत हिशोब सार्वजनिक करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. दोष आढळल्यास संबंधित व्यवस्थापक, ठेकेदार व जबाबदार व्यक्तींवर नियमानुसार कारवाई करावी, अशीही मागणी आहे. दरम्यान, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही. त्यांची अधिकृत प्रतिक्रिया प्राप्त झाल्यानंतर ती प्रसिद्ध करण्यात येईल.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त

### शिव गणेशोत्सव मंडळाचे विसर्जन मिरवणूक



**अमरावती-**श्री शिव गणेशोत्सव मंडळ महेंद्र कॉलनी वर्ष ३४ वे दरवर्षी प्रमाणे यंदाही नगरातील सर्व गणेश भक्तांनी महाप्रसाद घेतला. मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत भुयार, सचिन सगणे, अक्षय चरहाटे, सुरज खवले, ओम बरडे, शंतनु मोहोड, अजिंक्य वानखेडे, सार्थक माहोरे, आयुष खेडकर, आदेश टेकाडे, प्रशांत महल्ले, विक्की पवाळ, मनीष टाले, अंकुश जवजाळ, राहुल खंडारे, सारंग वानखडे, राहुल कोंडे, ओम वाळोणकर, संदीप भुयार, नीलेश महल्ले, गोपाल तायडे, जय कीलोर, समर्थ ठाकरे, जय अतीलकर, प्रथमेश बनकर, दर्शन मानकर, अभिषेक चागोले व नगरसेवक धीरज हिंवसे, राजश्री जठाळ, माधुरी ठाकरे हे सर्व उपस्थिती होते. २७ सप्टेंबर रोजी सध्याकाळी ६ वाजता विसर्जन मिरवणूक काढण्यात येणार आहे तरी सर्व भाविकांनी उपस्थित राहावे.



### विकास विद्यालयात आपत्ती व्यवस्थापन मार्गदर्शन कार्यक्रम

**अमरावती-**स्थानिक विलास नगर स्थित विकास विद्यालयामध्ये महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग व जिल्हा परिषद शिक्षण अधिकारी (माध्यमिक) अमरावती यांच्या आदेशानुसार आनंददायी शनिवार उपक्रमांतर्गत 'आपत्ती व्यवस्थापन मार्गदर्शन कार्यक्रम झाला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विद्यालक्ष्मी मराठी प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका देशमुख,तर प्रमुख अतिथी म्हणून विद्यालयातील शिक्षक डी. एस. चव्हाण उपस्थित होते. राष्ट्रीय व्यवस्थापन प्रशिक्षण मुंबई यांचे प्रमुख मार्गदर्शक मोहम्मद शाहिद अली यांनी आपत्ती व्यवस्थापन आपत्ती व्यवस्थापनाबाबत उपस्थित विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. आपत्तीचे महत्त्वाचे तीन प्रकार तसेच आपत्तीप्रसंगी घ्यावयाची काळजी, आपत्तीनंतर करावयाची उपायोजना इत्यादी विषयांवर मार्गदर्शक मोहम्मद शाहिद अली यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. याप्रसंगी विद्यालयातील शिक्षक डी. एस. चव्हाण यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकाच्या माध्यमातून आलेल्या आपत्ती व्यवस्थापनाच्या विविध अभ्यासक्रमांची ओळख करून दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्ष श्रीमती देशमुख मॅडम यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना अचानकपणे निर्माण झालेल्या आपत्तीची कशाप्रकारे काळजी घेतली पाहिजे याबाबतीत दैनंदिन जीवनातील विविध उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांना याबाबतचे महत्त्व पटवून दिले. या उपक्रमाकरिता विद्यालयातील वर्ग पाच ते दहा चे सर्व विद्यार्थी, शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यालक्ष्मी प्राथमिक मराठी शाळेचे सर्व शिक्षक वृंद मोठ्या संख्येत उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता विद्यालयातील सांस्कृतिक समितीने अथक परिश्रम घेतले.



### पोटे पाटील कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये 'एनएसएस स्थापना दिवस'

**अमरावती-**पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ फार्मसी येथे राष्ट्रीय सेवा योजनेचा (NSS) स्थापना दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने पर्यावरण संवर्धन, समाजसेवा आणि युवा आरोग्यावर आधारित विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. मुकुल मोरया, संचालक प्रोक्लिन रिसर्च प्रायव्हेट लिमिटेड, भोपाळ, यांच्या 'पर्यावरणीय शुद्धता आणि स्वच्छता' या विषयावरील विशेष व्याख्यानाने झाली. यामध्ये विद्यार्थ्यांनी निसर्गाचा समतोल राखण्यासाठी व पर्यावरणपूरक सवयी अंगीकारण्यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन करण्यात आले. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे 'शपथ ग्रहण सोहळा'. एनएसएसच्या स्वयंसेवकांनी 'माझ्यासाठी नाही, तर तुमच्यासाठी' (Not Me, But You) या ब्रीदवाक्याचे पालन करत समाजसेवेची अधिकृत शपथ घेतली. विद्यार्थ्यांच्या सहभागाला वाव देण्यासाठी केंद्र सरकारच्या 'माय भारत' (MY Bharat) पोर्टलवर ऑनलाइन क्विझ स्पर्धेचे नोंदणीकरण व आयोजन करण्यात आले, ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने भाग घेतला. हा संपूर्ण कार्यक्रम सर्व प्राध्यापक वृंदांच्या उपस्थितीत पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ. ए. आर. जयस्वाल आणि एन. एच. वरंदानी यांनी प्राचार्य डॉ. डी. बी. रुईकर यांच्या मार्गदर्शनाखाली केले.



### 'सेवा संकल्प यात्रेचे' स्वागत

**आसेगाव पूर्णा-**गुजरातमधील वडनगर ते उत्तर प्रदेशातील वाराणसीदरम्यान काढण्यात येत असलेल्या 'सेवा संकल्प यात्रेचे' आसेगाव पूर्णा बसस्थानक येथे भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून उत्साहात स्वागत करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मुख्यमंत्री व पंतप्रधान म्हणून सार्वजनिक जीवनातील २५ वर्षांच्या लोकसेवेचा कार्यकाळ पूर्ण झाल्याचे औचित्य साधून तसेच त्यांच्या जन्मदिनानिमित्त राष्ट्रव्यापी 'सेवा संकल्प अभियान' सुरू करण्यात आले आहे. मोदी यांची जन्मभूमी वडनगर ते कर्मभूमी वाराणसी असा या यात्रेचा प्रवास आहे. भारतीय जनता युवा मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. हेमांगजी जोशी यांच्या नेतृत्वाखाली ही यात्रा काढण्यात आली असून, १७ सप्टेंबर ते ७ ऑक्टोबर या कालावधीत विविध ठिकाणी तिचे आयोजन करण्यात आले आहे. आसेगाव पूर्णा येथे यात्रेच्या स्वागतासाठी भाजपचे जितेंद्र मस्कते, अनुज वाटाणे, सचिन भांगे, नंदू बोबडे, रोशन प्रजापती, विशाल कैतवास, बंडू नवले, सतीश मस्करे, प्रवीण कळसकर, सतीश बोबडे, टिकू धवे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# आठ कोटी रुपयांच्या रस्त्यानंतरही वाहतुकीचा प्रश्न कायम

## बुलूमगव्हाणमध्ये मोठ्या कार्यक्रमाने झाला होता शुभारंभ, आज एसटी बंद असल्याने ग्रामस्थांचा सवाल

**मेळघाट/वार्ताहर**

धारणी तालुक्यातील दुर्गम भागातील बुलूमगव्हाण गाव पुन्हा एकदा विकासकामांच्या मुद्द्यावर चर्चेत आले आहे. सन २०१७-१८ मध्ये बुलूमगव्हाण येथे विकासकामांच्या निमित्ताने मोठ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला तत्कालीन अमरावती जिल्हाधिकारी अभिजीत बांगर, धारणीचे उपविभागीय अधिकारी मोहन राठोड यांच्यासह प्रशासनातील अधिकारी, बांधकाम विभागाचे अधिकारी-कर्मचारी, पत्रकार तसेच परिसरातील जबाबदार नागरिक उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून बुलूमगव्हाणच्या विकासाबाबत मोठ्या अपेक्षा निर्माण झाल्या होत्या. ग्रामस्थांच्या माहितीनुसार, गावाला मुख्यालयाशी जोडण्यासाठी रस्त्याचे काम करण्यात आले. तसेच धारणी मुख्यालयातून पाटिया–हातनादा–काटकुंभवाण मार्गे बुलूमगव्हाणपर्यंत राज्य परिवहन महामंडळाची बससेवा सुरू करण्यात आली होती.

ग्रामस्थांच्या माहितीनुसार, बुलूमगव्हाण गावाच्या विकासासाठी दत्तक घेऊन विविध विकासकामांना गती देण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. मोठ्या कार्यक्रमामुळे गावातील नागरिकांमध्ये विकासाबाबत नव्या अपेक्षा निर्माण झाल्या होत्या.



ग्रामस्थांच्या माहितीनुसार, पाटिया–हातनादा–काटकुंभवाण मार्गे बुलूमगव्हाणपर्यंत सुरू करण्यात आलेली एसटी बससेवा सध्या बंद आहे. त्यामुळे मुख्यालयात ये-जा करण्यासाठी ग्रामस्थांना पुन्हा खासगी वाहनांवर अवलंबून राहावे लागत आहे.

दुसरीकडे, ग्रामस्थांच्या माहितीनुसार पाटिया–हातनादा–काटकुंभवाण ते बुलूमगव्हाण या रस्त्याच्या कामासाठी सुमारे आठ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. एवढ्या मोठ्या निधीतून रस्ता तयार करण्यात आला असेल, तर त्या रस्त्यावरून सुरू करण्यात आलेली एसटी बससेवा बंद का करण्यात आली, असा सवाल उपस्थित होत आहे.

याशिवाय दूरध्वनी सेवेची सद्यस्थिती काय आहे, याबाबतही संबंधित विभागाने स्पष्ट माहिती द्यावी, अशी मागणी होत आहे. २०१७-१८ मध्ये झालेल्या त्या कार्यक्रमाला जिल्हास्तरीय अधिकारी, बांधकाम विभागाचे अधिकारी-कर्मचारी आणि इतर जबाबदार व्यक्ती उपस्थित होत्या. त्यामुळे त्या वेळी सुरू करण्यात आलेल्या विकासकामांची सद्यस्थिती प्रशासनाने तपासावी, अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त केली जात आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित विभागांकडून संपूर्ण अहवाल मागवावा, अशी ग्रामस्थांची मागणी आहे. राज्य परिवहन विभागाकडून बुलूमगव्हाण बससेवा कधी सुरू झाली, किती दिवस चालली, कोणत्या कारणामुळे बंद झाली आणि ती पुन्हा सुरू करण्याबाबत काय नियोजन आहे, याची माहिती जाहीर करावी. तसेच बांधकाम विभागाने रस्त्याच्या कामासाठी मंजूर निधी,प्रत्यक्ष खर्च, कामाची सद्यस्थिती आणि रस्त्याचा वापर याबाबतही माहिती द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. २०१७-१८ मध्ये मोठ्या कार्यक्रमातून बुलूमगव्हाणच्या विकासाची सुरुवात झाली; मात्र आज ग्रामस्थांना त्याच विकासकामांच्या पुढील वाटचालीबाबत प्रशासनाकडे प्रश्न विचारावे लागत आहेत. आता ग्रामस्थांना केवळ आश्वासन नको असून, एसटी बससेवा का बंद झाली आणि कोट्यवधी रुपये खर्च झालेल्या रस्त्याचा अपेक्षित लाभ नागरिकांना का मिळत नाही.

# अ.भा.ग्राहक पंचायत तालुका कार्यकारिणी गठीत



**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

अखिल भारतीय ग्राहक पंचायत ही शोषणमुक्त ग्राहक हे उद्दिष्ट घेऊन राष्ट्रीय स्तरावर निःस्वार्थ कार्य करणारी ख्यातीप्राप्त संघटना म्हणून सर्वदूर प्रसिद्ध आहे. दत्त इंडियन गॅस एजन्सी चे संचालक जितेन्द्रजी गोरे यांनी आयोजित केलेल्या सभेमध्ये चांदुर रेल्वे तालुका अध्यक्ष म्हणून निवड झालेल्या प्रदीपजी लाकडे यांच्या मार्गदर्शनात सर्व नवीन समिती ग्राहकांच्या स्थानिक समस्यांना वाचा फोडून संघटनेचा कार्यविस्तार करतील अशी खात्री आहे असे प्रतिपादन संघटनेचे विदर्भ प्रांत सचिव चारुदत्त चौधरी यांनी केले.याप्रसंगी व्यासपीठावर ग्राहक पंचायतचे अमरावती जिल्हा अध्यक्ष अशोकजी हांडे, जिल्हा सहसचिव अनिलजी वानखडे, ज्येष्ठ कार्यकर्ते प्रा.डॉ. संतोषजी सदार आणि चांदुर रेल्वे तालुका अध्यक्ष प्रदीपजी लाकडे यांची विशेष उपस्थिती होती.

प्रा. डॉ. संतोषजी सदार यांनी सांगितले की ग्राहक संरक्षण कायदा १९८६ हा ग्राहक पंचायत मुळेच अस्तित्वात आला आणि ग्राहकांना विविध अधिकार त्याद्वारे प्राप्त झालेत.

आपल्या प्रास्ताविक भाषणात प्रदीप लाकडे यांनी विविध विभागांमध्ये ग्राहकांना होणारा मनस्ताप सोदाहरण स्पष्ट केला.या बैठकीत चांदुर रेल्वे तालुका अध्यक्ष म्हणून प्रदीपजी लाकडे सेवानिवृत्त फॉरेस्ट ऑफिसर यांची एकमताने निवड झाली.तसेच तालुका उपाध्यक्ष म्हणून ओंकारजी लादे आणि तालुका सचिव म्हणून प्रल्हादजी उमप यांची नियुक्ती झाली तसेच प्रसिद्धी प्रमुख म्हणून एम.बि. न्यूज चॅनेल चे संपादक मंगेश बोबडे यांची एकमताने निवड करण्यात आली.

आपल्या अध्यक्षीय भाषणात जिल्हा अध्यक्ष अशोकजी हांडे यांनी सांगितले की संघटनेची जिल्ह्यातील ही अकरावी शाखा असून सर्वदूर कार्यकर्ते ग्राहक हितार्थ प्रचंड कार्य करीत आहेत.या कार्यक्रमाला धामणगाव रेल्वे तालुका अध्यक्ष सुभाषजी देशमुख, उपाध्यक्ष प्रदीप कडू आणि सचिव शंकर कुर्वे,मंगेश बोबडे यांची विशेष उपस्थिती लाभली होती.सुभाष देशमुख यांनी कुटुंबातील संस्कार वाढावेत अशी अपेक्षा आपल्या भाषणातून केली.

कार्यक्रमाचे संचालन प्रल्हाद उमप यांनी केले तर प्राध्यापक पुतळे यांनी आभार केले. जिल्हा सहसचिव अनिल वानखडे यांनी सर्व प्रमुख अतिथिंचा परिचय करून दिला.सभेला खालील सभासद रमेश राऊत,दिलीप राऊत, जितेंद्र गोरे,भास्कर गावंडे,निळकंठ सोरगिरकर जीवकर,अनिल गावंडे, दिगांबर डुबे,अनंत कडूकर,इत्यादी उपस्थित होते.अखिल भारतीय ग्राहक पंचायतची तालुका कार्यकारिणी स्थापन झाल्याबद्दल सर्व नवनियुत पदाधिकार्याचे अभिनंदन केले.

# अप्पर वर्धा धरणातील नवीन पाणीउपशाचा पुनर्विचार करा-विपुल भडांगे

**मोर्शी/वार्ताहर**

अप्पर वर्धा धरणातून अमरावती शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी प्रस्तावित नवीन १४०० मिमी पाईपलाईनद्वारे होणाऱ्या पाणीउपशाचा मोर्शी तालुक्यातील शेती व पिण्याच्या पाण्यावर होणारा परिणाम लक्षात घेऊन प्रशासनाने तातडीने पुनर्विचार करावा,अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.

मोर्शी तालुक्यातील परिसरातील शेतकरी व नागरिक अप्पर वर्धा धरणाच्या पाण्यावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहेत. पावसाचे अनिश्चित प्रमाण, भूजलपातळीत झालेली घट आणि शेतीसमोरील वाढते जलसंकट यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंता निर्माण झाली आहे.अनेक भागांतील विहिरींची पाणीपातळी खालावली असून संत्रा,कापूस व तूर यांसारख्या प्रमुख पिकांसाठी आगामी काळात पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

अमरावती शहराला पाणीपुरवठा करण्यास विरोध नसल्याचे स्पष्ट करताना,स्थानिक शेतकरी व नागरिकांच्या पाण्याच्या गरजेचा शास्त्रीय आणि न्याय्य विचार करूनच धरणातील पाण्याचे नियोजन करण्यात यावे,अशी मागणी करण्यात आली आहे.याशिवाय नवीन पाणीउपसा सुरू करण्यापूर्वी मोर्शी तालुक्यातील भूजलपातळी, शेती आणि पिण्याच्या पाण्यावर होणाऱ्या परिणामाचा स्वतंत्र अहवाल तयार करावा.शेतकऱ्यांसाठी सिंचनाच्या पाण्याची हमी व स्वतंत्र पाणी नियोजन करावे, गावनिहाय विहिरींच्या पाणीपातळीचा सर्वे करून अहवाल जाहीर करावा,तसेच लोकप्रतिनिधी, शेतकरी प्रतिनिधी आणि नागरिकांची बैठक घेऊन त्यांचे म्हणणे नोंदवावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.



मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय न झाल्यास लोकशाही मार्गाने उपोषण व तीव्र आंदोलन सुरू करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. 'मोर्शीच्या शेतकऱ्याला पाणी मिळालेच पाहिजे आणि अप्पर वर्धा धरणातील पाण्याचे न्याय्य व पारदर्शक नियोजन झालेच पाहिजे,' अशी भूमिका 'आधी मोर्शीच्या शेतकऱ्यांचा पाण्याचा प्रश्न सोडवा, मगच धरणातून पाणी बाहेर न्या!' अप्पर वर्धा धरणातून अमरावतीकडे होणाऱ्या नवीन १४०० मिमी पाईपलाईनद्वारे पाणीउपशाचा पुनर्विचार करून मोर्शी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पाण्याची हमी द्यावी, अशी मागणी विपुल नामदेवराव भडांगे, महाराष्ट्र प्रदेश सचिव, काँग्रेस कमिटी यांनी केली.निवेदनातून मांडण्यात आली आहे.

# मतदान हा लोकशाहीचा अत्यंत महत्त्वाचा आधार-बळवंत अरखराव

**परतवाडा-** वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांमध्ये मतदान प्रक्रियेविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने महाविद्यालयाच्या योगा हॉलमध्ये 'मतदार जनजागृती कार्यशाळे'चे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत अचलपूरचे उपविभागीय अधिकारी श्री. बळवंत अरखराव तसेच नायब तहसीलदार श्री. पोटे यांनी उपस्थितांना मतदार म्हणून असलेल्या जबाबदाऱ्या, मतदानाचे महत्त्व आणि लोकशाही प्रक्रियेतील नागरिकांच्या सहभागाबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल खांडेकर होते. प्रमुख उपस्थिती म्हणून प्रा. डॉ. प्रमोद गारोडे उपस्थित होते.कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्रा. डॉ. प्रमोद गारोडे यांनी मतदार जनजागृतीची आवश्यकता स्पष्ट केली. त्यांनी सांगितले की, मतदान हा केवळ अधिकार नसून लोकशाही व्यवस्थेतील नागरिकांची महत्त्वाची जबाबदारी आहे. यावेळी मार्गदर्शन करताना उपविभागीय अधिकारी श्री. बळवंत अरखराव



यांनी मतदान हा लोकशाहीचा अत्यंत महत्त्वाचा आधार असल्याचे सांगितले. प्रत्येक पात्र नागरिकाने आपले नाव मतदार यादीत असल्याची खात्री करून घेणे आणि मतदानाच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावणे गरजेचे आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. अनिल खांडेकर यांनी अध्यक्षीय मनोगतात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी अशा जनजागृतीपर उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.मतदार जनजागृतीचा संदेश महाविद्यालयाच्या माध्यमातून समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.कार्यक्रमाचे संचालन प्रा. प्रीती नवरे यांनी केले.

त्यांनी कार्यक्रमातील विविध मान्यवरांचा परिचय करून देत कार्यशाळेचा उद्देश उपस्थितांसमोर स्पष्ट केला. कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. डॉ. प्रिया सगणे यांनी उपस्थित मान्यवर, प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे आभार मानले.या मतदार जनजागृती कार्यशाळेला महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी,बी एल ओ तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यशाळेच्या माध्यमातून उपस्थितांमध्ये मतदानाचे महत्त्व, मतदार म्हणून असलेली जबाबदारी आणि लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग याबाबत जागरूकता निर्माण झाली.

## जिल्ह्यात दुष्काळाबाबत शेतकऱ्यांनी दिलेल्या प्रतिक्रीया

# पंचनाम्यांच्या निकषावर आर्थिक निकसाची शक्यता?

**चांदूरबाजार/वार्ताहर**

अखेर २५ सप्टेंबरच्या शासन निर्णयानुसार राज्य शासनाने, प्रथम कळ शिकवा नुसार दुष्काळ जाहीर केला आहे.यात राज्यातील २६५ तालुक्यांचा समावेश आहे.शासन निर्णयानुसार दुष्काळ यादीत अमरावती जिल्ह्याचा समावेश असून,यात जिल्ह्यातील १४ ही तालुके समाविष्ट आहेत.दुष्काळाच्या घोषणे सोबत राज्यात सरकारने शेतकऱ्यांसाठी, १२ सवलती जाहीर केल्या आहेत. आर्थिक मदती व्यतिरिक्त शेतकऱ्यांना, दुष्काळग्रस्त म्हणून या प्रमाणे सवलती मिळणार आहेत.



दुष्काळाने होरपळलेल्या शेतकऱ्यांना हेक्टरची मर्यादा न ठेवता कोरडवाहू पिकांसाठी, सरसकट हेक्टरी ५०,००० हजार रुपये मदत देण्यात यावी.दुष्काळाची झळ लहान किंवा मोठ्या शेतकऱ्यांना समान बसली आहे. वारंवारची अतिवृष्टी व यंदाच्या दुष्काळामुळे, शेतकऱ्यांचे आर्थिक कंबरडे मोडले आहे. यंदाच्या दुष्काळामुळे शेतकरी, पुढील तीन वर्षे आर्थिक संकटात राहणार आहे.तेव्हा दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत देताना,सरकारचे हात आखडता घेतला घेऊ नये.

**स्वप्निल देशमुख,**
शेतकरी गणोज

मुख्यमंत्र्यांनी स्वतः शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन, दुष्काळाची भीषणता अनुभवली.तातडीने दुष्काळ जाहीर केला.ही समाधानाची बाब आहे. आता पिक नुकसानीची मदत जाहीर करतांना, शासनाने हात आखडता घेऊ नये.कोरडवाहू पिकासाठी हेक्टरी ५० हजार रुपये,तर संत्रा फळ पिकांसाठी हेक्टरी १ लाख २५ हजार रुपये मदत जाहीर करावी.

**संतोष किटुकले,**
शेतकरी फुबगांव.

शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेऊन,अखेर शासनाने दुष्काळ जाहीर केला आहे.आता शासनाने शेतकऱ्यांच्या आर्थकि मदत देताना हात आखडता घेऊ नये.शेतकर्यांना भरीव आर्थिक मदत करावी.इतर सवलती शासनाने जाहीरच केलेल्या आहेत.

**प्रफुल्ल नवघरे,**
शेतकरी वणी (बेलखेड)

राज्य सरकारने दुष्काळ जाहीर करतांना,नरो वा की कुंजरोची भूमिका घेतली आहे.दुष्काळ जाहीर केला.सवलतींची घोषणा केली.जातील बर्याच सवलती आधीच जाहीर केल्या होत्या. दुष्काळ जाहीर करतांना शासनाने पिक नुकसानी बाबत ची,आर्थिक मदत मात्र गुलदस्त्यात ठेवली आहे.पंचनाम्या नंतर आर्थिक मदतीचा निर्णय घेतला जाणार आहे.त्यामुळे भरीव आर्थिक मदत मिळण्याबाबत शेतकरी शासंक आहेत.

**प्रकाश ठाकरे,**
शेतकरी, कोंडवर्धा

# नवीन व्यवसाय उभारण्यासाठी युवकांनी पुढे यावे

## नगराध्यक्ष प्रा. विश्वकर्मा यांचे आवाहन

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

शहराच्या विकासाला गती देण्यासाठी केवळ मोठे उद्योगच नव्हे, तर युवकांनी सुरू केलेले छोटे-मोठे व्यवसायही महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे चांदूर रेल्वे शहरात नवनवीन व्यवसाय उभारण्यासाठी युवकांनी पुढे यावे. व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रशासकीय प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी नगर परिषद प्रशासनाकडून सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल, असे प्रतिपादन नगराध्यक्ष प्रा. प्रियंका निलेश विश्वकर्मा यांनी केले.



नवीन व्यवसाय सुरू करण्यापूर्वी बांधकाम परवानगी, ना-हरकत प्रमाणपत्र तसेच विविध विभागांशी संबंधित परवानग्या आणि प्रशासकीय कागदपत्रांची आवश्यकता असते. या प्रक्रियेमुळे अनेक युवक व्यवसाय सुरू करण्यापूर्वीच संभ्रमात पडतात. ही अडचण लक्षात घेऊन नगर परिषदेच्या स्तरावर आवश्यक असलेल्या विविध प्रक्रिया एकाच खिडकीतून उपलब्ध करून देण्याचा आणि त्या पूर्ण करण्यासाठी युवकांना सहकार्य करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे नगराध्यक्ष प्रा. विश्वकर्मा यांनी सांगितले. नवीन व्यवसाय सुरू करणाऱ्या युवकांना आवश्यक परवानग्या, प्रशासकीय प्रक्रिया आणि शक्य ते मार्गदर्शन एकाच ठिकाणी मिळावे, यासाठी नगर परिषद स्तरावर सकारात्मक पाऊले उचलण्याचा मानस नगराध्यक्षांनी व्यक्त केला.

# माहितीचा लक्षवेधी कायदा

**आपल्या देशात नागरिकांना उपलब्ध असलेल्या सर्वात महत्त्वाच्या म्हणजे माहितीचा अधिकार अधिनियम- २००५ या कायद्याविषयीच्या जनजागृतीसाठी २८ सप्टेंबर हा दिवस 'माहिती अधिकार दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. यानिमित्ताने या लक्षवेधी कायद्याविषयी थोडक्यात माहिती...**



माहितीचा अधिकार अधिनियम -२००५ हा कायदा आपल्या देशात अंमलात आल्यापासून मुलभूत मानवाधिकाराला महत्त्व प्राप्त झाले. पारदर्शकतेचे नवे पर्व सुरु झाले. या कायद्याला आता २१ वर्ष पूर्ण झाली असून अजूनही हा कायदा विकासप्रक्रीयेत अत्यंत महत्त्वाची आणि प्रभावशाली भुमिका बजावत आहे.

माहितीच्या अधिकाराबाबत सर्वप्रथम स्वीडन देशात १७६६ मध्ये 'फ्रीडम ऑफ प्रेस ॲक्ट' पारित करुन माहितीचा अधिकार सर्वप्रथम मान्य करण्यात आला. स्वीडननंतर अमेरिका, डेन्मार्क, फिनलँड, नॉर्वे, फ्रॉन्स, कॅनडा, स्पेन, जपान या देशांनी माहितीच्या अधिकाराचे कायदे केले. संयुक्त राष्ट्रसंघाने देखील त्यांच्या १९४८ च्या आमसभेच्या पहिल्या अधिवेशनात युनिव्हर्सल डिक्लेरेशन ऑफ ह्यूमन राईटसची घोषणा करुन नागरिकांना माहिती मिळवण्याचे स्वातंत्र्य हा मूलभूत मानवाधिकार असल्याचे आपल्या ठरावात संमत केले. अधिकाराने जगभर पारदर्शकतेचे नवे पर्व सुरु केले आहे. विविध देशात झालेल्या अशा कायद्यामुळे खुल्या शासन व्यवस्थेच्या प्रक्रियेला गती मिळत आहे. त्याचा एक भाग म्हणून २८ सप्टेंबर, २००२ मध्ये फ्रीडम ऑफ इन्फार्मेशन नेटवर्क या नावाने बल्गेरियामध्ये माहिती अधिकाराने भारलेल्या संघटना व कृतिगटांचे एक नवे कृतिशील संघटन जाळे उभारण्यात आले.

तेव्हापासून जगभर माहिती अधिकाराची जागृती वाढावी, तसेच या कायद्याच्या अंमलबजावणीतून विविध देशातील माहिती अधिकार कायद्यामुळे जगभर पारदर्शकतेचे नवे पर्व सुरु झाले व खुल्या शासन व्यवस्थेच्या प्रक्रियेला गती मिळाली. या कायद्याच्या अंमलबजावणीतून पारदर्शकता व उत्तरदायित्वाची संस्कृती गतीमान व्हावी, यासाठी व खुल्या शासन व्यवस्थेसाठीची बांधिलकी व्यक्त करण्यासाठी २८ सप्टेंबर हा जागतिक माहिती अधिकार दिन म्हणून साजरा केला जाऊ लागला. महाराष्ट्र शासनाने देखील २० सप्टेंबर, २००८ च्या शासन निर्णयानुसार २८ सप्टेंबर हा दिवस माहिती अधिकार दिवस घोषित केला असून माहितीचा अधिकार कायद्याविषयी जनजागृती व्हावी म्हणून या दिवशी व्यापक प्रमाणात उपक्रम राबविण्याचे निर्देश दिले आहेत.

### केंद्रीय माहिती कायदा

भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद १९ (१) (क) मध्ये भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यामध्येच माहितीचा अधिकार अंतर्भूत आहे म्हणूनच माहितीचा अधिकार हा मूलभूत अधिकार असल्याचे मत सर्वोच्च व उच्च न्यायालय यांनी भारतातील विविध न्यायनिवाड्यात व्यक्त केले आहे. भारतात केंद्रीय माहिती अधिकार कायद्याला १५ जून, २००५ रोजी राष्ट्रपतींची मान्यता मिळाली व कायद्यातील काही तरतुदी अंशत: लागू करण्यात आल्या. तर १२ ऑक्टोबर, २००५ पासून या कायद्याची अंमलबजावणी जम्मू काश्मीर राज्य वगळता संपूर्ण भारतात सुरु झाली.

### महाराष्ट्र माहितीचा अधिकार

केंद्रीय कायदा येण्यापूर्वीच ९ राज्यांनी माहितीचा अधिकार कायदा तसेच ३ राज्यांनी त्यासंबंधीचे विधेयके, कोड बनवण्यास सुरुवात केली होती. राजस्थानातील सामाजिक लेखापरिक्षणाच्या यशस्वी चळवळीपासून प्रेरणा घेऊन महाराष्ट्रामध्ये माहितीचा अधिकार कायदा-२००२ संमत करण्यात आला. या कायद्यासंदर्भात देश व आंतरराष्ट्रीय पातळीवर बदलत चाललेले वातावरण तसेच ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी आंदोलनाच्या माध्यमातून धरलेल्या आग्रहाखातर महाराष्ट्र शासनाने तज्ज्ञ समितीच्या शिफारशीनुसार २००२ मध्ये कायद्यात सुधारणा करुन त्याची प्रभावी अंमलबजावणी केली. माहिती अधिकार काही राज्यात पूर्वीपासून अंमलात होता. तथापि, माहिती अधिकाराचा कायदा पारित करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले.

### माहिती अधिकाराचा उद्देश

नागरिकांना आवश्यक असलेली माहिती पुरविणे, प्रशासनात शिस्त निर्माण करुन अधिकाऱ्यांच्या कार्यपध्दतीत व कार्यक्षमतेत वाढ करणे, शासन यंत्रणेतील व्यवहारात पारदर्शकता आणणे, भ्रष्टाचाराचे समूळ निर्मूलन व्हावे, प्रशासकीय कार्यपध्दती, नियम व इतर शासकीय कामांमध्ये गैरव्यवहारात वाव राहू नये, शासकीय कार्यपध्दतीबद्दल सामान्य जनतेला सांशकता वाटू नये व त्यांची कामे विनाविलंब, सहजगत्या व्हावीत यासाठी माहितीचा अधिकार या कायद्याची निर्मिती झाली.

### कायद्याची विशेषता

शासनाने आतापर्यंत केलेल्या सर्व कायद्यामागे जनतेचे हीत हाच मुख्य हेतू होता. परंतु इतर सर्व कायदे व माहितीच्या अधिकाराचा कायदा यात मुख्य फरक असा आहे की, हे सर्व कायदे जनतेने पाळावे या अपेक्षेसह शासकीय अधिकाऱ्यांकडून त्यावर देखरेख होत होती. या भुमिकेमुळे जनता दुय्यम ठरत होती. परंतु माहितीचा अधिकार या कायद्यामुळे सर्वसामान्य नागरिकाला संसद सदस्याच्या बरोबरीची माहिती प्राप्त करण्याचा अधिकार मिळाला आहे. प्रशासकीय अधिकारी, सार्वजनिक प्राधिकरण, शासकीय कर्मचारी आपले काम प्रामाणिकपणे करतात की नाही हे सर्वसामान्य व्यक्ती पाहू शकणार आहे तर जनतेच्या अपेक्षेला शासकीय अधिकारी पुरे पडतात का याचीही तपासणी शासनाला करता येणार आहे.

एखादी व्यक्ती जी माहिती मागेल त्याला ती माहिती ठराविक कालावधीत देण्याचे या कायद्यानुसार सार्वजनिक प्राधिकरणांवर बंधन असल्यामुळे शासकीय कारभार आपोआपच अधिकाधिक पारदर्शक बनत जाईल. त्यामुळे भ्रष्टाचार आपोआप कमी होऊन राज्यकारभार जनताभिमूख होईल, हेच या कायद्याचे सामर्थ्य आहे.

### कायद्यातील तरतुदी

कोणत्याही भारतीय नागरिकाला माहिती मागण्याचा अधिकार आहे. माहिती कोणत्या कारणासाठी हवी आहे, हे उघड करणे बंधनकारक नाही. माहिती मागण्यासाठी साधा अर्ज आणि दहा रुपये शुल्क, जीवित स्वातंत्र्य या संदर्भातील माहिती ४८ तासात देणे बंधनकारक आहे. सर्वसाधारण माहिती देणे अथवा नाकारणे यासाठी सर्वसाधारणपणे ३० दिवसाची मुदत, सहायक माहिती अधिकाऱ्यांकडे दाखल झालेल्या अर्जासाठी ३५ दिवस तर त्रयस्थ व्यक्तींचा संबंध येत असल्यास माहिती पुरवण्यासाठी ४० दिवसांची मुदत देण्यात आली आहे. विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्यास अथवा मिळालेल्या माहितीने समाधान न झाल्यास प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांकडे ३० दिवसात अपिल करता येईल. तेथूनही समाधान न झाल्यास राज्य माहिती आयोगाकडे ९० दिवसांच्या आत दुसरे अपील करता येते. विवक्षित गुप्तवार्ता व सुरक्षा संघटना, मानवी हक्कांचे उल्लंघन इत्यादींशी संबंधित माहिती देता येणार नाही.

जन माहिती अधिकारी म्हणून जिल्हा किंवा तालुकास्तरावर कोणतेही वेगळे कार्यालय नाही. शासनाने प्रत्येक कार्यालयात जन माहिती अधिकारी पदनिर्देशित केले आहेत. आपल्याला ज्या कार्यालयाशी संबंधित माहिती हवी आहे त्या प्रत्येक कार्यालयातील जनमाहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज सादर करावा. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हा संबंधित कार्यालयाच्या वरिष्ठ कार्यालयाचा अधिकारी असतो. द्वितीय अपिल दाखल करण्यासाठी शासनाने बृहन्मुंबई, कोकण, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, अमरावती आणि मुंबई या सर्व विभागीय मुख्यालयाच्या ठिकाणी आयोगाचे खंडपीठ स्थापन केले आहेत. माहिती आयुक्तांचा निर्णय हा दुसऱ्या अपिलानंतरचा अंतिम निर्णय राहील. या निर्णयाविरुध्द कोणत्याही कोर्टात दावा किंवा खटला दाखल करता येत नाही.

माहितीच्या अधिकाराविषयीचा अर्ज दाखल करताना हव्या असलेल्या माहितीचे वर्णन योग्य रितीने मांडले जाणे अतिशय महत्वाचे आहे. प्रश्नार्थक स्वरुपाची, कारणे विचारणारी माहिती, मुद्दा नसलेले किंवा गैरसमज उत्पन्न करणारे अर्ज फेटाळण्याची शक्यता अधिक असते. एका अर्जात एका विषयाशी संबंधितच माहिती विचारावी. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना ५० पृष्ठापर्यंतची माहिती मोफत देता येते. महाराष्ट्र शासनाने ई-गव्हर्नंन्सला नेहमीच महत्व दिले आहे. इलेक्ट्रॉनिक साधनाद्वारे माहिती मिळविण्याची इच्छा असलेल्या व्यक्ती व नागरिकांकडून आलेले अर्ज स्विकारण्यासाठी व संबंधित माहिती देण्यासाठी शासनाने www.rtionline.maharashtra.gov.in या नावाचे पोर्टल सुरु केले आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कायदा अंमलात आल्यापासून त्याचा वापर करणाऱ्यांची संख्या वाढतच असून या कायद्याचा प्रचार व प्रसार यातून नागरिकांना त्यांच्या हक्काची जाणीव होत आहे. कायद्याचा वापर करण्यात महाराष्ट्र देशात अव्वल आहे. अधिकाधिक लोकांनी या कायद्याचा वापर करावा हा शासनाचा उद्देश सफल होत असल्याचे दिसून येते. देशातील अनेक घोटाळे उघडकीस आणण्यामागचा शिल्पकार माहिती अधिकार कायदा आहे. सामाजिक परिवर्तनासाठी माहितीचा अधिकार म्हणजे एक शस्त्र आहे. याचा योग्य वापर व्हावा, ही अपेक्षा.

**अनिल आलुरकर**
उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय,
अमरावती

## त-ड-का

### पितृदेवाय नमो नमः

पूर्वजांचे आपणावरती
असे अनंत उपकार
शुद्ध अंतकरणाने आदरे
पितृपक्षी करावा सत्कार..

कृतज्ञता व्यक्त करता
ते मनी संतोषिती
आर्शिवाद मिळता तयांचा
जीवनी होतसे प्रगती..

ज्या तिथीस देह त्यागिला
पितृपक्षी बोलवावे
भोजनाला
पालन करता कुलाचारांचे
भवापिढीवरतीही संस्कार
घडतसे..



**प्रा.अशोक सारडा,**
मेहकर
९४२१३९४३३९

# गणेशोत्सव सरला, 'पीओपी' मूर्तीबाबत आताच धोरण ठरवा!

अनंत चतुर्दशीचा दिवस उजाडला की, गणरायाला निरोप देण्याची लगबग सुरू होते आणि त्याच वेळी विसर्जनामुळे जलस्रोतांवर होणाऱ्या परिणामाची चर्चाही पुन्हा ऐरणीवर येते. यंदाच्या गणेशोत्सवातही पीओपीच्या मूर्तीच्या वापराचा आणि विसर्जनाचा प्रश्न कायम राहिला. पीओपीच्या मूर्तीच्या वापरावर ऐनवेळी पूर्णपणे निर्बंध घालणे सरकारला शक्य झाले नाही. मूर्तिकारांनी आधीच मोठ्या प्रमाणावर मूर्ती तयार केल्या असल्याने उत्सवाच्या तोंडावर नियम बदलल्यास त्यांच्या व्यवसायावर आणि उपजीविकेवर परिणाम होण्याची शक्यता होती. त्यामुळे यंदाचा गणेशोत्सव सध्याच्या व्यवस्थेत पार पडला आणि २५ सप्टेंबरला अनंत चतुर्दशीनिमित्त गणेशमूर्तीचे विसर्जनही झाले. मात्र, पुढील वर्षी पुन्हा ऐनवेळी निर्णय घेण्याची वेळ येऊ नये, यासाठी पीओपीच्या मूर्तीबाबत आतापासूनच धोरण निश्चित करण्याची गरज आहे.

ओपीच्या मूर्तीच्या विसर्जनामुळे परिणामाचा मुद्दा नवा नाही. याच प्रश्नावर मुंबई उच्च न्यायालयात अनेक याचिका दाखल झाल्या असून, यंदाही त्यावर सुनावणी झाली. मोठ्या पीओपी मूर्तीचे नैसर्गिक जलस्रोतांमध्ये विसर्जन टाळण्यासाठी पर्यायी व्यवस्था करण्याची गरज न्यायालयाने अधोरेखित केली होती. मोठ्या मूर्तीचे प्रतीकात्मक विसर्जन करून त्यानंतर त्या निश्चित केलेल्या संकलन किंवा पुनर्वापर केंद्रांकडे नेण्याची सूचनाही चर्चेत आली.

मात्र, न्यायालयीन आदेश किंवा प्रशासकीय सूचना प्रत्येक वर्षी उत्सवाच्या तोंडावर नव्याने लागू करण्याची पद्धत कायम ठेवणे हा या प्रश्नावरचा कायमस्वरूपी उपाय ठरू शकत नाही. मोठ्या मूर्तीच्या संकलनाची जबाबदारी कोणाची असेल आणि पुनर्वापरासाठी कोणती यंत्रणा उभी केली जाईल, याबाबतची स्पष्टता नियमावलीत असायला हवी.यंदाच्या विसर्जनानंतर पुढील वर्षाच्या उत्सवापर्यंतचा कालावधी सरकारकडे आहे. या काळाचा उपयोग नियमावली, आवश्यक पायाभूत सुविधा आणि मूर्तिकारांसाठी संक्रमणाची व्यवस्था उभी करण्यासाठी केला, तर पर्यावरण संरक्षणाचा उद्देशही साध्य होईल आणि ऐन उत्सवाच्या तोंडावर निर्माण होणारा संभ्रमही टाळता येईल. गणेशोत्सव सरला आहे, आता पीओपीच्या मूर्तीबाबत निर्णय घेण्यासाठी पुढचा उत्सव येण्याची वाट पाहू नये.

**सुहास शेलार**

# उपकाराची फेड करावी जन्मीजन्मी ऋणी राहावे

सणासुदीचे दिवस आले. वातावरणात उत्साह भरला आणि बघता बघता बाजार मुर्त्यांनी सजला.काल अनंत चतुर्दशी झाली. दहा दिवसांच्या थाटामाटाचा समारोप झाला. आणि जड अंतकरणाने गणरायाला निरोप देण्यात आला.स्थापनेच्या वेळी अनेक इच्छांची माळ भाविकांनी त्याला घातली तर निरोपाअंती मनोकामनापूर्तीची अक्षदा वाहिली. ढोल, ताशांच्या गजरात वाजत गाजत मिरवणुका निघत आज बाप्पाला आणते वेळेचा जमाव पुन्हा जमला व दहा दिवसांचा काळ प्रत्येकाच्या डोळ्यासमोर तराळला. घरात येणारे बाप्पा असो की, मंडळाचा राजा उत्साह तो कमालीचाच. एकता, उत्साह पाहायला मिळतो तो या उत्सवांमधूनच.

निरागस बालरूपापासून ते विद्येची देवता साकारण्या पर्यंतच्या प्रत्येक रुपात भारावून टाकणारी ती सजावट, हृदयाला भिडणारा तो मूर्तीतील जिवंतपणा आणि त्याच्या कोणत्याही रूपात वाटणारी ती आत्मीयता सारेच काही डोळ्यांचे पारणे फिटावे असे. खरोखर सण ,उत्सवात उत्साह भरतो तो या मुर्त्यांमुळेच. निर्जीव मूर्तीत चैतन्याची फुंकर घालून, भक्ताला भावनिक ओढ लावणारा जादूगार म्हणजे ती घडविणारा मूर्तीकार. एरवी पाहिला कुणी हो देव? हे रूप दाखवणारा आत्म्याला परमात्म्याशी जोडणारा एकमेव दुवा म्हणजे मूर्तिकार आज नेहमी वाटणाऱ्या मूर्तिकाराविषयी कृतज्ञतेला लेखणीत उतरवावेसे वाटले.



पोटा पाण्याचा प्रश्न असला तरी मातीत जीव ओतणे सोपे नाही मुळीच . मातीच्या गोळ्याला नुसता आकार देऊन चालत नाही. मातीच्या गोळ्यापासून सुरू झालेला प्रवास मूर्तीची बैठक पार करून जेव्हा डोळ्यांच्या भावां पर्यंत पोहोचतो व बोलके हास्य मूर्ती निर्माण करते, तेव्हा त्या वेधक डोळ्यातून मानवी मनाशी संलग्न होणारे भाव व्यक्त करतांना मूर्तिकाराच्या कलेचा कस लागतो .त्यात खरी रंगत चढते ती लक्ष वेधणाऱ्या रंगांनी. माणिक,मोत्यांनी सजवलेली मूर्तीची बाह्यता सार काही नेमानं केलेल. स्वतःच्या सुखदुःखाच्या पलीकडे जाऊन.

दुसऱ्याच्या चेहऱ्यावर आनंदाचा, प्रसन्नतेचा, समाधानाचा भाव आणावा तेही केवळ एका मूर्तीतून मूर्तिकार मूर्ती विकतो खरा ;त्याचे मोलही आपण त्यांना देतो पण मोल त्या मूर्ती बनवण्यासाठी लागणाऱ्या साहित्याचे, मूर्ती घडवण्यासाठी लागलेल्या कदाचित वेळेचे,मेहनतीचे. पण...त्या मूर्तीशी जुळलेल्या कोट्यावधी भावनांचे, इच्छांचे, श्रद्धेचे,अपेक्षांचे कुठले हो मोल? ते मात्र होऊच शकत नाही.किंबहुना ते करोडो खर्च करणाऱ्या भक्कम वर्गणी दारांच्या देखील आवाक्यातील नाही.खरंतर हे एक सामाजिक ऋण आहे जे आपल्याला फेडणे शक्य नाही. आपली संस्कृती, परंपरा,श्रद्धा,माणुसकी जपण्याचे आणि मानवी मनाला जोडण्याचे पवित्र कार्य या मूर्तिकारांकडून घडत आहे.त्यांचे कार्य निश्चितच या शब्दांच्या पलीकडील आहे. म्हणून संत तुकाराम म्हणतात,'उपकाराची फेड करावी, जन्मोजन्मी ऋणी राहावे.कदाचित उपकाराची परतफेड आपण करू पण जन्मोजन्मी आपण ज्याच्या ऋणात राहू असा तो मूर्तिकार. मानवाला ईश्वर शक्तीची जोडणारा हा दुवा. या मूर्तिकारांकडून सिद्धीस जाणाऱ्या या कार्याप्रती कायम ऋणी राहून आपल्याला एक भाविक म्हणून शतशः नमन.


**- सपना रामदास शेरेकर**

# पितृपक्ष आणि पाणी

पाणी हे पूर्वजांनी आपल्याला दिलेल्या वारशाचे आणि आपण पुढच्या पिढीला द्यायच्या वारशाचे प्रतीक आहे. आज आपण अर्पण केलेले स्वच्छ जल उद्याच्या पिढ्यांना स्वच्छ नद्या, विहिरी आणि तलाव म्हणून मिळावे, हीच खरी पितृसेवा ठरेल. तर्पणाचे पाणी ओंजळीतून सोडताना मनात पूर्वजांविषयी कृतज्ञता आणि पाण्याविषयी जबाबदारी,या दोन्ही भावना असाव्यात.

मागच्याच आठवड्यात आपण महाराष्ट्रासह अख्खा देश जल दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर आहे, याकडे लक्ष वेधले जात असताना आता महाराष्ट्रात दुष्काळ जाहीर करण्याच्या हालचालींना वेग आलेला आहे. त्यातही नेमकी गोष्ट अशी की, दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर या वर्षीचा पितृपक्ष आला आहे.भारतीय संस्कृतीत पाणी म्हणजे केवळ तहान भागवणारा घटक नाही. ते जीवनाचा आधार, पवित्रतेचे प्रतीक आणि देवतास्वरूप मानले गेले आहे. म्हणूनच जन्मापासून मृत्यूपर्यंतच्या जवळपास प्रत्येक संस्कारात पाण्याचा सहभाग दिसतो.

पितरांचा उद्धार आणि पाणी यांचा सर्वात प्रसिद्ध संबंध गंगावतरणाच्या कथेत दिसतो. सगर राजाचे साठ हजार पुत्र कपिल मुनींच्या क्रोधाने भस्म झाले. त्यांना सद्गती मिळावी म्हणून वंशज पिढ्यान पिढ्या प्रयत्न करत राहिले. अखेर भगीरथाने कठोर तपश्चर्या करून गंगेला पृथ्वीवर आणले आणि तिच्या जलस्पर्शाने पूर्वजांचा उद्धार झाला. (वाल्मीकी रामायण, बालकांड, सर्ग ३८ ते ४४; भागवत पुराण, नववा स्कंध) या कथेचा अर्थ असा की, पूर्वजांसाठी केलेला प्रयत्न पिढ्यांच्या पलीकडेही सुरू राहतो आणि पाणी हे त्याचे माध्यम असते. तसेच आपण आणि आपले दिवंगत पूर्वज यांना जोडणारा भावनिक दुवा ठरते. भाद्रपद वद्य पक्षातील हा पंधरवडा म्हणजे पूर्वजांचे स्मरण करून त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा काळ आहे. पितृपक्षातील श्राद्धविधीची सुरुवातच स्नानाने होते. शरीर आणि मन शुद्ध करूनच पितरांचे स्मरण करावे, अशी परंपरा आहे. पाणी शुद्धता, शीतलता आणि प्रवाहीपणा यांचे प्रतीक आहे. ते मनातील कटुता धुवून टाकते आणि शांत, कृतज्ञ भावनेने कर्म करण्याची प्रेरणा देते. पंचमहाभूतांपैकी जल हे तत्त्व सर्वांना सामावून घेणारे आणि सर्वांना जगवणारे आहे. म्हणूनच पितरांप्रती तर्पणाच्या माध्यमातून श्रद्धा अर्पण करण्यासाठी पाण्याहून योग्य माध्यम नाही, असे मानले जाते.



'तर्पण' हा शब्द 'तृप' म्हणजे तृप्त करणे या धातूपासून आला आहे. हातात दर्भ आणि काळे तीळ घेऊन, पितरांचे नाव व गोत्र उच्चारून ओंजळीतून पाणी सोडले जाते. या जलांजलीने पितर तृप्त होतात, अशी श्रद्धा आहे. तर्पणाचा भावार्थ असा की, आपल्याला जे काही मिळाले ते पूर्वजांच्या कष्टांमुळे, त्यागामुळे आणि संस्कारांमुळे मिळाले. त्याची आठवण ठेवून पाणी आणि पिंडाचे दान करणे म्हणजे 'तुम्ही आमच्या स्मरणात आहात' हे सांगणे आहे. वस्तूंची किंमत या विधीत नसते. मनातील भाव हेच त्याचे खरे मोल असते. पिंडदानात शिजवलेला भात,काळे तीळ, तूप आणि पाणी यांपासून तयार केलेले पिंड पितरांना अर्पण केले जातात. पिंड हे देहाचे प्रतीक मानले जाते.पंचमहाभूतांतून निर्माण झालेला देह अखेर पुन्हा निसर्गात विलीन होतो, हा जीवनचक्राचा संदेश यातून मिळतो. त्यामुळे पिंडदान हे केवळ कर्मकांड नाही. ते मृत्यूकडे शांतपणे पाहण्याची, जन्म-मृत्यूच्या अखंड प्रवाहाची जाणीव करून देणारी एक साधना आहे. पूर्वी नदीकाठी, तीर्थक्षेत्री किंवा वाहत्या पाण्यात हे विधी करण्याची प्रथा रूढ झाली, ती याच प्रवाही जलाच्या पावित्र्यामुळे.

आज मात्र या श्रद्धेच्या आड एक गंभीर प्रश्न उभा राहिला आहे. पितृपक्षात नदीघाटांवर मोठी गर्दी होते. प्लास्टिकच्या पिशव्या, थर्माकोलचे द्रोण, निर्माल्य, रासायनिक रंग, वापरलेले कपडे आणि साबण-शाम्पू थेट नदीत जातात. ज्या पाण्याने पितरांना तृप्त करायचे,तेच पाणी आपल्या हातून दूषित होत असेल, तर हे विसंगत ठरते. दूषित नदी हा पूर्वजांच्या वारशाचा अपमानच आहे. कारण,अनेक पूर्वजांनी विहिरी खोदल्या, तळी बांधली, बारव उभारली आणि झाडे लावली. जलस्रोतांचे रक्षण हा त्यांचा संस्कार होता. यावर उपाय कठीण नाहीत. तर्पण घरच्या घरी तांब्याच्या किंवा पितळेच्या ताम्हणात करून ते पाणी नंतर तुळशीच्या किंवा झाडाच्या मुळाशी घालता येते. पिंड नदीत टाकण्याऐवजी गायीला, पक्ष्यांना किंवा मातीत विसर्जित करता येतात. पत्रावळी, केळीची पाने आणि मातीची भांडी वापरून प्लास्टिक व थर्माकोल टाळता येते. निर्माल्याचे खत करता येते. जिथे नदीकाठी विधी करावे लागतात,तिथे घाट स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी आपण स्वतः उचलू शकतो. श्राद्ध हा शब्द 'श्रद्धा' या मूळ धातूपासून आला आहे. श्रद्धा असेल, तर विधीचे स्वरूप काळानुसार बदलले, तरी त्याचा आत्मा टिकून राहतो.

पितृपक्षाचा मूळ गाभा कृतज्ञता हा आहे.आपण एकट्याने काहीही घडवलेले नाही. आपल्या मागे पिढ्यान पिढ्यांच्या कष्टांची, संस्कारांची आणि त्यागाची साखळी आहे. वर्षातून काही दिवस थांबून त्या साखळीचे स्मरण करणे, हे माणूस म्हणून आपल्याला अधिक विनम्र आणि संवेदनशील बनवते. त्यातून सर्व जीवांविषयी करुणा आणि निसर्गाशी नाते जपण्याचा विचार दिसतो.

पाणी हे पूर्वजांनी आपल्याला दिलेल्या वारशाचे आणि आपण पुढच्या पिढीला द्यायच्या वारशाचे प्रतीक आहे. आज आपण अर्पण केलेले स्वच्छ जल उद्याच्या पिढ्यांना स्वच्छ नद्या, विहिरी आणि तलाव म्हणून मिळावे, हीच खरी पितृसेवा ठरेल. तर्पणाचे पाणी ओंजळीतून सोडताना मनात पूर्वजांविषयी कृतज्ञता आणि पाण्याविषयी जबाबदारी, या दोन्ही भावना असाव्यात. पितृपक्षाचा खरा संदेश हा आहे की, आपण पूर्वजांचे ऋण मानतो आणि त्यांनी जपलेला जलसंवर्धन,संगोपन, संयोजन, याचे भान ठेवून पुढच्या पिढीसाठी शुद्ध, प्रदूषणरहित जलस्रोत जपून ठेवायला हवेत. ही जलसंवर्धनाची परंपरा पुढे नेणे हीच खरी आपल्या पितरांना खऱ्या अर्थाने श्रद्धांजली ठरेल.

**डॉ. मंगेश कश्यप**



# ‘बाप्पा मोरया’च्या गजरात अकोटमध्ये गणरायाला भावपूर्ण निरोप


## महाकाय मूर्ती, आकर्षक देखावे अन भक्तिमय वातावरणाने शहर दुमदुमले

## ४७ मंडळांचा विसर्जन मिरवणुकीत सहभाग

■ प्रतिनिधी | अकोट ■

‘गणपती बाप्पा मोरया... पुढच्या वर्षी लवकर या...’च्या जयघोषात शनिवारी अकोट शहर गणरायाच्या भक्तीत न्हाऊन निघाले. बारा दिवसांच्या भक्तिमय उत्सवानंतर लाडक्या बाप्पाला निरोप देण्यासाठी हजारो गणेशभक्त रस्त्यावर उतरले. महाकाय गणेशमूर्ती, आकर्षक विद्युत रोषणाई, सामाजिक संदेश देणारे देखावे, भजन-कीर्तन आणि टाळ-मृदंगाच्या गजराने विसर्जन मिरवणुकीत चैतन्य निर्माण झाले. विशेष म्हणजे, मोठी गर्दी असतानाही गणेश मंडळांनी शिस्त व शांतता राखत मिरवणूक मार्गक्रमण केली.

अकोट शहरात यंदा तब्बल ८९ गणेश मंडळांनी श्रींची स्थापना केली होती. त्यापैकी ४७ मंडळांनी विसर्जन मिरवणुकीत सहभाग नोंदविला. यात्रा चौकातून मिरवणुकीला सुरुवात झाली. श्री नरसिंग मंदिर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचा मानाचा गणपती अग्रस्थानी होता. त्यानंतर विविध मंडळांनी ढोल-ताशे, भजनी मंडळे आणि आकर्षक सजावटीसह मिरवणुकीत सहभाग घेतला.


### महाकाय मूर्ती, देखाव्यांनी वेधले लक्ष

विविध मंडळांनी साकारलेल्या महाकाय गणेशमूर्ती आणि आकर्षक सजावट मिरवणुकीचे प्रमुख आकर्षण ठरले. फुलांची सजावट, विद्युत रोषणाई आणि विविध धार्मिक-सामाजिक विषयांवरील देखाव्यांनी नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. काही मंडळांनी सामाजिक प्रबोधनाचा संदेश देणारे देखावे सादर केले.

### टाळ-मृदंगाच्या गजरात भक्तीचा जागर

कर्णकर्कश वाद्यांचा वापर टाळण्याचे आवाहन पोलिस प्रशासनाने केले होते. त्यानुसार अनेक मंडळांनी पारंपरिक वाद्यांना प्राधान्य दिले. भजनी मंडळे, वारकरी आणि कीर्तनकारांच्या सहभागामुळे मिरवणुकीला धार्मिक रंग चढला. टाळ-मृदंगाचा गजर, भजन-कीर्तन आणि बाप्पाच्या जयघोषाने शहरातील वातावरण भक्तिमय झाले.

### रस्त्याच्या दुतर्फा भाविकांची गर्दी

मिरवणूक पाहण्यासाठी शहरातील प्रमुख मार्गांवर नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी गणरायाचे दर्शन घेतले. ठिकठिकाणी आरती करण्यात आली. ‘बाप्पा मोरया’च्या जयघोषासह भाविकांनी गुलालाची उधळण करीत गणरायाला निरोप दिला. बाप्पाच्या निरोपाच्या क्षणी अनेक भाविक भावुक झाल्याचेही पाहायला मिळाले.

### भाविकांसाठी चहा-पाणी, फराळाची व्यवस्था

विसर्जन मिरवणुकीत सहभागी होणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये, यासाठी सामाजिक संस्था, विविध संघटना आणि नागरिकांनी पुढाकार घेतला. मिरवणूक मार्गावर ठिकठिकाणी पिण्याचे पाणी, चहा आणि फराळाची व्यवस्था करण्यात आली होती. कार्यकर्त्यांकडून भाविकांना पाणी व अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले.

### गणेशोत्सवात सामाजिक उपक्रमांचीही रेलचेल

गणेशोत्सवाच्या काळात विविध मंडळांनी रक्तदान, आरोग्य तपासणी, स्वच्छता मोहीम, प्रबोधनात्मक कार्यक्रम आणि महाप्रसादाचे आयोजन केले. त्यामुळे उत्सवाला सामाजिक बांधिलकीची जोड मिळाली. विसर्जन मिरवणुकीतही प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून मंडळांनी शिस्तीचे दर्शन घडविले.

### सुमारे एक हजार पोलिसांचा बंदोबस्त

विसर्जन मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील प्रमुख चौक आणि मिरवणूक मार्गावर पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. राज्य राखीव पोलिस दल, केंद्रीय पोलिस दल तसेच जिल्ह्यातील पोलिस अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने तैनात होते. सुमारे एक हजार पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी बंदोबस्ताची जबाबदारी सांभाळली.

जिल्हा पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलिस अधीक्षक चंद्रकांत बी. रेड्डी, उपविभागीय पोलिस अधिकारी निखिल पाटील, उपविभागीय अधिकारी मनोज लोणारकर, तहसीलदार डॉ. सुनील चव्हाण, मुख्याधिकारी शशिकांत बाबर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. अकोट शहर पोलिस ठाण्याचे ठाणेदार किशोर जुनघरे, ग्रामीण पोलिस ठाण्याचे ठाणेदार श्रीधर गुट्टे, स्थानिक गुन्हे शाखेचे प्रमुख नितीन लेव्हरकर, वाहतूक शाखेचे विलास पाटील यांच्यासह अधिकारी व कर्मचारी मिरवणुकीच्या व्यवस्थेवर लक्ष ठेवून होते.

### असा होता मिरवणुकीचा मार्ग

यात्रा चौकातून सुरू झालेली मिरवणूक कालंका चौक, शनिवारा, सावरकर चौक, केशवराज वेटाळ, तहसील परिसर, बडा अलावा, शौकत अली चौक, याकूब पटेल चौक, जयस्तंभ चौक, सोनू चौक मार्गे शिवाजी चौकात पोहोचली. त्यानंतर विविध गणेश मंडळांनी पूर्णा नदी तसेच पोपटखेड धरणाच्या दिशेने प्रस्थान केले. बारा दिवसांच्या उत्सवानंतर भक्तिभाव आणि उत्साहाच्या वातावरणात गणरायाला निरोप देण्यात आला. ‘गणपती बाप्पा मोरया... पुढच्या वर्षी लवकर या...’च्या जयघोषाने अकोट शहर दुमदुमून गेले आणि गणेशोत्सवाची भावपूर्ण सांगता झाली.

---

# जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत श्रीनाथ बहीण-भावाचा डंका

## जानवी व अनुषचा प्रथम क्रमांक; विभागीय स्पर्धेसाठी निवड



■ प्रतिनिधी | पातूर ■

जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत पातूर येथील सावित्रीबाई फुले प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील बहीण-भावाने दमदार कामगिरी करत कुस्तीच्या आखाड्यात आपला ठसा उमटविला. पै. जानवी अनिल श्रीनाथ आणि पै. अनुष अनिल श्रीनाथ यांनी १७ वर्षांखालील वयोगटात प्रथम क्रमांक पटकावत विभागीय स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली.

प्रतिकूल परिस्थितीवर मात करत दोघांनी नियमित सराव, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर हे यश संपादन केले. लहानपणापासूनच श्री सिदाजी व्यायामशाळेत वस्ताद पै. अक्षय तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली दोघेही मल्लविद्येचे प्रशिक्षण घेत आहेत. सातत्यपूर्ण सरावाचे फळ म्हणून त्यांनी जिल्हास्तरीय स्पर्धेत अव्वल स्थान मिळविले.

या उल्लेखनीय यशाबद्दल पातूर तालुका विकास मंचाचे संयोजक डॉ. शिवकुमारसिंह बैस आणि श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान पातूर विभागाचे प्रमुख धारकरी विजय राऊत यांच्या हस्ते जानवी व अनुष यांचा पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी हभप लक्ष्मणराव बारताशे, दिलीपसिंह बायस, सुहास देवकर, निलेश गाडगे, किरण राखोंडे, प्रमोद श्रीनाथ, जीवन राऊत, चैतन्य राऊत, विठ्ठल डिके, शिवा निमकंडे, अविनाश बायस यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

जानवी आणि अनुष यांच्या या यशाचे पातूर तालुक्यात कौतुक होत असून, आगामी विभागीय स्पर्धेसाठी क्रीडाप्रेमी व नागरिकांकडून त्यांना शुभेच्छा दिल्या जात आहेत.

---

## कु. प्रणाली पिंपळकर आदर्श विद्यार्थ्यांनी पुरस्कारची मानकर

■ प्रतिनिधी | अकोल ■

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या वतीने दरवर्षी विद्यार्थ्यांना शैक्षणिक गुणवत्ता व उल्लेखनीय कार्यासाठी ‘आदर्श विद्यार्थी पुरस्कार’ प्रदान करण्यात येतो. यावर्षी या पुरस्कारासाठी स्थानीय शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाची विद्यार्थ्यांनी कु.प्रणाली विनोद पिंपळकर हिची निवड करण्यात आली आहे. सदर पुरस्कार विद्यापीठाच्या वतीने २९ तारखेला राजर्षी शाहू अभियांत्रिकी महाविद्यालय बुलढाणा येथे प्रदान करण्यात येणार आहे. तिच्या यशाबद्दल शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्ष डॉ. ताराबाई हातवळणे, उपाध्यक्ष नाना कुलकर्णी, सचिव गोपाल खंडेलवाल, सदस्य ?ड गिरीश देशपांडे, आ वसंत खंडेलवाल, मधूर खंडेलवाल, प्राचार्य डॉ. जगदीश साबू, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी तिचे स्वागत केले.

---

# तेल्हारा नगर परिषद शाळांत ‘खासगी’ शिक्षकांचा शिरकाव?

## मंजूर पदे, शिक्षकसंख्या आणि मानधनाचा हिशोब तपासण्याची मागणी

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

तेल्हारा नगर परिषद संचालित शाळा क्रमांक १, शाळा क्रमांक २ तसेच उर्दू शाळेत खासगी व्यक्तींकडून अध्यापन करून घेतले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी संबंधितांची भूमिका तपासून चौकशी करावी, तसेच खासगी शिक्षकांना मानधन देण्यात आले असल्यास त्याचा आर्थिक स्रोत तपासावा, अशी मागणी करीत पोलिसांकडे तक्रार करण्यात आली आहे.

नगर परिषद शाळांमध्ये नियमित सरकारी शिक्षक कार्यरत असताना खासगी शिक्षकांकडून अध्यापन करून घेण्याची आवश्यकता काय, असा प्रश्न तक्रारीत उपस्थित करण्यात आला आहे. शिक्षण विभाग प्रमुख राजेश शेंडे, शाळा क्रमांक १ व २ चे संबंधित मुख्याध्यापक तसेच उर्दू शाळेचे मुख्याध्यापक दानिश सर यांच्या भूमिकेची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.



खासगी शिक्षकांची नियुक्ती कोणी केली, त्यासाठी लेखी आदेश अथवा परवानगी घेण्यात आली होती का, संबंधित शिक्षकांची शैक्षणिक पात्रता काय आहे, याची माहिती तपासण्याची मागणी करण्यात आली आहे. यासोबतच नगर परिषदेकडील मंजूर शिक्षक पदांची संख्या आणि प्रत्यक्ष कार्यरत शिक्षकांची संख्या यांचीही पडताळणी करण्याची मागणी तक्रारदाराने केली आहे. या आरोपांची सत्यता चौकशीनंतरच स्पष्ट होणार असून, संबंधितांची बाजू आणि उपलब्ध कागदपत्रांची पडताळणी होणे आवश्यक आहे. त्यामुळे नगर परिषद प्रशासन या प्रकरणात कोणती भूमिका घेते, याकडे लक्ष लागले आहे.

### मानधनाचा पैसा कुठून?

खासगी शिक्षकांना मानधन किंवा वेतन अदा करण्यात आले असल्यास त्यासाठी नगर परिषदेकडून निधी खर्च करण्यात आला का, याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. निधी खर्च झाला असल्यास संबंधित खर्चाला प्रशासकीय व आर्थिक मंजुरी कोणी दिली, बिले कोणी मंजूर केली, व्हाउचर कोणत्या आधारावर काढण्यात आले आणि रक्कम कोणाच्या बँक खात्यात जमा करण्यात आली, याची कागदपत्रांसह तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

### RTE च्या निकषांचीही पडताळणी

शिक्षणाचा अधिकार कायद्यानुसार विद्यार्थी-शिक्षक प्रमाण आणि शिक्षकसंख्येचे निकष लागू आहेत. त्यामुळे संबंधित शाळांमधील विद्यार्थीसंख्या, मंजूर शिक्षक पदे आणि प्रत्यक्ष उपलब्ध शिक्षक यांचा ताळमेळ तपासल्यानंतरच खासगी शिक्षकांची आवश्यकता होती का, हे स्पष्ट होऊ शकते. त्यानुसार खासगी शिक्षकांना मानधन देण्याची प्रक्रिया नियमांनुसार झाली का, याचीही चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

### तक्रारीनंतर चौकशीकडे लक्ष

यापूर्वीही यासंदर्भात तक्रारी करण्यात आल्या असून, अपेक्षित कारवाई झाली नसल्याचा आरोप तक्रारदाराने केला आहे. त्यामुळे आता केवळ प्रशासकीय चौकशी न करता पोलिसांनी संपूर्ण प्रकरणाची चौकशी करावी आणि आर्थिक गैरव्यवहार अथवा अन्य गुन्हा आढळल्यास कायद्यानुसार कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

---

## विदर्भ केसरी ब्रजलाल बियाणी यांना वाहण्यात आली आदरांजली

**अकोला :** विदर्भ केसरी ब्रजलाल बियाणी यांच्या सेवा कार्याची समाजाला माहिती होणे आवश्यक असून यासाठी त्यांचा वैचारिक वारसा युवकांनी पुढे नेणे हीच त्यांना खऱ्या रूपाने आदरांजली ठरणार असल्याचे प्रतिपादन जेंष्ठ पत्रकार सिद्धार्थ शर्मा यांनी केले.

**Change In Name**
I have changed
my name from
SHE. NADU SHE.
ISALAM
(शे. नादू शे. इस्लाम) as per tc,
SHAIKH NADU
SHAIKH ISALAM
Address : At post
Babhulgaon Jahagir,
Babhulgaon Akola

# जानोरकर मंगल कार्यालयात श्रीमद् भागवत व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

■ प्रतिनिधी | अकोला ■

पितृसेवा भागवत कथा आयोजन समिती तथा विश्व जागृती मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने राजराजेश्वर महाराज यांच्या कृपेने व पु सद्गुरू सुधाशु जी महाराज यांच्या आशीर्वादाने पितृ पक्षाच्या पावन पर्वावर श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार दिनांक ३ ऑक्टोंबर ते शुक्रवार दिनांक ९ ऑक्टोंबर पर्यंत स्थानीय रिंगरोड, कौलखेड परिसरातील जानोरकर मंगल कार्यालयात नित्य दु २ ते सायं ५ वाजेपर्यंत आयोजित या श्रीमद् भागवत कथेत पूज्य आचार्य



शिवदत्तजी महाराज हे संगीतमय भागवत कथा ज्ञान यज्ञ सादर करणार आहेत. या भागवत कथा उत्सवात नित्य रात्री ७ ते ९ वाजेपर्यंत हरिपाठ व विविध भजनकारांची संगीतमय भजने सादर करण्यात येणार आहेत. कथेची पूर्णाहुती शुक्रवार दिनांक ९ ऑक्टोबर रोजी दु १२ वाजता आयोजित करण्यात आली आहे. कथेच्या अनुषंगाने शनिवार दिनांक ३ आक्टोंबर रोजी दु १२-३० वाजता मातृशक्तीची भव्य कलश यात्रा आयोजित करण्यात आली आहे. या कथा उत्सवाची जोरदार तयारी समिती च्या वतीने सुरू करण्यात आली असून विविध व्यवस्थापन समित्या गठित करण्यात आल्या आहेत. या श्रीमद् भागवत कथा ज्ञान यज्ञ व कलश यात्रेत समस्त महिला पुरुष भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन पितृसेवा भागवत कथा आयोजन समिती तथा विश्व जागृती मिशन अकोलाच्या समस्त सेवेकऱ्यांनी केले आहे.

---

## शासकीय मुकबधीर संस्थेत सौ. खेडकर यांचा सत्कार

■ प्रतिनिधी | अकोल ■

दिव्यांग वर्गाच्या सेवेत कार्यरत असणाऱ्या केशव दिव्यांग महिला बहुउद्धेशीय संस्थेच्या अध्यक्ष व प्रहार अपंग क्रांती संघटना महानगर उपाध्यक्ष व राष्ट्रीय रेल्वे महिला संघटनेच्या विदर्भ अध्यक्ष सौ मनीषा खेडकर यांचा सत्कार करण्यात आला. स्थानीय मलकापूर परिसरातील शासकीय मूकबधिर शाळेत सौ खेडकर यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून हा उपक्रम संपन्न झाला. यावेळी दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे मोहोड साहेब, अजय मोडक, शाळेच्या अधिक्षक अलका मोडक, शिक्षिका शालिनी शिरसाट, राठोड, सौ देशमुख, बेबीताई मेश्राम, मालोकार, नवलेताई, संध्या दर्भे आदी उपस्थित होते.

---

# वक्तृत्व, वाद-विवाद स्पर्धेत पातूरच्या विद्यार्थिनींचे यश

## पुनम गाडगे, प्रतीक्षा बोरकर यांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड

■ प्रतिनिधी | पातूर ■

जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, अकोला यांच्या वतीने ‘बेटी बचाओ, बेटी पढाओ’ अभियानांतर्गत मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे, लैंगिक समानतेबाबत जनजागृती करणे तसेच मुलींच्या जन्माबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्याच्या उद्देशाने विविध स्पर्धांचे तालुकास्तरीय आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये पातूर येथील वसंतराव नाईक विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय कामगिरी केली.



वक्तृत्व स्पर्धेत महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. पुनम गाडगे हिने द्वितीय क्रमांक पटकावला. तर वाद-विवाद स्पर्धेत कु. प्रतीक्षा बोरकर हिने द्वितीय क्रमांक मिळविला. तालुक्यातील अनेक स्पर्धकांनी सहभाग घेतलेल्या या स्पर्धेत दोन्ही विद्यार्थिनींनी आपल्या प्रभावी वक्तृत्वातून आणि मुद्देसूद मांडणीतून परीक्षकांची दाद मिळविली.

या यशाबद्दल विजेत्या विद्यार्थिनींना मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. विशेष म्हणजे पुनम गाडगे व प्रतीक्षा बोरकर यांची आता जिल्हास्तरीय वक्तृत्व व वाद-विवाद स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

विद्यार्थिनींच्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक-सचिव श्री. रामसिंगजी जाधव तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. एफ. पी. राठोड यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

---

**Change In Name**
I have changed
my name from
NASIMA KHATOON
-TO-
NASIMA ZUBAIR
AHMAD CHAUDHARY
SHANKAR NAGAR
NEAR NEW INDIA
BAKERY AKOT FAIL
AKOLA -444001

**Change In Name**
I have changed
my name from
ZUBAIR AHMAD
-TO-
ZUBAIR AHMAD MIR
HASAN CHAUDHARY
NEW INDIA BAKERY
SHANKAR NAGAR
AKOT FAIL
AKOLA-444003

# मोबाइल-टीव्हीपासून दूर नेत मुलांना खेळ, सर्जनशीलतेची जोड

## एसबीआयच्या अकोला मुख्य शाखेत गणेशोत्सवानिमित्त क्रीडा व मनोरंजक कार्यक्रम

■ प्रतिनिधी | अकोला ■

मोबाइल आणि टीव्हीच्या वाढत्या वापरामुळे मुलांचा मैदानी खेळ व सर्जनशील उपक्रमांकडे कमी होत चाललेला ओढा लक्षात घेता, मुलांना काही काळ डिजिटल दुनियेपासून दूर ठेवून खेळ, मनोरंजन आणि सर्जनशीलतेशी जोडण्याच्या उद्देशाने स्टेट बँक ऑफ इंडिया, अकोला मुख्य शाखेत गणेशोत्सवानिमित्त बालकांसाठी क्रीडा व मनोरंजक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

रविवार, २० सप्टेंबर रोजी झालेल्या या उपक्रमात मुलांसाठी विविध खेळ, मनोरंजक कार्यक्रम तसेच रंगभरण व चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. मुलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत आपल्या कलागुणांना वाव दिला. गणेशोत्सवाच्या माध्यमातून समाजाला एकत्र आणण्याचा लोकमान्य टिळकांचा विचार पुढे नेत मुलांसह पालकांना एकत्र आणणे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता.



रंगभरण स्पर्धेसाठी मुलांनी स्केचपेन, पेन्सिल कलर व वॉटर कलरचा वापर केला. स्पर्धेतील विजेत्या मुलांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले, तर सहभागी सर्व मुलांना प्रोत्साहनपर भेटवस्तू देण्यात आल्या. बँक कर्मचाऱ्यांसाठीही विविध छोटेखानी खेळांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून पालकांनीही काही काळ मोबाइल आणि टीव्हीपासून दूर राहून मुलांसोबत खेळ व सर्जनशील उपक्रमांमध्ये सहभागी व्हावे, तसेच मुलांना सामूहिक सहभाग, खेळ आणि सर्जनशीलतेचे महत्त्व समजावून सांगावे, असा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाला एसबीआय स्टाफ युनियनचे अकोला क्षेत्रीय सचिव नितीन दांदळे, अमरावती मॉड्यूलचे उपाध्यक्ष अभिजित देशमुख, आशिष गोसावी, एआरएस अकोला अनुप टापरे, योगेश गाडगीळ, रुपेश पत्ती, कमलेश नागलकर, हेमंत सुरजुसे, गायत्री कोडापे, गायत्री हाटे, अनिल वानखडे, भावेश यादव यांच्यासह रिजनमधील कर्मचारी उपस्थित होते. अकोला मुख्य शाखेचे मॅनेजर विजय कुमार, कुणाल कुलकर्णी, धनंजय कावळे, अजय ठाकरे, सचिन सपकाल यांच्यासह स्टेट बँक ऑफ इंडियाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीही कार्यक्रमाला भेट देऊन मुलांचा उत्साह वाढविला. अकोला रिजनच्या रिजनल मॅनेजर सौ. जायता दयाल यांनी कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहून बालकांचे कौतुक केले. डीजीएम प्रियकुमार सारिगला यांनीही मुख्य शाखेला भेट दिली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन रुपेश पत्ती यांनी केले.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २८७
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# विनापरवाना देशी बनावटीचे पिस्तूल जप्त

## मोर्शी पोलिसांची कारवाई

**मोर्शी/प्रतिनिधीः-** संशयास्पदरित्या फिरणाऱ्या एका इसमाजवळ बनावटी पिस्तूल आढळून आल्याची खळबळजनक घटना दि.२४ सप्टेंबर रोजी उघडकीस आली.

पोलीस स्टेशन मोर्शी हद्दीत पेट्रोलिंगदरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी कारवाई करून एका इसमाकडून विनापरवाना देशी बनावटीचे पिस्तूल (अग्निशस्त्र)जप्त केले.

दि.२४ सप्टेंबर २०२६ रोजी पोलीस स्टेशन मोर्शीचे पोलीस उपनिरीक्षक तुषार नंदकुमार चव्हाण हे पोलीस पथकासह पेट्रोलिंग करीत असतांना मोर्शी नगरपरिषदेच्या इमारतीसमोर एक इसम संशयास्पद स्थितीत आढळून आला.त्यास ताब्यात घेऊन पंचासमक्ष अंगझडती घेतली असता त्याच्या कमरेमध्ये लपवून ठेवलेले देशी बनावटीचे पिस्तूल(अग्निशस्त्र) मिळून आले.सदर पिस्तूलाची अंदाजे किंमत २५,००० रुपये असून सदर अग्निशस्त्र बाळगण्याबाबत आरोपीकडे कोणताही वैध परवाना नसल्याचे आढळून आले.त्यामुळे शस्त्र अधिनियम कलम ३, २५ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात आली. सदर अग्निशस्त्र पंचनामा करून जप्त करण्यात



आले आहे.याप्रकरणी आरोपी राजा नथ्थू उईके,(वय १९ वर्षे,रा.तवा कॉलनी,जुनी इटारसी, जि.नर्मदापुरम,मध्यप्रदेश) यास ताब्यात घेऊन देशी बनावटीचे पिस्तूल (अग्निशस्त्र)जप्त करण्यात आले.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अप्पर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी उमेश पाटील, स्था.गुन्हे शा.पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल आठवले,पोलीस स्टेशन मोर्शी यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. कारवाईमध्ये पोलीस उपनिरीक्षक तुषार चव्हाण,स्वप्नील बायस्कर, छत्रपती करपते,अथर्व कोहळे यांनी सहभाग घेतला.पोलीस स्टेशन मोर्शीकडून अवैध शस्त्रे बाळगणाऱ्या व्यक्तींविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई सुरू आहे.

# सुरतमधून घरफोडीतील दोन आरोपी ताब्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-** रविनगरातील घरफोडीच्या तपासात मिळालेल्या सीसीटीव्ही फुटेजने पोलिसांना दोन संशयितांपर्यंत पोहोचविले आणि तपासाचा माग थेट गुजरातमधील सुरतपर्यंत गेला. अमरावती शहर गुन्हे शाखेने स्थानिक पोलिसांच्या मदतीने कारवाई करत दोन संशयितांना सुरतमधून ताब्यात घेतले. त्यांच्याकडून सोन्या-चांदीचे दागिने, रोख रक्कम आणि मोबाइल असा ६७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केल्याचे पोलिसांनी सांगितले.

राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रविनगर येथील रामलीला, लक्ष्मीविहार परिसरातील एका घराला २३ सप्टेंबर रोजी चोरट्यांनी लक्ष्य केले. घराच्या मुख्य दरवाजाचा कडी-कोंढा आणि लॉक तोडून आत प्रवेश केल्यानंतर बॅगेत ठेवलेली आठ हजार रुपयांची



रोख रक्कम लंपास करण्यात आली. याप्रकरणी राजापेठ पोलिसांनी गुन्हा दाखल केला. दरम्यान, गुन्हे शाखेने समांतर तपास सुरू करत घटनास्थळ परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले. त्यातून संशयितांचे चेहरे पोलिसांच्या हाती लागले. त्यानंतर त्यांच्या हालचालींचा माग काढण्यासाठी गुप्त माहिती संकलित करण्यात आली. महाराष्ट्राबाहेरही तपासाची चक्रे फिरविण्यात आली. तपासादरम्यान संशयितांचा संबंध गुजरातमधील सुरतशी असल्याची माहिती मिळाल्यानंतर गुन्हे शाखेचे पथक तेथे रवाना झाले. सारोली पोलिसांच्या सहकार्याने अखबर ऊर्फ फिरोज सुलतान सैफी (वय ४२, रा. गाझियाबाद, उत्तर प्रदेश) आणि हबीब हफीज सैफी (वय ४६, रा. गाझियाबाद, उत्तर प्रदेश) यांना ताब्यात घेण्यात आले. पोलिसांच्या माहितीनुसार, त्यांच्याकडून १३ हजारांचे सोन्याचे दागिने, १० हजारांचे चांदीचे दागिने, ३३ हजार रुपये रोख, दोन की-पॅड आणि दोन अँड्रॉइड मोबाइल असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दोघांना पुढील तपासासाठी राजापेठ पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपआयुक्त शाम घुगे, प्रांजली सोनावणे आणि सहायक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# विसर्जन मिरवणुकीत शिरला प्रतिबंधित इसम

## मनाई आदेश असूनही मिरवणुकीत

**अमरावती/प्रतिनिधीः-** गणेश विसर्जन मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रतिबंधात्मक आदेश लागू असतानाही मिरवणुकीत सहभागी झाल्याप्रकरणी नांदगाव खंडेश्वर पोलिसांनी एका तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल केला. मंगेश जगदीश कानोडे (वय २६, रा. माळीपुरा, नांदगाव खंडेश्वर) असे संबंधित इसमाचे नाव आहे. मनाई आदेशाचे उल्लंघन करण्यासोबतच दारूच्या नशेत असभ्य वर्तन केल्याचा आरोप पोलिसांनी केला आहे. गणेशोत्सव काळात मिरवणुका शांततेत पार पडाव्यात आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी पोलिसांकडून गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येत होती. त्याच अनुषंगाने कानोडे याच्याविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाईचा प्रस्ताव उपविभागीय दंडाधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आला होता. या प्रस्तावावर निर्णय घेत उपविभागीय दंडाधिकाऱ्यांनी महाराष्ट्र नागरी सुरक्षा संहिता २०२३ मधील कलम १६३(२) अन्वये आदेश काढला. त्यानुसार २४ ते २७ सप्टेंबर या कालावधीत कानोडे याला गणपती विसर्जन मिरवणुकीत सहभागी होण्यास तसेच मिरवणूक किंवा गावाच्या परिसरात उपस्थित राहण्यास मनाई करण्यात आली होती. मात्र, २४ सप्टेंबर रोजी विसर्जन मिरवणूक सुरू असताना कानोडे तेथे आढळून आल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यावेळी तो दारूच्या नशेत असभ्य वर्तन करीत असल्याचा पोलिसांचा दावा आहे. त्यामुळे पोलिसांनी त्याला ताब्यात घेत कारवाई केली. मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम २२३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. याशिवाय महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ८५(१)(२) तसेच मुंबई पोलीस अधिनियमातील कलम ११० व ११७ अन्वयेही कारवाई करण्यात आली. या प्रकरणाचा पुढील तपास नांदगाव खंडेश्वर पोलीस करीत आहेत.

# गोदावरी व वीर संभाजी गणेश मंडळात आरोग्य शिबिर

## ट्रायडेंट इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंगच्या विद्यार्थ्यांचा कौतुकास्पद उपक्रम

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** गणेशोत्सवाच्या मंगलमय वातावरणात सामाजिक बांधिलकी जपत ट्रायडेंट इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग, चांदूर रेल्वे यांच्या वतीने नागरिकांसाठी निःशुल्क आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाच्या वतीने गोदावरी गणेश मंडळ तसेच वीर संभाजी गणेश मंडळ, चांदूर रेल्वे येथे दोन स्वतंत्र आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या दोन्ही शिबिरांना परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या सामाजिक उपक्रमासाठी जय हिंद क्रीडा मंडळाचे अध्यक्ष तसेच समर्थ बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष डॉ. निलेश विश्वकर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच चांदूर रेल्वेच्या नगराध्यक्षा प्रा. प्रियंका निलेश विश्वकर्मा यांच्या मार्गदर्शनाने महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षकवर्गाने सहभाग नोंदविला. डॉ. निलेश विश्वकर्मा आणि प्रा. प्रियंका विश्वकर्मा यांनी



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांचा उत्साह वाढविला. त्यांच्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांनी आरोग्यसेवेचे महत्त्व समजून घेत नागरिकांपर्यंत आरोग्यविषयक सेवा पोहोचविण्यासाठी पुढाकार घेतला. गणेशोत्सवाच्या निमित्ताने राबविण्यात आलेला आरोग्यसेवेचा हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरला असून, विद्यार्थ्यांच्या माध्यमातून 'सेवा हीच खरी सामाजिक बांधिलकी' असा सकारात्मक संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात महाविद्यालयाला यश आले आहे.

# राजकीय पक्षांनी आचार संहितेचे काटेकोर पालन करावे

## विभागीय आयुक्त नयना गुंडे

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. यादरम्यान, राजकीय पक्षांनी प्रचार सभा व रॅली घेताना आदर्श आचार संहितेच्या नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन विभागीय आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी नयना गुंडे यांनी केले. अमरावती विभाग शिक्षक मतदार संघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विभागीय आयुक्त गुंडे यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय आयुक्त कार्यालयात राजकीय पक्षांची बैठक पार पडली. त्यावेळी त्या बोलत होत्या. भारत निवडणूक आयोगाने अमरावतीसह राज्यातील चार विभागांतील महाराष्ट्र विधान परिषदेच्या रिक्त होणाऱ्या जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. कार्यक्रम जाहीर झाल्यापासूनच विभागात आदर्श आचार संहिता लागू झाली असून त्यात विहित सूचना व नियमांचे राजकीय पक्षांनी काटेकोरपणे पालन करावे, विभागातील पाचही जिल्ह्यांमध्ये प्रचारसभा व रॅली घेण्याकरिता विभागीय आयुक्त कार्यालयात परवानगी मिळेल तसेच एकच प्रचार सभा असेल तर संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयातून परवानगी देण्यात येईल,या कालावधीत वाहन वापरण्याबाबत निश्चित करण्यात आलेल्या नियमानुसार कार्यवाही व्हावी ,अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

या निवडणूक कालावधी दरम्यान विभागातील ५ जिल्हाधिकारी हे सहायक मतदार नोंदणी अधिकारी म्हणून जबाबदारी सांभाळतील. विभागातील २७ उपविभागीय अधिकारी सहायक मतदार नोंदणी अधिकारी म्हणून कार्य करतील तर ५६ तहसीलदार हे पदानिर्देशित अधिकारी म्हणून जबाबदारी पाहतील अशी माहिती त्यांनी यावेळी दिली. येत्या २९ सप्टेंबर रोजी निवडणुकीची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. प्रचारसभा आयोजनासाठी शाळा व महाविद्यालय परिसर टाळावा, सामाजिक तेढ निर्माण होणार नाही याची काळजी घेवून सभा व रॅली आयोजन व्हावे, असेही त्यांनी सांगितले. निवडणूक कार्यक्रम तसेच आचार संहिता काळात 'काय करावे व काय करू नये!' आदींबाबत त्यांनी उपस्थित राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना माहिती दिली. सामान्य प्रशासन अपर आयुक्त संजय जाधव, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) शिवाजी शिंदे यावेळी उपस्थित होते.

# भारत गणेशपुरेंच्या निवासस्थानी गोंधळाचा भक्तिमय जागर

## -वीस वर्षांची परंपरा कायम

**अमरावती/प्रतिनिधीः-** सुप्रसिद्ध अभिनेते भारत गणेशपुरे यांच्या गोरेगाव, मुंबई येथील निवासस्थानी गौराई-महालक्ष्मी स्थापनेच्या मंगलमय निमित्ताने याच पारंपरिक लोककलेचा भक्तिमय जागर करण्यात आला.

अमरावती शहरातील सुप्रसिद्ध गोंधळी कलाकार अमोल पाचपोर व त्यांचे बंधू राजेश मुदगल यांच्या वतीने पारंपरिक गोंधळाचा कार्यक्रम सादर करण्यात आला. यावेळी गणेशपुरे परिवारातील सदस्यांनी मोठ्या श्रद्धेने आणि उत्साहाने सहभागी होत गोंधळाच्या तालावर नाचून-बागडून या मंगल सोहळ्याचा मनमुराद आनंद घेतला.

भारत गणेशपुरे गेल्या सुमारे वीस वर्षांपासून आपल्या घरातील प्रत्येक शुभ-मंगल प्रसंगी महाराष्ट्राची पारंपरिक ओळख असलेला गोंधळ आवर्जून आयोजित करतात. अभिनय क्षेत्रातील अत्यंत व्यस्त जीवनशैली असूनही आपल्या संस्कृतीशी आणि कौटुंबिक परंपरांशी असलेली नाळ त्यांनी कायम जपली आहे.

कुटुंबातील धार्मिक कार्यक्रम, सण-उत्सव आणि पारंपरिक विधी यानिमित्ताने गणेशपुरे परिवारातील सदस्य एकत्र येतात. श्रद्धा आणि आनंदाचा सुंदर मिलाफ साधत



हे धार्मिक सोहळे मोठ्या उत्साहात साजरे केले जातात. विशेष म्हणजे भारत गणेशपुरे स्वतःही अशा कार्यक्रमांमध्ये मनापासून सहभागी होत कुटुंबीयांसमवेत त्याचा मनमुराद आनंद घेतात.

गौराई-महालक्ष्मी स्थापनेच्या निमित्ताने आयोजित या गोंधळाच्या कार्यक्रमामुळे गणेशपुरे यांच्या गोरेगाव निवासस्थानी पारंपरिक भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

या कार्यक्रमाला गणेशपुरे परिवारातील एडवोकेट स्मिता संजय गणेशपुरे, भारत गणेशपुरे,अर्चना गणेशपुरे, शैलेश गणेशपुरे,विशाखा गणेशपुरे, मनिष गणेशपुरे,मनिषा गणेशपुरे, ध्रुव गणेशपुरे, ,मनस्वी गणेशपुरे,अश्विनी इंगळे यांच्यासह कुटुंबातील अन्य सदस्य उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे गोंधळाचा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडल्यानंतर भारत गणेशपुरे यांनी अमरावतीहून आलेले गोंधळी कलाकार अमोल पाचपोर व राजेश मुदगल यांचे विशेष आदरातिथ्य केले. त्यांनी दोन्ही कलाकारांना संपूर्ण गोरेगाव फिल्मसिटीची सफर घडवून आणली. यावेळी त्यांच्याशी आपुलकीने संवाद साधत त्यांच्या कलेचे कौतुक केले आणि यथोचित सन्मान केला. कलावंतांचा सन्मान, आपल्या मातीतील लोककलेप्रती असलेली आस्था आणि कुटुंबीयांसोबत धार्मिक परंपरा जपण्याची भावना यामुळे भारत गणेशपुरे यांच्या या उपक्रमाचे विशेष कौतुक होत आहे.

मनोरंजन क्षेत्रातील व्यस्त जीवनशैलीतही गेल्या वीस वर्षांपासून आपल्या घरातील धार्मिक परंपरा आणि महाराष्ट्राच्या लोककलेचा हा वारसा ते श्रद्धेने पुढे नेत आहेत.

श्रद्धा, संस्कृती आणि कुटुंबीयांचा आनंद यांचा सुंदर संगम घडविणारा हा गोंधळाचा सोहळा गणेशपुरे परिवारासाठी अविस्मरणीय ठरला.

# बाबुराव उमरकर यांचे निधन

## सरपंच प्रफुल्ल उमरकर यांना पितृशोक

**मोर्शी/प्रतिनिधीः-** मोर्शी लगतच असलेल्या सिंभोरा येथील माजी पोलीस पाटील बाबुराव महादेवराव उमरकर यांचे वयाच्या ८८ व्या वर्षी दुःखद निधन झाले. अतिशय मनमिळाऊ स्वभावाचे व्यक्तिमत्व असलेल्या आणि पोलीस पाटील पदाची जबाबदारी सांभाळणाऱ्या बाबुराव उमरकर यांच्या निधनाची बातमी कळताच मोर्शी शहरासह तालुक्यातील प्रतिष्ठित नागरिक



व त्यांच्या चाहत्यांनी त्यांच्या घरी भेट देऊन त्यांचे अंतिम दर्शन घेतले. दि.२६ सप्टेंबर रोजी त्यांची अंतिम यात्रा हजारो जनसामुदायांच्या उपस्थितीत स्थानिक मोक्षधाम येथे नेण्यात येऊन त्यांच्या पार्थिवावर अंतिम संस्कार पार पडले. त्यांचे मागे दोन मुले,दोन मुली,जावई,सुना नातू नातवंड बराच मोठा आप्तपरिवार आहे. त यावेळी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे विदर्भ संपर्कप्रमुख अमित अढाउ,मोर्शीचे ठाणेदार राहुल आठवले यासह नेतेमंडळींनी त्यांच्या घरी जाऊन कुटुंबियांचे सात्वन केले.

# यश खोडके यांच्या वाढदिवसानिमित्त स्नेहमेळावा

**अमरावती/प्रतिनिधीः-** युवक चळवळीच्या माध्यमातून युवकांशी सातत्याने संवाद साधणारे युवा नेतृत्व यश सुलभा संजय खोडके यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित स्नेहमेळावा व शुभेच्छा समारंभ उत्साहपूर्ण आणि आनंदमय वातावरणात पार पडला. शनिवार दिनांक २६ सप्टेंबर रोजी



विद्यापीठ ते डेंटल कॉलेज रोडवरील विक्रांत लॉन येथे सायंकाळी ७ वाजता आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्यास तरुणाई, युवक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, क्रीडा तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठी उपस्थिती लाभली.

वाढदिवसानिमित्त यश खोडके यांना शुभेच्छा देण्यासाठी युवक-युवतींसह विविध क्षेत्रातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली. यावेळी संपूर्ण विक्रांत लॉन परिसरात उत्साहाचे आणि आपुलकीचे वातावरण निर्माण झाले होते.

यावेळी राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम, मनपा स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, नगरसेवक रतन डेंडूले, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष ऋतुराज राऊत, प्रदेश पदाधिकारी आकाश हिवसे, अशोक हजारे, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे शहराध्यक्ष संकेत बोके, कर्नलसिंह राहल, समाज भूषण विनोद गुडधे, भास्कर ढेवले, संकेत महल्ले, अभिमन्यू तायवाडे, प्रतीक डुकरे, मनीष पाटील, जयेश सोनोने , प्रमोद धनाडे, प्रथमेश बोके, पियुष मोरे, सौरभ भूंबर, सार्थक खोरगडे, गुड्डू पठाण, मोईन खान, सोमेश रोहनकर निलेश जामनिक, अंकित दहीकर, मनीष पेठे, पियुष लोंढे, आदित्यसिंह राहल, वेदांत रहाटे,बादल काळे, स्मित माथुरकर यांचेसह राष्ट्रवादी परिवार, सर्व सहकारी, इष्टमित्र व स्नेहीजन तसेच हितचिंतकांची मोठी उपस्थिती दिसून आली.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे

संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक २४
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# स्व. प्रभाताई मराठे यांच्या स्मरणार्थ साकारलेला नाना-नानी स्पॉट लोकार्पणासाठी सज्ज

**अमरावती/प्रतिनिधीः-** दैनिक हिंदुस्थानच्या आधारवड श्रीमती प्रभा अरुण मराठे यांच्या निधनानंतर मराठे परिवाराशी जपलेला ऋणानुबंध आणि दिलेला शब्द पूर्ण करत तत्कालीन खासदार नवनीत राणा व आमदार रवी राणा यांच्या पुढाकारातून साईनगर प्रभागातील नवाथे परिसरात स्व. प्रभा अरुण मराठे यांच्या स्मरणार्थ 'नाना-नानी स्पॉट' साकारण्यात आला आहे. चार वर्षांपूर्वी राणा दाम्पत्याने मराठे परिवाराला दिलेला शब्द तंतोतंत पूर्ण झाला असून, सोमवार, दि. २८ सप्टेंबर रोजी प्रभाताईंच्या चौथ्या पुण्यस्मरणदिनी या 'नाना-नानी स्पॉट' लोकार्पनासाठी सज्ज आहे.

याबाबत उपमहापौर सचिन भेंडे यांनी दैनिक हिंदुस्थानशी संवाद साधताना सांगितले की, अमरावती शहराच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि सार्वजनिक जीवनाच्या वाटचालीत दैनिक हिंदुस्थानचे मोलाचे योगदान आहे.

राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच



विविध क्षेत्रांतील कर्तृत्वाला व्यासपीठ उपलब्ध करून देत या वृत्तपत्राने जनसामान्यांच्या मनात आदराचे स्थान निर्माण केले आहे. अशा या दैनिक हिंदुस्थानच्या आधारवड प्रभा अरुण मराठे यांच्या निधनानंतर राणा दाम्पत्याने मराठे परिवाराची भेट घेतली होती. त्यावेळी तत्कालीन खासदार नवनीत राणा व आमदार रवी राणा यांनी प्रभाताईंच्या स्मरणार्थ सर्वसामान्य नागरिक, प्रवासी आणि विद्यार्थ्यांना विरंगुळ्यासाठी तसेच सकारात्मक ऊर्जा मिळण्यासाठी 'नाना-नानी स्पॉट' साकारण्याचा शब्द दिला होता. हा शब्द पूर्ण करण्यासाठी सुनील राणा आणि उपमहापौर सचिन भेंडे यांनी साईनगर प्रभागातील नवाथे परिसरात या स्पॉटच्या निर्मितीसाठी सातत्याने प्रयत्न केले.

स्व. प्रभाताई मराठे या भगवान श्रीकृष्णाच्या निस्सीम भक्त होत्या. त्यामुळे या 'नाना-नानी स्पॉट'मध्ये श्रीकृष्णाची आकर्षक प्रतिमा साकारण्यात आली आहे. त्यामुळे हे ठिकाण केवळ ज्येष्ठ नागरिकांच्या विरंगुळ्याचे केंद्र न राहता भक्ती, संस्कार आणि सकारात्मकतेचा संदेश देणारे ठिकाण ठरेल, असा विश्वास सचिन भेंडे यांनी व्यक्त केला.

मातोश्री प्रभाताई यांच्या चौथ्या पुण्यस्मरणदिनी या स्मरणस्थळाचे काम पूर्णत्वास आल्याचे समाधान असून, मराठे परिवाराशी असलेला स्नेह आणि ऋणानुबंध या माध्यमातून कायम स्मरणात राहतील, असेही त्यांनी सांगितले.

# कारंजा दुष्काळाबाहेर कसा ? आमदारांच्या हस्तक्षेपानंतर फेरनिर्णयाची वेळ


## सात तालुके दुष्काळी, कारंज्याला मात्र ठेंगा; आता मुख्यमंत्र्यांच्या निर्देशाने प्रशासनाची धावपळ

**वर्धा / रवींद्र लाखे**

जिल्ह्यात दुष्काळाचे सावट असताना आठपैकी सात तालुके दुष्काळग्रस्त यादीत आले. मात्र कारंजा घाडगे तालुक्याला यादीतून वगळण्यात आले. पर्जन्यमानाच्या निकषात तालुका बसत नसल्याने हा निर्णय झाल्याचे सांगितले जात असले तरी आमदार सुमित वानखेडे यांच्या मुख्यमंत्र्यांशी झालेल्या भेटीनंतर कारंज्याचा फेरविचार करण्याचे निर्देश देण्यात आल्याने आता प्रशासनाच्या निर्णय प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

कारंजा तालुका पाणीटंचाईच्या समस्येसाठी परिचित आहे. यंदा तालुक्यात सरासरी पर्जन्यमान ६६७ मिलिमीटर असताना सुमारे ५४६ मिलिमीटर पावसाची नोंद झाली.

सरासरीच्या जवळपास ८१ टक्के पाऊस झाल्यामुळे ट्रिगर एकच्या पर्जन्यमान निकषात तालुका बसला नाही. परिणामी कृषी विभागाच्या प्रक्रियेत कारंजा दुष्काळी यादीबाहेर राहिला.




मात्र याच निर्णयावर आता राजकीय हस्तक्षेपाची छाया पडली आहे. आमदार वानखेडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन कारंज्यातील पीक परिस्थिती आणि शेतकऱ्यांचे नुकसान त्यांच्या निदर्शनास आणून दिल्याचे सांगितले जाते. त्यानंतर प्रत्यक्ष परिस्थितीच्या आधारे ट्रिगर एक सक्रिय करून कारंज्याचा दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या यादीत समावेश करण्याबाबत निर्देश दिल्याचे आमदारांकडून सांगण्यात आले आहे.

यामुळे शेतकऱ्यांसमोर साधा पण बोचरा प्रश्न उभा राहिला आहे. जर कारंज्यातील परिस्थिती दुष्काळग्रस्त म्हणून पात्र असेल तर कृषी विभागाच्या सुरुवातीच्या प्रक्रियेत तालुका वगळला कसा? आणि जर पर्जन्यमानाचा निकष योग्य असेल तर आता फेरविचाराची गरज का निर्माण झाली? दुष्काळ ठरविण्यासाठी प्रशासनाने निकष निश्चित केले आहेत. मात्र एका राजकीय पाठपुराव्यानंतर त्याच निर्णयाचा फेरविचार होत असेल तर निकषांच्या अंमल बजावणी बाबत पारदर्शकता आवश्यक आहे. आमदारांच्या हस्तक्षेपामुळे प्रश्न सुटणार की प्रशासकीय प्रक्रियेतील त्रुटी उघड होणार, याचे उत्तर आता शासनालाच द्यावे लागणार आहे. कारंजा वगळण्याच्या निर्णयाची जबाबदारी कोणाची? प्रत्यक्ष नुकसान असूनही तालुका डावलला गेला असेल तर दोषी कोण? मुख्यमंत्री फडणवीस यांनी या संपूर्ण प्रक्रियेची चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

# १७१ वर्षांची श्रद्धेची अखंड ज्योत

## घोंगडी महाराजांच्या पुण्यतिथीला वडगावात भक्तीचा जागर

**सेलू/ जनमाध्यम**

तालुक्यातील केळझर नजीक वडगाव जंगली येथे घोंगडी महाराजांच्या पुण्यतिथी महोत्सवाची १७१ वर्षांची परंपरा आजही श्रद्धा आणि उत्साहाने जपली जात आहे. सर्व समाजबांधव एकत्र येऊन साजरा होणारा हा सोहळा गावाच्या सामाजिक एकजुटीचे प्रतीक ठरला आहे. पुण्यतिथीनिमित्त धार्मिक कार्यक्रमांसह हजारो भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन केले जाते.

ग्रामस्थांच्या माहितीनुसार, खांद्यावर घोंगडे, हातात काठी आणि कंदील घेऊन आलेल्या एका संत महात्म्याने वडगाव जंगली येथे जिवंत समाधी घेतली. अंगावर घोंगडे असल्याने त्यांना पुढे घोंगडी महाराज म्हणून ओळखले जाऊ लागले. त्यांच्या



स्मृतीप्रित्यर्थ सुरू झालेली पुण्यतिथीची परंपरा आजही अखंडितपणे सुरू आहे.

पोळ्याच्या पाडव्यापासून अनंत चतुर्दशीपर्यंत गावात मांसाहार न करण्याची परंपराही ग्रामस्थ श्रद्धेने पाळतात. पुण्यतिथीच्या आदल्या दिवशी भजन कीर्तनाचा कार्यक्रम होतो.

पुण्यतिथीच्या दिवशी गावात जणू एक दिवसाची यात्राच भरते.

गहू, तांदूळ, ज्वारी आणि बाजरीपासून तयार केलेली घुगरी तसेच आंबाडीच्या डाळभाजीचा महाप्रसाद हे सोहळ्याचे प्रमुख आकर्षण असते. परिसरातील केळझर, महाबळा, जुनगड, गायमुख, खापरी, शिवणगाव, हिंगणी यासह अनेक गावांतील हजारो भाविक महाप्रसादाचा लाभ घेतात.

मुंबईत वास्तव्यास असलेले मिलरे कुटुंबही गेल्या ४५ वर्षांपासून दरवर्षी सहकुटुंब या सोहळ्यासाठी गावात येते. गावाबाहेर गेलेले नागरिक आणि विवाहित मुलीही या दिवशी आवर्जून उपस्थित राहतात. त्यामुळे श्रद्धेसोबतच गावच्या मातीशी असलेली नाळही या महोत्सवातून जपली जाते.

# हक्कासाठी सेवानिवृत्त न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा एल्गार

## १७ ऑक्टोबरच्या साखळी उपोषणात सहभागी होण्याचा निर्धार

**वर्धा /जनमाध्यम**

समान काम समान वेतनाच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला बळ देण्यासाठी वर्धा येथे सेवानिवृत्त न्यायालयीन कर्मचाऱ्यांची चिंतन बैठक घेण्यात आली. बैठकीला शेकडो सेवानिवृत्त कर्मचारी उपस्थित होते. चर्चेनंतर १७ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या साखळी उपोषणात सहभागी होण्याचा निर्धार करण्यात आला. भविष्यात या मागणीसाठी होणाऱ्या प्रत्येक आंदोलनात उत्स्फूर्तपणे सहभागी होण्याचाही निर्णय घेण्यात आला.

आंदोलन यशस्वी करण्यासाठी बैठकीत



आंदोलन संचालन समिती गठीत करण्यात आली. तसेच समान काम समान वेतनासंदर्भातील शासनाकडे प्रलंबित प्रस्ताव तातडीने मंजूर करण्याची मागणी करण्यात आली. यासाठी उच्च न्यायालय, मुख्यमंत्री आणि जिल्हाधिकारी यांच्या नावे तयार करण्यात आलेल्या निवेदनावर स्वाक्षरी अभियान राबविण्यात आले. या अभियानात सुमारे ९५ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी स्वाक्षऱ्या केल्या.

किशोर लसणे, विश्वनाथ बमणोटे, गणेश नारखेडे आणि अशोक खराबे हे कामानिमित्त बाहेर असल्याने भ्रमणध्वनीद्वारे आंदोलनाला पूर्ण पाठिंबा जाहीर केला.

हक्क आणि न्यायासाठी सर्वांनी एकजुटीने लढा देण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. वर्धा जिल्हा न्यायालय कर्मचारी संघटनेने उपस्थित सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

# वंचितांच्या शिक्षणासाठी झटणाऱ्या वैशाली उरकांदे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

**वर्धा /जनमाध्यम**

शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर राहिलेल्या विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणत त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न करणाऱ्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हनुमान नगर पारधी बेडा येथील मुख्याध्यापिका वैशाली हरिष उरकांदे यांना जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात



आला.

पारधी कोलाम आणि गोसाई समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळावी यासाठी उरकांदे यांनी विशेष प्रयत्न केले. केवळ शैक्षणिक गुणवत्तेपुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे सामाजिक जाणीव रुजविणे तसेच क्रीडा क्षेत्रातही त्यांना संधी उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी विविध उपक्रम राबविले.

वंचित घटकातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी शाळेच्या चौकटीबाहेर जाऊन केलेल्या त्यांच्या कार्याची दखल पुरस्कारासाठी घेण्यात आली. पराग सोमण यांनी त्यांच्या कार्याचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

पुरस्कार मिळाल्याने शाळा व्यवस्थापन समिती शिक्षक पालक आणि परिसरातील नागरिकांकडून उरकांदे यांचे अभिनंदन होत आहे.

### सैन्यदलातून निवृत्त जवानाच्या जमिनीवर ‘बनावट’ इसारपत्राचा डाव

**हिंगणघाट:** सैन्यदलातून निवृत्त झालेल्या जवानाच्या मालकीच्या शेतजमिनीवर बनावट इसारपत्र तयार करून खोटी स्वाक्षरी केल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. एवढेच नव्हे तर या कथित बनावट कागदपत्राच्या आधारे महसूल अभिलेखात फेरफार नोंद करून जमिनीवर विवेकानंद कॉलेज ऑफ सिव्हील सर्विसेसची इमारत असल्याचे दाखविल्याचा आरोप आहे. याप्रकरणी हिंगणघाट पोलिसांनी योगेश प्रकाशराव वानखेडे याच्याविरुद्ध फसवणूक, बनावट कागदपत्रे तयार करणे आणि त्याचा वापर केल्याच्या कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे.सतीश यादवराव तिमांडे हे भारतीय सैन्यदलातून निवृत्त झाले असून आजंती येथील सर्वे क्रमांक ४९ मधील जमीन त्यांनी खरेदी केली होती. या ठिकाणी ते जय जवान अकॅडमीच्या माध्यमातून भरतीपूर्व प्रशिक्षण देत होते. आरोपी योगेश वानखेडे हा तिमांडे यांचा परिचित असल्याने त्याला शेतातील एका खोलीत संस्थेचे साहित्य ठेवण्यास त्यांनी परवानगी दिली होती.

# विद्यार्थ्यांच्या लढ्याला यश

**वर्धा :** विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याशी जोडलेल्या मागणीला अखेर यश मिळाले आहे. महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाच्या वर्धा मुख्यालयातून २०२२ मध्ये प्रयागराजला हलविण्यात आलेले स्त्री अध्ययन आणि सिनेमा अध्ययन विभाग शैक्षणिक सत्र २०२७-२८ पासून पुन्हा वर्ध्यात सुरू करण्याचा निर्णय विद्यापीठाच्या कार्यपरिषदेने घेतला आहे.चार वर्षांपूर्वी विभाग स्थलांतरित झाल्याने वर्ध्यासह महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसमोर शिक्षण आणि निवासाच्या अडचणी निर्माण झाल्या होत्या. या प्रश्नावर विद्यार्थ्यांनी आंदोलन केले. त्यानंतर विभाग पुन्हा वर्ध्यात आणण्याचा निर्णय झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.या प्रश्नाकडे खा, अमर काळे यांनीही लक्ष वेधले होते. ३१ जुलै २०२६ रोजी केंद्रीय शिक्षणमंत्र्यांना पत्र देऊन वर्ध्यातील विद्यार्थ्यांच्या अडचणी मांडत हे विभाग मुख्यालयातच सुरू करण्याची मागणी त्यांनी केली होती.

कार्यपरिषदेच्या बैठकीत पीएचडी प्रवेश प्रक्रिया



नियमित सुरू ठेवण्यासह राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार प्रमाणपत्र आणि डिप्लोमा अभ्यासक्रम सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त सुट्टी आणि पंडित दीनदयाळ उपाध्याय संशोधन पीठ स्थापनेस तत्त्वतः मंजुरी देण्यात आली.

वर्ध्यातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची दारे पुन्हा खुली झाल्याने या निर्णयाचे शैक्षणिक क्षेत्रातून स्वागत होत आहे.

# गणरायाच्या सजावटीतून उमटला सामाजिक संदेश

**हिंगणघाट/ जनमाध्यम**

गणरायाच्या भक्तीबरोबरच सामाजिक प्रबोधनाचा संदेश देत राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने आयोजित घरगुती गणपती सजावट स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा श्री साई मंदिर हॉल येथे उत्साहात पार पडला. गणेश सजावटीतून सामाजिक संदेश देणाऱ्या १८० स्पर्धकांच्या कल्पकतेला यावेळी दाद देण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले होते. त्यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. पूजा कुंभारे व श्वेता भलावी यांनी प्रथम, शरद लोणकर यांनी



द्वितीय, तर शुभम शेंडे यांनी तृतीय क्रमांक पटकावला.

गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता सामाजिक प्रबोधन आणि जनजागृतीचे प्रभावी माध्यम व्हावे, या उद्देशाने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

आकर्षक सजावट, नाविन्यपूर्ण संकल्पना आणि सामाजिक संदेशांच्या आधारे स्पर्धकांचे परीक्षण करण्यात आले.

यावेळी अतुल वांदिले यांनी गणरायाच्या भक्तीतून समाजोपयोगी विचार रुजविण्याची गरज व्यक्त केली. नागरिकांच्या कलागुणांना व्यासपीठ देण्यासाठी अशा उपक्रमांना सातत्याने प्रोत्साहन दिले जाईल, असे त्यांनी सांगितले. पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हिंदनगरात कृत्रिम विसर्जन कुंडात ४०० घरगुती गणपतींचे विसर्जन

**वर्धा /जनमाध्यम**

गणेशोत्सवात श्रद्धा आणि भक्तीला पर्यावरण संवर्धनाची जोड देत हिंदनगर येथील गणेश मंदिर परिसरात आकरे मित्र परिवाराच्या वतीने कृत्रिम गणपती विसर्जन कुंडाची व्यवस्था करण्यात आली. २४ आणि २५ सप्टेंबर या दोन दिवसांत या विसर्जन कुंडात सुमारे ४०० घरगुती गणपतींचे पर्यावरणपूरक पद्धतीने विसर्जन करण्यात आले.

गणेशमूर्तींचे नदी, तलाव किंवा इतर जलस्त्रोतांमध्ये विसर्जन केल्यामुळे जलप्रदूषण होण्याची शक्यता असते. ही बाब लक्षात घेऊन आशिष



आकरे मित्र परिवाराने हिंदनगर गणेश मंदिर परिसरात कृत्रिम विसर्जन कुंड उपलब्ध करून दिले. या उपक्रमाला परिसरातील गणेशभक्तांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. नागरिकांनी भक्तिभावाने गणरायाला निरोप देतानाच पर्यावरण संवर्धनाचा संदेशही प्रत्यक्ष कृतीतून दिला.विशेष म्हणजे घरगुती गणपतीचे विसर्जन केल्यानंतर गणेशभक्तांचा वृक्ष देऊन सत्कार करण्यात आला. धार्मिक श्रद्धेसोबत

**आकरे मित्र परिवाराचा पर्यावरणपूरक उपक्रम**

पर्यावरणाची जबाबदारी जपण्याचा हा उपक्रम नागरिकांसाठी प्रेरणादायी ठरला. वृक्ष भेटीमुळे गणेशोत्सवातील भक्तीचा संदेश पर्यावरण संवर्धनाशी जोडला गेला.

यावेळी नगरसेवक संतोष ठाकूर, नगरसेविका स्नेहा आकरे, आशिष आकरे,यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कृत्रिम विसर्जन कुंडामुळे जलस्त्रोतांचे प्रदूषण टाळण्यास मदत झाली असून पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची संकल्पना अधिक व्यापक करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला.

# गुन्हेगारी वार्ता

## वीजकाम बंद केल्याच्या रागातून वृद्धाला मारहाण

**हिंगणघाट :** वीज फिटिंगची कामे देणे बंद केल्याच्या कारणावरून ६० वर्षीय वृद्धाला शिवीगाळ करून हाताबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना घोरपडे हॉस्पिटलजवळील सलून परिसरात घडली. या मारहाणीत वृद्धाच्या उजव्या पायाच्या कंबरेजवळील हाडाला फ्रॅक्चर झाले. किशोर गेडाम यांच्या तक्रारीवरून हिंगणघाट पोलिसांनी चौनलाल म्हैसकर याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. किशोर गेडाम हे वीज मंडळातून सेवानिवृत्त असून घरगुती इलेक्ट्रिक फिटिंग तसेच टेंडरनुसार कामे करतात. चौनलाल म्हैसकर पूर्वी त्यांच्यासोबत काम करीत होता. मात्र काम व्यवस्थित करीत नसल्याने त्याला कामे देणे बंद करण्यात आले होते. याच कारणातून म्हैसकरने गेडाम यांच्याशी वाद घातला. शिवीगाळ करून मारहाण करताना त्यांच्या उजव्या पायाला लाथ मारून जोरात ओढल्याने ते गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## स्वावलंबी मैदान परिसरात संशयास्पद हालचाल

**वर्धा :** स्वावलंबी मैदान परिसरात रात्रीच्या वेळी पानठेल्याच्या आडोशाला लपून बसलेल्या तरुणावर रामनगर पोलिसांनी कारवाई केली. तुशार नितेशराव सुटे वय २७ रा. सिंदी मेघे याच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस कर्मचारी सचिन पवार हे होमगार्ड जवानासह रात्री गस्तीवर होते. स्वावलंबी मैदानाजवळील हॅमर जिमसमोर पानठेल्याच्या आडोशाला एक व्यक्ती अंधारात लपून बसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्याच्याकडे संशयास्पद हालचालींबाबत विचारणा केली असता त्याने समाधानकारक उत्तरे दिली नाहीत. त्यानंतर पंचांसमक्ष त्याची अंगझडती घेण्यात आली. मात्र त्याच्याकडे कोणतीही संशयास्पद वस्तू आढळली नाही. चोरीसारखा दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने तो परिसरात थांबला असल्याचा पोलिसांना संशय आल्याने त्याला ताब्यात घेण्यात आले. रामनगर पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे.

## बस थांबविण्याच्या कारणावरून वाहकाला मारहाण

**देवळी :** ज्येष्ठ नागरिकांना बसमधून उतरविण्यासाठी बस थांबविल्याच्या कारणावरून वाहकाशी वाद घालून त्याला शिवीगाळ व मारहाण केल्याची घटना भिडी येथे घडली. याप्रकरणी अंकुश पांडुरंग हाडके याच्याविरुद्ध देवळी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.चंद्रप्रकाश बगाडे हे किनवट नागपूर बसचे वाहक म्हणून कार्यरत आहेत. बस कळंब मार्गे वर्ध्याकडे जात असताना हुस्नापूर टोलनाक्याजवळ दोन प्रवाशांच्या विनंतीवरून बस थांबवून त्यांना उतरविण्यात आले. त्यानंतर बस भिडी येथे थांबली असता आरोपीने टोलनाक्यावर बस का थांबविली, असा प्रश्न उपस्थित करून वाहकाशी वाद घातला. वाहकाने ज्येष्ठ नागरिक असल्याने त्यांना उतरविल्याचे सांगितले. त्यावर आरोपीने शिवीगाळ केली. बसमधून खाली उतरून दगड हातात घेऊन पुन्हा बसमध्ये चढत त्याने वाहकाला हाताबुक्क्यांनी मारहाण केली. या झटापटीत वाहकाच्या शर्टचा खिसा फाटून त्यातील पैसे खाली पडले. प्रवाशांनी पैसे गोळा करून वाहकाला दिले. सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## बसस्थानकावर महिलेच्या पर्समधून सोन्याचा हार लंपास

**वर्धा-** एसटी बसमधून प्रवास करणाऱ्या महिलेच्या पर्समधून सोन्याचा राणी हार व चैन असा एक लाख सहा हजार ४०० रुपयांचा ऐवज चोरीला गेल्याची घटना वर्धा बसस्थानकावर उघडकीस आली. याप्रकरणी वर्धा शहर पोलिसांनी अज्ञात महिलेविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.सुमित्रा मधुकर तोडसाम रा. यवतमाळ या नागपूरला जाण्यासाठी एसटी बसने प्रवास करीत होत्या. त्यांच्या पर्समध्ये छोट्या पर्समध्ये २४ ग्रॅम वजनाचा सोन्याचा राणी हार आणि चार ग्रॅम वजनाची सोन्याची चैन असा २८ ग्रॅम सोन्याचा ऐवज ठेवलेला होता. प्रवासादरम्यान मारेगाव परिसरातून एक अंदाजे २९ वर्षीय महिला तिच्या दोन मुलांसह त्यांच्या शेजारी येऊन बसली. वर्धा बसस्थानकावर बस पोहोचल्यानंतर ती महिला मुलांसह खाली उतरली. त्यानंतर तोडसाम यांनी पर्स तपासली असता छोट्या पर्समधील सोन्याचा ऐवज गायब असल्याचे निदर्शनास आले. सोन्याची किंमत प्रतिग्रॅम ३८०० रुपये असल्याने एकूण किंमत एक लाख सहा हजार ४०० रुपये आहे. वर्धा शहर पोलिसांनी चोरीचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## कपड्यांच्या दोन दुकानांत चोरी

**वर्धा :** पत्रावळी लाईन येथील अंबिका चौक परिसरातील कपड्यांच्या दोन दुकानांत अज्ञात चोरट्याने प्रवेश करून गल्ल्यातील ३८ हजार रुपयांची रोकड लंपास केली. ही घटना रात्रीच्या सुमारास घडली. याप्रकरणी वर्धा शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकी चे हे वृत्तपत्र मुद्रक,प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती -४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा ४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक -प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त)-अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष -१४ अंक -३०१
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालयः- अंबापेठ, राजकमल चौक,
अमरावती-४४४६०१
फोन -९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com
abhiramdeshpande@gmail.com

## संक्षिप्त



### कृषी विद्यार्थ्यांचा औद्योगिक संलग्नता कार्यक्रम

**नांदगाव खंडेश्वर**-पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय, अमरावती येथील कृषी विद्यार्थ्यांनी ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत आदित्य अ‍ॅग्रो उद्योग कंपनी येथे एक महिन्याच्या औद्योगिक संलग्नता कार्यक्रमात सहभाग घेतला.या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना कृषी आधारित उद्योगांची प्रत्यक्ष कार्यपद्धती, उत्पादन प्रक्रिया, व्यवस्थापन, गुणवत्ता नियंत्रण व विपणन याबाबत व्यावहारिक ज्ञान मिळवून देणे. एक महिन्याच्या कालावधीत विद्यार्थी कंपनीतील विविध विभागांना भेट देऊन उद्योगाच्या दैनंदिन कामकाजाचा प्रत्यक्ष अनुभव घेणार आहेत.या दरम्यान विद्यार्थ्यांना कृषी उत्पादनांची प्रक्रिया, पॅकेजिंग, गुणवत्ता व्यवस्थापन, बाजारपेठ, विक्री व्यवस्थापन तसेच कृषी उद्योगातील विविध संधी व आव्हाने याबाबत मार्गदर्शन मिळणार आहे. विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांशी संवाद साधून त्यांच्या शंकेचे निरसन करण्याची संधीही मिळणार आहे.या औद्योगिक संलग्नता कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानासोबत प्रत्यक्ष औद्योगिक अनुभव मिळत असून, कृषी क्षेत्रातील उद्योजकता व व्यावसायिक कौशल्यांच्या विकासास मदत होत आहे.या उपक्रमासाठी प्राचार्य डॉ. अनिल ठाकर, उपप्राचार्य नितेश चौधरी कार्यक्रम अधिकारी श्वेता देशमुख मॅडम व अदिती रजाने मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम ग्रामीण कृषी कार्यानुभव अंतर्गत राबविण्यात येत आहे.



### श्री.विठोबा संस्थानच्या विश्वस्तपदी राठोड

**चांदूर रेल्वे**-तालुक्यात कापुराची यात्रा म्हणून सर्वत्र प्रसिद्ध असलेल्या श्री क्षेत्र सावंगा (विठोबा) येथील श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थानच्या रिक्त विश्वस्त पदासाठी विष्णू किसनराव राठोड,सावंगा (विठोबा) यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. संस्थानच्या सभागृहात संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सामान्य सभेत त्यांची निवड सर्वानुमते करण्यात आली. उपस्थित ११ ही विश्वस्तांनी विष्णू किसनराव राठोड यांची नवनियुक्त विश्वस्त म्हणून सर्वानुमते निवड केली. त्यानतर त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. या सामान्य सभेला संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे, उपाध्यक्ष कृपासागर राऊत, सचिव अशोक सोनवाल यांच्यासह विश्वस्त वसंत शेंडे, गोविंद राठोड, फुलसिंग राठोड, चरणदास कांडलकर, प्रविण कुकडकर, लक्ष्मण राठोड, वैभव मानकर आणि स्वप्निल चौधरी उपस्थित होते.



### संकल्प अभियान उपक्रम

**लेहेगाव**-साफल्य विद्यालय सावरखेड पिंगळाई येथे साफल्य विद्यालयाचे मुख्याध्यापक नरेंद्र सुळे यांच्या अध्यक्षतेखाली सर्वप्रथम विद्येची आरोग्य देवता सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर सेवा संकल्प अभियान हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत विद्यालयात वर्ग ८ च्या विद्यार्थ्यांमधून प्रणिता आठवले, अदिती वानखडे, आनंदी गवळी, यश आठवले, जय बादशे, अदिती सावरकर, अदिती पांडे, वैदवी टाकोडे, आराध्या हेले, सृष्टी टारपे, भविष्य फरकाडे, सिमरन, महेरीन, खुशी ठवळी, शिवानी ढिकू, अनम, सार्थक इंगळे इत्यादींनी चित्रकला स्पर्धेमध्ये सहभाग घेतला. या चित्रकला स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक आनंदी विजय गवळी तसेच द्वितीय क्रमांक भविष्य कैलास फरकाडे या दोन्हीही विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक, शिक्षक व माता - पालक यांनी हार्दिक अभिनंदन केले. पाल्यांच्या अध्ययन निष्पत्ती बाबत विचार विनिमय करण्यात आला. माता पालक सभेमध्ये मंजुळा वानखडे, कविता आठवले, सुनिता मिसळकर, शाहिस्ता परवीन, तबसुमनाग इत्यादी पालक महिला उपस्थित होत्या. हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वी होण्याकरता विद्यालयातील सहाय्यक शिक्षक श्रीराम गुंजीटे, दर्शना कातलाम, योगिता हिरुळकर, प्रयोगशाळा परिचर राजेश मालपे, बि. ओ.ठाकुर यांनी प्रयत्न केले.

# आश्रमातील व्यावसायिकांना मोठा दिलासा, महोत्सवापर्यंत कारवाई नाही

## गुरुकुंज येथे आ.राजेश वानखडे यांचे स्थानिक दुकानदार व व्यावसायिकांना आश्वासन

**तिवसा/वार्ताहर**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या गुरुकुंज आश्रमासमोरील व लगतच्या राष्ट्रीय महामार्गालगत व्यवसाय करणाऱ्या स्थानिक दुकानदार व व्यावसायिकांची स्थायी तसेच अस्थायी अतिक्रमणे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथी महोत्सवाची यात्रा संपन्न होईपर्यंत काढण्यात येणार नाहीत, असे आश्वासन आ.राजेश वानखडे यांनी स्थानिक व्यावसायिकांना दिले.

गुरुकुंज मोझरी येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त दरवर्षी मोठ्या संख्येने भाविक व यात्रेकरू दाखल होतात. महोत्सवाच्या काळात अनेक दिवस मोझरी येथे भाविकांची मोठी वर्दळ असते. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या माध्यमातून या मार्गाच्या सुधारणा व विकासकामासाठी निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

या कामाच्या अनुषंगाने राष्ट्रीय महामार्गालगत व्यवसाय करणाऱ्या काही दुकानदार व व्यावसायिकांना त्यांच्या स्थायी-अस्थायी अतिक्रमणांबाबत नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. त्यामुळे स्थानिक व्यावसायिकांमध्ये चिंता निर्माण झाली होती. याबाबत व्यावसायिकांनी आ. राजेश वानखडे यांची भेट घेऊन पुण्यतिथी महोत्सवाची यात्रा संपन्न होईपर्यंत अतिक्रमणाची कारवाई करू नये, अशी मागणी केली.



या मागणीची तत्काळ दखल घेत आमदार राजेश वानखडे यांनी गुरुकुंज मोझरी येथे प्रत्यक्ष भेट देऊन स्थानिक दुकानदार व व्यावसायिकांशी चर्चा केली. तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या संबंधित अधिकाऱ्यांशीही प्रत्यक्ष चर्चा करून पुण्यतिथी महोत्सवाची यात्रा संपन्न होईपर्यंत स्थानिक व्यावसायिकांवर अतिक्रमण काढण्याची कारवाई करण्यात येणार नाही, असे स्पष्ट आश्वासन दिले.

दरम्यान, राष्ट्रीय महामार्गाचे प्रस्तावित सुधारणा काम देखील आवश्यक असल्याचे आमदार वानखडे यांनी स्पष्ट केले. आश्रमासमोरील भुयारी मार्ग सध्याच्या रस्त्याच्या पातळीपेक्षा सुमारे तीन फूट खाली असल्याने भविष्यात या ठिकाणी आवश्यक सुधारणा व सुरक्षिततेच्या दृष्टीने काम करणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रत्यक्ष काम सुरू होण्यास अद्याप काही कालावधी असल्याने स्थानिक व्यावसायिकांना तूर्तास कोणताही त्रास होणार नाही. मात्र भविष्यात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणामार्फत प्रत्यक्ष काम सुरू करताना स्थानिक दुकानदार व व्यावसायिकांचे व्यवसाय पूर्णपणे विस्थापित होऊ नयेत, त्यांच्या उपजीविकेवर परिणाम होऊ नये आणि त्यांना योग्य पर्यायी व्यवसायाची व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी शासनस्तरावर आवश्यक पाठपुरावा केला जाईल, असेही आमदार राजेश वानखडे यांनी यावेळी आश्वस्त केले.

स्थानिक व्यावसायिकांनी आ.राजेश वानखडे यांनी आपल्या मागणीची तत्काळ दखल घेत पुढाकार घेतल्याबद्दल त्यांचे आभार मानले. तसेच भविष्यात रस्ते विकासाचे काम करताना स्थानिक व्यावसायिकांच्या व्यवसायाचे नुकसान होणार नाही आणि त्यांच्यासाठी पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

## धामणगाव नगर परिषदेमध्ये पर्यावरणपूरक गणेश विसर्जन

**धामणगाव रेल्वे/वार्ताहर**

नगर परिषद धामणगाव रेल्वे यांच्या वतीने 'माझी वसुंधरा अभियान ७.०' आणि 'स्वच्छता हि सेवा २०२६' अंतर्गत यावर्षी शहरात व्यापक स्वरूपात पर्यावरणपूरक घरगुती गणपती सजावट स्पर्धा आणि पर्यावरणपूरक गणेश विसर्जन स्पर्धा २०२६ चे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. शहरातील नागरिकांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जनजागृती व्हावी आणि उत्सवाचा आनंद निसर्गाला हानी न पोहोचवता घेता यावा, या उद्देशाने नगर परिषदेच्या अध्यक्ष डॉ.अर्चना अडसड (रोठे), उपाध्यक्ष गिरीश मुंढडा, सभापती हेमकरण कांकरिया आणि मुख्याधिकारी श्रीमती पूनम कळबे यांनी या संपूर्ण संकल्पनेचे नियोजन करून हा उपक्रम



शहरात राबवला. नोडल अधिकारी तथा आरोग्य विभाग प्रमुख आकाश सोनेकर यांनी संपूर्ण कार्यक्रम यशस्वी केला.

उत्सवादरम्यान नदी, तलाव किंवा इतर नैसर्गिक जलस्रोत दूषित होऊ नयेत म्हणून नगर परिषदेच्या वतीने विशेष निर्माल्य संकलन रथ घरोघरी पाठवण्यात आले होते. या संकलित निर्माल्यापासून सेंद्रिय खत तयार करण्यात येणार असल्याची माहिती मिळते आहे तसेच विसर्जनासाठी शहरात लूनावत नगर आणि दत्तापूर येथील सराफा गार्डन येथे विशेष कृत्रिम तलाव कुंड व निर्माल्य कलश तयार करण्यात आले होते. धामणगाव शहरातील तब्बल ५१० सुज्ञ भाविकांनी आपल्या लाडक्या बाप्पाचे विसर्जन या कृत्रिम तलावांमध्ये करून समाजासमोर एक आदर्श वस्तुपाठ घालून दिला आहे व या उपक्रमाचे शहरात कौतुक केल्या जात आहे.

कृत्रिम तलावात विसर्जन करणाऱ्या सर्व भाविकांना प्रोत्साहनपर प्रमाणपत्रे तिथेच दिले गेले असुन नागरिकांच्या प्रतिक्रिया सुद्धा घेण्यात आल्या व नागरिकानी सदर उपक्रमाला चांगल्या प्रतिक्रिया दिलेल्या असुन धामणगाव रेल्वे नगर परिषदेच्या या पर्यावरणस्नेही उपक्रमाचे आणि नागरिकांच्या या अभूतपूर्व प्रतिसादाचे संपूर्ण अमरावती जिल्ह्यातून कौतुक होत आहे या कार्यक्रम यशस्वी करण्यात करिता अध्यक्ष सौ अर्चनाताई अड़सड सर्व पदाधिकारी मुख्याधिकारी श्रीमती पूनम कळबे नोडल अधिकारी आकाश सोनेकर व त्यांची टीम तसेच सर्व अधिकारी कर्मचारी यांचे मोलाचे योगदान आहे.

## गो.सी.टोम्पे महाविद्यालयात भव्य रक्तदान शिबिर



**चांदूर बाजार/वार्ताहर**

गो. सी. टोम्पे महाविद्यालय, चांदूर बाजार येथे गणेश उत्सवानिमित्त सामाजिक बांधिलकी ठेवत राष्ट्रीय सेवा योजना (NSS), NCC कॅडेट्स, स्व. श्री. केशवदादा टोम्पे मोफत फिजिकल अकॅडमी संलग्नित श्री हनुमान क्रीडा मंडळ, चांदूर बाजार यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला विद्यार्थी, खेळाडू, ण्ण कॅडेट्स तसेच नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत तब्बल ६५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष भास्करराव टोम्पे, सचिव डॉ विजयराव टोम्पे, वैष्णवी सलामे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ राजेंद्र रामटेके, उपप्राचार्य डॉ नंदकिशोर गव्हाळे, डॉ संजय शेजवं, डॉ मनीष सावरकर सुमतीदेवी टोम्पे इन्स्टिटयूट ऑफ फार्मासिटिकल सायन्स अँड रिसर्च चे प्राचार्य राहुल जोध, निर्मिती पब्लिक स्कूल चे प्राचार्य श्री तुषार खोंड पत्रकार,सागर सवळे, मदन भाऊ भाटे, शरद केदार यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वी करण्यासाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच रासेयो स्वयंसेवक यांनी अथक प्रयत्न केले ,श्री बंटी भाऊ पिहूलकर ,गोपाळ सूरकर ,प्रज्वल पवार (रासेयो स्वयंसेवक ) इत्यादींनी विशेष परिश्रम घेतले. डॉ. पंजाबराव वैद्यकीय महाविद्यालय अमरावती येथील रक्तपेढी च्या अधिकाऱ्यांनी रक्त संकलनाचे कार्य पार पाडले. ६५ रक्तदात्यांचे रक्तदान अनेकांच्या जीवनासाठी आशेचा किरण ठरवून गो सी टोम्पे महाविद्यालयचे कौतुक होऊन त्यांच्या कार्याला सलाम करण्यात येत आहे.

## सेवा संकल्प अभियाना'अंतर्गत प्रलंबित कामांना गती

**अमरावती**-प्रशासकीय कामकाजात गती आणि पारदर्शकता आणण्याच्या उद्देशाने आणि महावितरणच्या तांत्रिक कर्मचाऱ्यांना ग्राहक सेवेवर लक्ष केंद्रीत करता यावे. यासाठी परिमंडळात महावितरणतर्फे राबविण्यात येत असलेल्या सेवा संकल्प अभियानात मानव संसाधन विभागाशी निगडित कर्मचाऱ्यांची प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याची माहिती मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी दिली. सेवा संकल्प अभियानादरम्यान मुख्य अभियंता दिलीप दोडके यांच्या मार्गदर्शनात आणि सहाय्यक महाव्यवस्थापक रूपेश देशमुख यांच्या पुढाकाराने परिमंडळातील कर्मचाऱ्यांच्या विविध सेवाविषयक बाबींवर प्राधान्याने कार्यवाही केली जाणार आहे.जेणेकरून कर्मचाऱ्यांचा या कामासाठी कार्यालयात येण्याची गरज राहणार नाही. त्यामुळे त्यांना आपला पूर्ण वेळ ग्राहक सेवेसाठी देता येणार आहे. यामध्ये सप्टेंबर २०२६ पर्यंत उच्चवेतन श्रेणीच्या लाभासाठी पात्र ठरणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांची प्रकरणे सांघिक कार्यालयाच्या परिपत्रकानुसार विहित मार्गाने निकाली काढली जातील. याशिवाय कागदपत्रांच्या अभावी अपूर्ण किंवा प्रलंबित असलेली अनुकंपा तत्त्वावरील नियुक्तीची प्रकरणे आणि मासिक निर्वाह भत्त्याची प्रकरणे संबंधितांना योग्य ते मार्गदर्शन करून सक्षम अधिकाऱ्यांकडे मंजुरीसाठी सादर केली जाणार आहेत. या कामामुळे कर्मचाऱ्यांचे अनेक प्रलंबित प्रश्न सुटून प्रशासकीय कामाला मोठा वेग मिळणार असल्याची माहिती यावेळी महावितरणने दिली.

# श्री मारोती देवस्थानच्या शेतजमिनीवरील खरेदीचा प्रयत्न फेटाळला

## मंदिर महासंघाच्या पाठपुराव्याला यश; कोट्यवधींची जमीन सुरक्षित

**अमरावती/वार्ताहर**

शेंदुरजना बाजार (ता. तिवसा, जि. अमरावती) येथील श्री मारोती देवस्थानच्या मालकीची शेतजमीन कुळ कायद्याअंतर्गत खरेदी करण्यासाठी दाखल करण्यात आलेला अर्ज चांदूर रेल्वेच्या तहसीलदार तथा शेतजमीन न्यायाधिकरणाने फेटाळून लावला आहे. महाराष्ट्र मंदिर महासंघाने या प्रकरणात घेतलेल्या भूमिकेमुळे देवस्थानच्या जमिनीचा हक्क कायम राहिला असल्याचे सांगण्यात आले.

श्री मारोती देवस्थानच्या मालकीची चांदूर रेल्वे (भाग-१) येथील गट क्रमांक ६३ मधील ०.७९ हेक्टर शेतजमीन आहे. सदर जमीन नगरपरिषद हद्दीत येत असल्याने तिचे बाजारमूल्य मोठे असल्याचे सांगण्यात येते. या जमिनीवर कुळ कायद्यानुसार खरेदी हक्क मिळावा, यासाठी दामोदर रामभाऊ नागमोते यांनी चांदूर रेल्वेचे तहसीलदार तथा शेतजमीन न्यायाधिकरण यांच्याकडे अर्ज दाखल केला होता. त्यानुसार खरेदी प्रक्रियेला सुरुवात झाली होती.

ही बाब निदर्शनास आल्यानंतर महाराष्ट्र मंदिर महासंघाचे राज्य पदाधिकारी अनुप जयस्वाल आणि विनीत पाखोडे यांनी या प्रकरणात पाठपुरावा केला. त्यांनी अतिरिक्त गैरअर्जदार म्हणून न्यायालयीन प्रक्रियेत हरकत नोंदवली. देवस्थान हे नोंदणीकृत धार्मिक संस्थान असून, उपविभागीय अधिकारी यांच्या १४ जून १९६० रोजीच्या आदेशानुसार सदर जमीन कुळ कायद्याच्या कलम १२९ (ब) अंतर्गत सूट प्रमाणपत्रास पात्र असल्याचे कागदपत्रांसह मांडण्यात आले. त्यामुळे प्रस्तावित खरेदी प्रक्रिया रद्द करण्याची मागणी करण्यात आली.

या प्रकरणातील कागदपत्रे आणि दोन्ही बाजूंचे म्हणणे तपासल्यानंतर तहसीलदार पूजा एस. माटोडे यांनी २७ ऑगस्ट २०२६ रोजी निर्णय दिला. देवस्थानच्या जमिनीला संबंधित कुळ हक्क लागू होत नसल्याचे तसेच अर्जदार हा मूळ कुळाचा कायदेशीर वारस असल्याचे सिद्ध झाले नसल्याचे नमूद करत खरेदी हक्काचा अर्ज नामंजूर करण्यात आला. या निर्णयामुळे श्री मारोती देवस्थानच्या जमिनीवरील प्रस्तावित खरेदी प्रक्रिया थांबली असून देवस्थानच्या मालमत्तेचा हक्क कायम राहिला आहे. या निर्णयाचे देवस्थानचे विश्वस्त आणि भाविकांनी स्वागत केले आहे. या प्रकरणातील कार्यवाहीत महाराष्ट्र मंदिर महासंघाचे राज्य पदाधिकारी अनुप जयस्वाल व विनीत पाखोडे यांच्यासह देवस्थानचे विश्वस्त सतीश सावरकर, प्रफुल्ल उमप, राजेंद्र सावरकर, वामनराव भोजने, भास्करराव बोडखे, जगदीश काळे, प्रविण भोजने, ओंकार देवळे, श्रीराम लोखंडे, सुधाकरराव सोनटक्के, रामकृष्ण ओलीवकर आणि प्रमोद निमकर यांचे योगदान राहिले असल्याचे



देवस्थानच्या वतीने सांगण्यात आले.देवस्थानच्या मालमत्तेच्या संरक्षणासाठी झालेल्या या कार्यवाहीमुळे भाविकांमध्ये समाधानाचे वातावरण असून, पुढील काळातही देवस्थानच्या मालमत्तेच्या संरक्षणासाठी कायदेशीर मार्गाने प्रयत्न सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

## भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालयात परिसर स्वच्छता अभियान




**परतवाडा**-राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनानिमित्त भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय, परतवाडा येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनाचे औचित्य साधून महाविद्यालय परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानामध्ये विद्यार्थी व स्वयंसेवकांनी महाविद्यालयाचा परिसर, आवारातील विविध भाग तसेच आजूबाजूचा परिसर स्वच्छ केला. परिसरातील कचरा, प्लास्टिक व इतर अनावश्यक वस्तू संकलित करून त्याची योग्य विल्हेवाट लावण्यात आली. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष श्रमदान करून 'स्वच्छ परिसर, सुंदर परिसर' हा संदेश दिला.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेबरोबरच सामाजिक बांधिलकी, श्रमप्रतिष्ठा, पर्यावरण संवर्धन आणि सार्वजनिक ठिकाणांची जबाबदारी याबाबत जागृती करण्यात आली.या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. दयाश्री कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली, प्रा. प्रीती नवरे आणि डॉ. स्वाती वानखडे यांच्या मार्फत राबवण्यात आला. कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल खांडेकर यांचे मार्गदर्शन लाभले.राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनानिमित्त राबविण्यात आलेल्या या स्वच्छता अभियानामुळे महाविद्यालय परिसर स्वच्छ व नीटनेटका होण्यास मदत झाली. तसेच विद्यार्थ्यांमध्ये 'सेवा हीच साधना' आणि 'Not Me But You' या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विचारांची रुजवण झाली. कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

## १० एकर सोयाबीनवर फिरवला रोटावेटर

**बोलोरा**-चांदूर बाजार तालुक्यातील चिंचोली काळे येथील शेतकरी निलेश उर्फ मुन्ना सुभाष चापले यांनी पाण्याअभावी करपून गेलेल्या तब्बल १० एकर सोयाबीन पिकावर अखेर ट्रॅक्टरच्या साहाय्याने रोटावेटर फिरवून पीक मोडून टाकले. या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. मात्र, वेळेवर पाणी उपलब्ध न झाल्याने सोयाबीनचे पीक करपून गेले. त्यामुळे नाईलाजास्तव त्यांनी रोटावेटर फिरवून पीक नष्ट केले. शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असून, शासनाने या नुकसानीची तातडीने पाहणी करून पंचनामा करावा आणि संबंधित शेतकऱ्याला आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी होत आहे. परिसरातील शेतकऱ्यांवर या पार्श्वभूमीवर लोकप्रतिनिधींनी घटनास्थळी भेट देऊन शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घ्याव्यात तसेच संबंधित शासकीय अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून नुकसानीचा अहवाल तयार करावा, अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.



## राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिन सामाजिक उपक्रमांनी साजरा



**चांदूर रेल्वे** - राजर्षी शाहू सायन्स कॉलेज, चांदूर रेल्वे येथील राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबवून राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन उत्साहात साजरा करण्यात आला.केंद्र शासनाच्या युवा व्यवहार व क्रीडा मंत्रालयाच्या वतीने आयोजित 'विकसित भारत युवा नेते संवाद २०२७' या उपक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी नोंदणी करून प्रश्नमंजुषेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनाचे महत्त्व, तसेच यावर्षीची 'विकसित भारतासाठी व्यसनमुक्त युवा व आत्मनिर्भर भारतासाठी तरुण' ही संकल्पना याबाबत राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.जी.बी. संतापे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.आर.वडनेरकर होते. यावेळी ँ समन्वयक प्रा. सुरेंद्र वाणी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मूकबधिर विद्यालयाचे मुख्याध्यापक यांचे स्वागत कार्यक्रम अधिकारी डॉ. जी. बी. संतापे यांनी रोपटे देऊन केले. तसेच महिला कर्मचाऱ्यांचे स्वागत महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. रोशनी भगत यांनी रोपटे देऊन केले.राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी सामाजिक बांधिलकी जपत राबविलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

# वृक्षतोड प्रकरणी कंत्राटदाराला दिड लाखांचा दंड

## २५० नविन झाडे लावण्याचे आदेश



**खल्लार/प्रतिनिधीः-** सिव्हिल लाईन हनुमान व्यायाम शाळेतील १७ झाडांच्या बेकायदेशीर कत्तल प्रकरणी दर्यापूर नगरपालिकेने अखेर मोठी कारवाई केली आहे. या प्रकरणातील दोषी कंत्राटदाराला दिड लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला असून २५० नविन झाडे लावण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

मागिल काही दिवसांपासून हे प्रकरण चांगलेच गाजले होते. वृक्ष प्राधिकरण समिती अस्तित्वात नसताना आणि कोणताही ठराव नसताना केवळ वृक्ष छटाईच्या टेंडरचा आधार घेऊन मोठ्या झाडांची कत्तल करण्यात आली होती. यामध्ये लाखो रुपयांचे लाकूड एका नगरसेवकाच्या टालवर विकल्याचा आरोप झाला होता. जलवृक्ष चळवळीसह काँग्रेस, हनुमान व्यायाम शाळा यांसह ९ संघटना आणि पक्षांनी याबाबत आक्रमक भूमिका घेत तक्रारी केल्या होत्या. या वाढत्या दबावानंतर पालिका प्रशासनाने १९७५ च्या वृक्ष संवर्धन कायद्यांतर्गत चौकशी सुरू केली होती. या चौकशीअंती सिव्हिल लाईन परिसरातील १७ वृक्ष विनपरवाना तोडल्याचे आढळल्याने कंत्राटदार दोषी आढळल्याने ही कारवाई करण्यात आली आहे. पालिकेने कंत्राटदाराला दिड लाख रुपयांचा दंड भरण्याचे आदेश दिले असून शहरात २५० देशी प्रजातीची नविन झाडे लावून त्यांचे तीन वर्ष संगोपन करण्याची जबाबदारीही त्याच्यावर टाकण्यात आली आहे. यापुढे शहरात कोणतीही बेकायदेशीर वृक्षतोड झाल्यास संबंधितांवर कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा पालिका प्रशासनाने दिला आहे. या कारवाईमुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले असले तरी ☞(पान २ वर)

### नगरसेवकांना वाचविण्याचे काम

दर्यापूर पालिका प्रशासनाने वृक्षतोडीच्या मागे असलेल्या चार नगरसेवकांना वाचविण्याचे काम केले आहे. वृक्षतोडीसाठी कंत्राटदार जबाबदार नसून त्याला तोंडी आदेश देणारे चार नगरसेवकांवर नगरपालिका प्रशासन काय कारवाई करणार ? याबाबत स्पष्टता का नाही? ही चौकशी ही केवळ थातूरमातूर मलमपट्टी असून विनापरवाना वृक्षतोड झाल्याचे सिद्ध झाल्यानंतर ही पालिका प्रशासनाने याबाबत एफआयआर नोंद का केला नाही , आम्ही स्वस्थ बसणार नाही आंदोलन करु.

**आतिश शिरभाते,** जिल्हा सचिव -काँग्रेस कमिटी, अमरावती.

सिव्हिल लाईन परिसरातील वृक्षतोडीवर पालिका प्रशासनाने चौकशी केल्या वर कंत्राटदाराला १लाख २६ हजार रुपये दंड करण्यात आला आहे. सदर दंडाची रक्कम पालिकेत भरण्यास सांगितली आहे. त्यानुसार कंत्राटदाराने ही रक्कम पालिकेत भरली आहे. पुढील काळात वृक्षतोडी संबंधात पालिका प्रशासन कडक धोरण पाळणार असून याबाबत प्रशासन लक्ष देणार आहे. पुढील काळात नगरपालिका क्षेत्रात वृक्षतोड होणार नाही याबाबतची काळजी घेतली जाईल.

**-डॉ. विकास खंडारे** -मुख्याधिकारी, नगरपालिका दर्यापूर

# ट्रिगर दाबला गेल्याने गोळी सुटून तरुण जखमी

## गाडगेनगर पोलिसांकडून गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** परवानाप्राप्त बंदूक साफ करताना अचानक ट्रिगर दाबला गेल्याने गोळी सुटून बंदूकधारी तरुणच जखमी झाल्याची घटना वलगाव रोडवरील अमन पॅलेससमोर घडली. या घटनेत रिजवान खान मुस्ताकखान (वय ३१, रा. न्यू आझाद कॉलनी) याच्या उजव्या हाताला गोळी लागली. सुदैवाने या घटनेत अन्य कोणी जखमी झाले नाही.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २५ सप्टेंबर रोजी सकाळी सुमारे ११ वाजता रिजवान हा अमन पॅलेससमोर मित्राच्या वाहनाजवळ बसला होता. त्याच्याकडे परवानाप्राप्त बंदूक होती. बंदूक साफ करण्यासाठी त्याने ती बाहेर काढली. साफसफाई सुरू असतानाच अचानक बंदुकीतून गोळी सुटली आणि ती थेट रिजवानच्या उजव्या हातात घुसली. गोळीबाराचा आवाज होताच परिसरात काही काळ खळबळ उडाली. घटनेच्या वेळी उपस्थित असलेल्या इरफान अहमद यांनी तातडीने जखमी रिजवानला खासगी रुग्णालयात दाखल केले. त्याच्यावर उपचार सुरू करण्यात आले.

### घटनास्थळी रिकामे काडतूस-

घटनेची माहिती मिळताच गाडगेनगर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. पोलिसांनी घटनास्थळावरून गोळीबारानंतरचे रिकामे काडतूस जप्त केले. बंदूक साफ करताना नेमकी कोणती प्रक्रिया करण्यात आली आणि त्यातून गोळी कशी सुटली, याबाबत पोलिसांकडून तपास करण्यात येत आहे. या प्रकरणी गाडगेनगर पोलिसांनी रिजवान खान याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ठाणेदार गोरखनाथ जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

# वर्षभर रखडलेल्या ४.२० कोटींच्या विकासकामांना अखेर मुहूर्त

## अंजनगाव सुर्जीकरांना दिलासा

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** अंजनगाव सुर्जी शहरात गेल्या अनेक दिवसांपासून रखडलेल्या विकासकामांना अखेर सुरुवात झाली आहे. नगरपरिषदेच्या वतीने अंदाजे ४ कोटी २० लाख रुपयांच्या विविध विकास कामांना एक वर्षानंतर प्रारंभ करण्यात आला असून, शहरातील रस्त्यांची दुरवस्था आणि सांडपाणी नाल्यांच्या अभावाची गंभीर समस्या आता मार्गी लागण्याची चिन्हे दिसत आहेत.शहरातील अनेक रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झाली होती. खड्डेमय रस्त्यांमुळे वाहनचालकांसह पादचाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. पावसाळ्यात तर परिस्थिती अधिकच बिकट होत होती. रस्त्यांवर पाणी साचून चिखलाचे साम्राज्य पसरत होते. त्याचबरोबर अनेक ठिकाणी सांडपाणी वाहून जाण्यासाठी नाल्या नसल्याने सांडपाणी थेट रस्त्यावर साचत होते, त्यामुळे दुर्गंधी पसरून आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता.



दरम्यान, नगरपरिषदेत नवी सत्ता स्थापन झाल्यानंतर महत्त्वाच्या ठिकाणांच्या कामांना सर्वानुमते प्राधान्य देण्यात आले असून, विकासकामे युद्धपातळीवर सुरू करण्यात आली आहेत. या कामांमध्ये रस्ते दुरुस्ती, नवीन रस्ते बांधकाम तसेच सांडपाणी वाहून नेणाऱ्या नाल्यांचे बांधकाम यांचा समावेश आहे.जुडवा शहरातील अंजनगाव व सुर्जी शहराला जोडणारा महत्त्वाचा रस्ता, आठवडी बाजार पासून सुर्जी शहरात जाणाऱ्या रस्त्याचे काम सुरू करण्यात आल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. या निर्णयाबद्दल☞(पान २ वर)

# शेतातील कुंपणातून आठ जनावरे लंपास करणारी टोळी जेरबंद

## -एलसीबीची कारवाई; पाच आरोपी अटक

**मोर्शी/प्रतिनिधीः-** शेतातील कुंपणात बांधलेल्या म्हशी व हेला चोरी करून त्यांची मध्य प्रदेशातील जनावरांच्या बाजारात विनापावती विक्री करणाऱ्या टोळीचा अमरावती ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला. या कारवाईत पोलिसांनी पाच आरोपींना अटक केली असून, त्यांच्याकडून ७५ हजार ३०० रुपये रोख, चार मोबाईल आणि गुन्ह्यात वापरलेले बोलेरो पिकअप वाहन, असा एकूण ६ लाख ९ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मोर्शी तालुक्यातील पाळा शेतशिवारात ही चोरी झाली होती. याप्रकरणी पेठपुरा, मोर्शी येथील गजानन महादेव सोनुले यांनी ११ मे रोजी मोर्शी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यांच्या शेतातील कुंपणात बांधलेल्या १२ म्हशींपैकी सात म्हशी व एक हेला, अशी आठ जनावरे अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली होती. चोरीला गेलेल्या जनावरांची किंमत सुमारे १ लाख २० हजार रुपये होती. या तक्रारीवरून मोर्शी पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. या गुन्ह्याचा समांतर तपास अमरावती ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेकडून सुरू होता. गोपनीय माहिती, तांत्रिक तपास आणि उपलब्ध माहितीच्या आधारे पोलिसांना चोरीच्या गुन्ह्यात अमरावतीतील यास्मिन नगर येथील अब्दुल आवेज अब्दुल अनिस (वय २५) याचा सहभाग असल्याची माहिती मिळाली. त्याला अमरावतीतून ताब्यात घेऊन पोलिसांनी चौकशी केली. सुरुवातीला ☞(पान २ वर)

# पीडित महिलेचे एसडीओ कार्यालयासमोर उपोषण

## उपविभागीय अधिकाऱ्यांची आंदोलनस्थळी भेट

**अचलपूर/प्रतिनिधीः-** कवठा बु. ग्रामपंचायत कार्यालयात तक्रार निवारण शिबिरादरम्यान महिलेला मारहाण, जातीवाचक व अपमानास्पद शिवीगाळ तसेच अंगावरील कपडे काढण्याचा प्रयत्न केल्याचा गंभीर आरोप करण्यात आलेल्या प्रकरणाने आता चांगलेच वळण घेतले आहे. या प्रकरणातील उर्वरित पाच जणांची नावे गुन्ह्यात समाविष्ट करावीत, या मागणीसाठी पीडित महिलेने अचलपूर येथील उपविभागीय अधिकारी (एसडीओ) कार्यालयासमोर सुरू केलेले उपोषण सातव्या दिवशीही सुरूच आहे. प्रशासनाकडून ठोस कार्यवाहीची प्रतीक्षा असताना काल उपविभागीय अधिकारी बळवंतराव अरखराव यांनी उपोषणस्थळी भेट देऊन महिलेची बाजू ऐकून घेतली.



२८ जुलै २०२६ रोजी कवठा बु. ग्रामपंचायत कार्यालयात तक्रार निवारण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संबंधित महिलेवर काही व्यक्तींनी हल्ला करून मारहाण केली, जातीवाचक व अपमानास्पद शिवीगाळ केली तसेच अंगावरील कपडे काढण्याचा प्रयत्न करून विनयभंग केल्याचा आरोप महिलेने केला आहे. घटनेच्या वेळी ग्रामपंचायत कर्मचारी तसेच सुमारे ४० ते ५० ग्रामस्थ उपस्थित असल्याचेही तक्रारदार महिलेने आपल्या निवेदनात नमूद केले आहे. या घटनेप्रकरणी परतवाडा पोलीस ठाण्यात चार आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे तक्रारदार महिलेचे म्हणणे आहे. मात्र, आपल्या तक्रारीत स्पष्टपणे नमूद केलेल्या आणखी पाच व्यक्तींची नावे ईईं मध्ये समाविष्ट करण्यात आली नसल्याचा आक्षेप महिलेने घेतला आहे. त्यामुळे संबंधित पाच जणांची नावे गुन्ह्यात समाविष्ट करून संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करावी, अशी तिची मागणी आहे.

याच मागणीसाठी महिलेने एसडीओ कार्यालयासमोर उपोषणाचे हत्यार उपसले आहे. उपोषणाला सात दिवस उलटूनही अपेक्षित कार्यवाही न झाल्याने ☞(पान २ वर)

# भातकुली आश्रमशाळेत विद्यार्थिनीचे मृत्यू प्रकरणः

## प्रकल्प अधिकाऱ्यांकडून चौकशी सुरु

**अमरावती/प्रतिनिधीः-** भातकुली येथील अनुदानित आश्रमशाळेत वास्तव्यास राहून शिक्षण घेणाऱ्या पाचवीतील आदिवासी विद्यार्थिनीचा अचानक मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. मेळघाटातील राणीगाव येथील रहिवासी असलेल्या या विद्यार्थिनीची आश्रमशाळेत असतानाच प्रकृती बिघडल्याचे सांगण्यात येत असून, त्यानंतर तिचा मृत्यू झाला. मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून, या घटनेची प्रकल्प अधिकाऱ्यांमार्फत चौकशी सुरू करण्यात आली आहे.

राणीगाव येथील ही विद्यार्थिनी भातकुली येथील अनुदानित आश्रमशाळेत राहून पाचवीचे शिक्षण घेत होती. आश्रमशाळेत असताना तिची प्रकृती अचानक बिघडली. त्यानंतर तिच्यावर उपचार करण्यात आले; मात्र तिचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच कुटुंबीयांना मोठा धक्का बसला. विद्यार्थिनीच्या मृत्यूची माहिती राणीगाव येथे पोहोचताच गावात शोककळा पसरली. आमदार केवलराम काळे यांनी राणीगाव येथे जाऊन मृत विद्यार्थिनीच्या कुटुंबीयांची भेट घेतली. त्यांनी कुटुंबीयांचे सांत्वन करून घटनेची माहिती जाणून घेतली. दरम्यान, मृत विद्यार्थिनीच्या कुटुंबीयांना एक लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात आल्याची माहिती आहे. ही मदत कोणत्या यंत्रणेमार्फत देण्यात आली, याबाबत अधिकृत तपशील मात्र स्पष्ट झालेला नाही.

**चौकशीनंतर मृत्यूचे कारण स्पष्ट होणार-** आश्रमशाळेत विद्यार्थिनीचा अचानक मृत्यू झाल्याने तिची प्रकृती बिघडण्यामागील☞(पान २ वर)

‘भातकुली येथील अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थिनीच्या मृत्यूची प्रकल्प अधिकारी यांच्यामार्फत चौकशी करण्यात येत आहे. विद्यार्थिनीच्या मृत्यूचे नेमके कारण चौकशीनंतर स्पष्ट होईल. चौकशीअंती प्राप्त होणाऱ्या अहवालानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.’ **-श्रीकांत ढोके, उपायुक्त**

# ‘सेवा संकल्प अभियान’अंतर्गत कचऱ्याची विशेष मोहीम पूर्ण

## विविध प्रभागांमध्ये मनपाची कारवाई; अतिरिक्त कचरा वाहनांची व्यवस्था करून संकलित

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या निर्देशानुसार १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत संपूर्ण राज्यात ‘सेवा संकल्प अभियान’ राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या अनुषंगाने अमरावती महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागाच्या वतीने शहरातील विविध भागांमध्ये घरोघरी साचलेल्या कचऱ्याची उचल करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत संबंधित प्रभागांमध्ये प्रत्यक्ष पाहणी करून घरांमध्ये व परिसरात साचलेला कचरा संकलित करण्यात आला. नियोजनबद्ध पद्धतीने राबविण्यात आलेल्या या विशेष मोहिमेमुळे संबंधित परिसरातील स्वच्छता व्यवस्थेला मोठी गती मिळाली आहे.



महानगरपालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांच्या नेतृत्वाखाली ही विशेष मोहीम राबविण्यात आली. स्वच्छता व्यवस्थेतील अधिकारी, स्वच्छता निरीक्षक, बिटप्यून, सफाई कर्मचारी तसेच कचरा संकलन☞(पान २ वर)

# शोभायात्रेत शॉक लागून युवकाचा मृत्यू

**अचलपूर/प्रतिनिधीः-** परतवाडा शहरातील सदर बाजार परिसरात १३ सप्टेंबर रोजी आयोजित गणपती आगमन शोभायात्रेत वीजप्रवाहाच्या (करंट) संपर्कात आल्याने गंभीर जखमी झालेल्या गणेश शंकर पवार (वय १८, रा. खरपी) या युवकाची गेल्या १४ दिवसांपासून मृत्यूशी सुरू असलेली झुंज अखेर अपयशी ठरली. २७ सप्टेंबर रोजी उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात तीव्र शोककळा पसरली असून उत्सवातील सुरक्षेच्या मुद्द्यावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, १३ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७:०० ते ७:३० वाजताच्या सुमारास सदर बाजार परिसरातून गणपती आगमनाची भव्य शोभायात्रा निघली होती. या शोभायात्रेत ढोल-ताशांचा गजर, भजन आणि आकर्षक रोषणाई (लायटिंग) करण्यात आली होती. हा नयनरम्य सोहळा पाहण्यासाठी खरपी येथील रहिवासी असलेला १८ वर्षीय गणेश शंकर पवार हा युवक आला होता. शोभायात्रा सुरू असतानाच, अचानक लायटिंगच्या उघड्या किंवा लटकत्या विद्युत तारांचा स्पर्श गणेशला झाला. विजेचा तीव्र झटका बसल्याने तो जागीच कोसळला. उपस्थित नागरिकांनी क्षणाचाही विलंब न लावता त्याला तात्काळ स्थानिक खाजगी रुग्णालयात दाखल केले. शहरातील रूग्णालयात प्राथमिक उपचार केल्यानंतर गणेशची प्रकृती चिंताजनक असल्याने त्याला अमरावती येथील खाजगी रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र तेथेही प्रकृतीत अपेक्षित सुधारणा न झाल्याने त्याला तातडीने नागपूर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. नागपूर येथे उपचार सुरू असताना गणेशचे शरीर उपचारांना योग्य प्रतिसाद देत नव्हते. अखेर हताश झालेल्या नातेवाईकांनी त्याला पुन्हा परतवाडा येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी ☞(पान २ वर)

# समता मार्केटमध्ये घाणीचे साम्राज्य

## कारवाई कधी होणार?

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर शहरातीच्या मध्यवर्ती भागातील समता मार्केट परिसरात अस्वच्छतेचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असल्याची तक्रार दुकानदारांकडून केली जात आहे. मार्केटमधील विविध दुकानांसमोर पिचकारी मारल्यामुळे परिसरात घाण व दुर्गंधी निर्माण होत असून, ग्राहकांनाही याचा त्रास सहन करावा लागत आहे. समता मार्केटमध्ये युवाज्वाला कार्यालसमोर व दुकानांसमोर अस्वच्छता करणाऱ्यांवर प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याने संबंधितांचे मनोबल वाढत आहे. सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखण्याची जबाबदारी नागरिकांसोबतच प्रशासनाचीही असताना या प्रकाराकडे नगरपरिषद प्रशासन कितपत गांभीर्याने पाहत आहे, असा सवाल उपस्थित केला जात आहे. मार्केट परिसरात नियमित स्वच्छता, पिचकारी मारणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई तसेच ☞(पान २ वर)



# तडीपार आरोपी बडनेऱ्यातून ताब्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतून १८ महिन्यांसाठी तडीपार करण्यात आलेल्या आरोपीला अँटी गुंडा पथकाने बडनेरा परिसरातून अटक केली. शुभम मिथिलेश कैथवास (वय २७, रा. जुनी वस्ती, माता फाईल, बडनेरा) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. शहर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतून तडीपार करण्याचा आदेश असतानाही कोणतीही पूर्वपरवानगी न घेता शुभम कैथवास हा बडनेरा परिसरात आल्याची माहिती अँटी गुंडा पथकाला मिळाली. त्यानंतर पथकाने कारवाई करीत त्याला ताब्यात घेतले. तडीपारीच्या आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी त्याच्याविरुद्ध संबंधित कलमान्वये कारवाई करण्यात आली. अटक केलेल्या आरोपीला पुढील कायदेशीर कारवाईसाठी बडनेरा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला व पोलीस उपायुक्त परिमंडळ-१ सालुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली अँटी गुंडा पथकाचे पीएसआय मिलिंद हिवरे, सुभाष पाटील, सतीश देशमुख, सतीश पराळे, मतीन शेख तसेच हेड कॉन्स्टेबल चंद्रकांत जनबंधू यांनी केली.

# अंजनगावत गणेशोत्सव शांततेत पार

## ठाणेदार सुरज बोंडे यांच्या नियोजनाचे कौतुक

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** पोलीस विभागात ठाणेदार हे पद अत्यंत महत्त्वाचे आणि जबाबदारीचे मानले जाते. विशेषतः सार्वजनिक उत्सवांच्या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी ठाणेदारांना २४ तास कार्यरत राहावे लागते. आपल्या हद्दीत कुठेही अनुचित प्रकार घडू नये यासाठी दक्ष राहून संपूर्ण यंत्रणेचे नियोजन करावे लागते.सध्या असाच सकारात्मक प्रसंग अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशनचे ठाणेदार सुरज बोंडे यांच्या बाबतीत सोशल मीडियावर पाहायला मिळत आहे. अंजनगाव सुर्जी शहर व परिसरातील गणपती उत्सव यंदा अत्यंत शांततेत आणि उत्साहात पार पडला असून याचे श्रेय शहरवासीयांनी ठाणेदार सुरज बोंडे यांना दिले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, गणेशोत्सवापूर्वीच बोंडे यांनी योग्य नियोजन केले होते. शांतता समितीच्या वेळोवेळी बैठका घेण्यात आल्या. शहरातील सर्व गणेश उत्सव मंडळांना प्रत्यक्ष भेटी देऊन सूचना देण्यात आल्या. दहा दिवस अखंड चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. शहरासह ग्रामीण भागातील प्रत्येक गावावर पोलिसांची बारीक नजर होती.☞(पान २ वर)



# माजी नगराध्यक्ष हरिशंकर अग्रवाल यांच्यावर पर्यावरणपूरक पद्धतीने अंत्यसंस्कार

## आज अचलपूर नगर परिषदेत सामूहिक श्रद्धांजली कार्यक्रम

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष हरिशंकरजी अग्रवाल यांचे २६ सप्टेंबर रोजी निधनाचे वृत्त समजताच त्यांच्या निवासस्थानी शोकसंवेदना व्यक्त करण्यासाठी नागरिकांसह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची गर्दी जमली होती. २७ सप्टेंबर रोजी स्थानिक हिंदू स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. हरिशंकर अग्रवाल यांच्या पार्थिवावर अंत्यविधीची प्रक्रिया अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण व पर्यावरणपूरक पद्धतीने पार पडली. लाकडांचा वापर टाळून विशेष शेणाच्या गौऱ्यांचा (गोवऱ्या) वापर करत हा अंतिम विधी संपन्न करण्यात आला. त्यांच्या या पर्यावरणपूरक अंत्यसंस्काराचे उपस्थितांमधून विशेष कौतुक व आदर व्यक्त करण्यात आला.त्यांच्या निधनानंतर अग्रवाल कुटुंबीयांचे सांत्वन करण्यासाठी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व व्यापारी क्षेत्रातील दिग्गजांनी त्यांच्या निवासस्थानी भेट दिली. अमरावतीचे खासदार बळवंतराव वानखडे, आमदार संजय खोडके, अचलपूर विधानसभेचे आमदार प्रवीण तायडे,विधानपरिषद आमदार बच्चू कडू,जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष बबलू देशमुख, बडनेरा विधानसभेचे आमदार रवी ☞(पान २ वर)

